CMYK

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ७ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक ११९ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सोलापुरात 'उबाठा'ला खिंडार

## माजी राज्यमंत्री, माजी आमदार, जिल्हाप्रमुखांचे शिवसेनेत प्रवेश

### उत्तमप्रकाश खंदारे, रतिकांत पाटील, अमर पाटील आदींचा समावेश



**तभा वृत्तसेवा ,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

सोलापूर जिल्हा शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख अमर पाटील, माजी राज्यमंत्री व सहसंपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे तसेच माजी आमदार रतिकांत पाटील यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. पाटील यांच्या प्रवेशामुळे दक्षिण तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढण्यास मदत होणार आहे. बुधवारी पाटील यांनी पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत उबाठा शिवसेना पक्षातुन हकालपट्टी केल्याचे पत्र शिवसेना नेते व सचिव विनायक राऊत यांनी दिला होता. तर पाटील यांनीही राजीनामा दिला होता.

अमर पाटील हे ऑक्टोबर २०२४ मध्ये शिवसेना उबाठा गटाचे महाविकास आघाडीकडून भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. तसेच दोन वर्षांपासून ते जिल्हा प्रमुख म्हणूनही कामकाज पाहत होते. मात्र पक्षातील गटबाजीचा त्रास होत असल्याचे सांगत त्यांनी पक्ष सदस्यत्वाचा व जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा दिला होता. अमर पाटील हे अनेक दिवसांपासून पक्षावर नाराज होते. म्हणून त्यांनी मुंबई येथे शिवसेना प्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्षप्रवेश केला. माजी आमदार रतिकांत पाटील हे २००४ ते २००९ मध्ये दक्षिणचे आमदार होते. उत्तमप्रकाश खंदारे हे उत्तर सोलापूर तालुक्याचे आमदार होते. युती सरकारच्या काळात राज्यमंत्री होते. एकीकडे पक्षविरोधात कारवाया केल्याने त्यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे पत्र प्रसिध्द होताच दुसरीकडे राजीनामा पत्र प्रसिध्द झाले. त्यामुळे राजीनामा व हकालपट्टीमुळे कार्यकर्ते संभ्रमात आहेत. मात्र उबाठा शिवसेनेतील अंतर्गत गटबाजी उफाळून आल्याने पक्षाला खिंडार पडले आहे. पाटील यांच्याबरोबर जिल्हा उपप्रमुख धर्मराज बगले, तालुका प्रमुख योगिराज पाटील व तालुका समन्वयक संतोष बरूरे, सुनिल कटारे, नरसप्पा दिंडोरे, शिवशंकर सोने, सुरेश शेंडगे,महालिंग बिराजदार, काशिनाथ अंबिगार यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

# माझ्या बोलण्यामुळे गैरसमज होत आहे : भय्याजी जोशी



**मी** काल घाटकोपरच्या एका सार्वजनिक कार्यक्रमात विविध भाषांच्या सह-अस्तित्वावर बोलत होतो. माझ्या कालच्या बोलण्यामुळे काही गैरसमज होत आहेत. त्यामुळे मी स्वतः स्पष्ट करू इच्छितो की, मुंबई व महाराष्ट्राची भाषा मराठीच आहे व प्रत्येकाने मराठी शिकली पाहिजे. मुंबई हा महाराष्ट्राचाच भाग असल्याने मुंबईची विशेषतः आहे, भाषादेखील स्वाभाविकच मराठी आहे. यात दूमत असण्याचे काही कारण नाही. भारतात विविध भाषा बोलणारे लोकं एकमकांना सोबत घेऊन चालतात, ही आपली एक हे जगासमोर एक उत्तम उदाहरण आहे. मुंबईतदेखील बहुभाषिक लोकं राहतात आणि सगळे सहअस्तित्वाने परस्परांबद्दल स्नेहसंबंध ठेवून गुण्यागोविंदाने राहत आहेत. मात्र, यात स्वाभाविकपणे बाहेरून येणाऱ्या व्यक्तींनी स्वतःच्या भाषेसह सांस्कृतिक दृष्टीने समृद्ध असलेली मराठी भाषा शिकून घ्यावी, ती आत्मसात करावी, अशी माझी अपेक्षा आहे.

# मुंबईची, महाराष्ट्राची, शासनाची भाषा मराठीच

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत स्पष्टोक्ती



◆ **मुंबई, ६ मार्च**

मुंबईची, महाराष्ट्राची आणि महाराष्ट्र शासनाची भाषा मराठी आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकले पाहिजे, प्रत्येकाला मराठी बोलता आले पाहिजे, अशी स्पष्टोक्ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भय्याजी जोशी यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात मराठी भाषेबाबत केलेल्या विधानाचा विपर्यास करून विरोधकांनी महापालिकेच्या निवडणुकीत राजकीय स्वार्थ साधण्याच्या हेतूने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत गदारोळ घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी मराठी भाषेचा अपमान करणाऱ्यांबाबत सरकारची भूमिका काय, असा सवाल ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी केला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले, भय्याजी जोशी यांचे वक्तव्य मी ऐकलेले नाही. त्यामुळे ते ऐकून,त्यावर माहिती घेऊन मी बोलेन. मात्र, याबाबत सरकारची भूमिका पक्की आहे. मुंबईची, महाराष्ट्राची आणि महाराष्ट्र शासनाची भाषा मराठी आहे.

विशेष म्हणजे, माझ्या या वक्तव्याबाबत भय्याजी जोशी यांचे काही वेगळे मत असेल, असे मला वाटत नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. तरीही मी शासनाच्या वतीने सांगतो की, मुंबईची, महाराष्ट्राची भाषा मराठी आहे. इतर भाषांचा इथे सन्मान आहे. दुसऱ्या कुठल्याही भाषेचा आम्ही अपमान करणार नाही. कारण, जो स्वतःच्या भाषेवर प्रेम करतो, तोच दुसऱ्याच्या भाषेवरही प्रेम करू शकतो. त्यामुळे तो सन्मान आहेच, अशा शब्दांत विरोधकांचा खोडसळ डाव त्यांनी हाणून पाडला. यावेळी त्यांनी विरोधकांना चांगलेच सुनावले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

# केंद्र सरकारने बदलले पासपोर्टचे नियम

**नवी दिल्ली, ६ मार्च**

आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी पासपोर्ट हा आपल्या नागरिकत्वाचा आणि वैयक्तिक माहितीचा महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. अन्य देशांत प्रवास करण्यासाठी पासपोर्ट अनिवार्य असतो. परराष्ट्र मंत्रालयाकडून पासपोर्ट दिला जातो. नुकतेच केंद्र सरकारने पासपोर्टच्या नियम ांमध्ये बदल केले आहेत. पासपोर्ट नियम १९८० या नियमावलीत या आठवड्यात बदल करण्यात आले आहेत. नवीन नियम अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्यानंतर लागू होतील.

केंद्र सरकारच्या सुधारित नियमांनुसार आता १ ऑक्टोबर २०२३ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींना पासपोर्टसाठी अर्ज करताना जन्मदाखला देणे अनिवार्य करण्यात आले आहे. म हत्त्वाचे म्हणजे, महानगरपालिका किंवा जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ अंतर्गत कोणत्याही तत्सम प्राधिकरणाकडूनच जन्म दाखला वितरित केलेला असावा. १ ऑक्टोबर २०२३ पूर्वी जन्मलेल्या व्यक्तींना हा नियम लागू होत नाही. ते पूर्वीप्रमाणेच एसएससी बोर्ड सर्टिफिकेट, शाळा सोडल्याचा दाखला, पॅनकार्ड, वाहन चालक परवाना किंवा इतर तत्सम सरकारी ओळखपत्राचा पुरावा सादर करू शकतात.



आजवर पासपोर्टच्या शेवटच्या पानावर पासपोर्ट धारकाचा कायम चा पत्ता छापलेला असायचा. पण, यापुढे शेवटच्या पानावर पत्ता छापला जाणार नाही. त्याऐवजी तिथे बारकोड छापला जाईल. इमिग्रेशन अधिकारी हा बारकोड स्कॅन करून पत्त्याबाबत माहिती मिळवू शकतील. यापुढे पासपोर्टचे कव्हर वेगवेगळ्या रंगाचे असेल. जेणेकरून त्याचे वर्गीकरण करणे सोपे जाईल. सरकारी अधिकाऱ्यांना पांढऱ्या रंगाचा पासपोर्ट दिला जाईल तसेच म ुत्सद्दी अधिकाऱ्यांना लाल रंगाचा पासपोर्ट दिला जाईल. दरम्यान, सामान्य नागरिकांना पूर्वीप्रमाणेच निळ्या रंगातला पासपोर्ट मिळेल. पासपोर्टच्या शेवटच्या पानावर छापले जाणारे पालकांचे नाव यापुढे छापले जाणार नाही. या बदलामुळे एकल पालक किंवा विभक्त कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. त्यांना जाहीर करावी न लागणाऱ्या माहितीबाबत गोपनीयता राखता येणार आहे.

**पासपोर्ट सेवा केंद्राची संख्या वाढवली**

पासपोर्टसाठी अर्ज करणे, म जकुरात बदल करणे, अशी कामे पासपोर्ट सेवा केंद्राद्वारे केली जातात. आता ही केंद्रे वाढवली जाणार आहेत. पुढील पाच वर्षांत सेवा केंद्रांची संख्या ४४२ वरून ६०० केली जाणार आहे.

# संजय राऊत, रोहित पवारांवर हक्कभंग

**मुंबई, ६ मार्च**

नऊ वर्षापूर्वीचे एक प्रकरण उकरून काढत विरोधकांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर बुधवारी हल्ला चढवला होता. यात अग्रेसर असलेले उबाठा गटाचे खासदार संजय राऊत, शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आणि एका युट्यूब चॅनलच्या संपादकावर मंत्री गोरे यांनी हक्कभंग दाखल केला.

राज्यातील एक मंत्री महिलेला विवस्त्र फोटो पाठवतो, या महिलेला त्रास देतो, असा गंभीर आरोप करीत संजय राऊत यांनी थेट मंत्री जयकुमार गोरे यांचे नाव घेतले होते. त्यापाठोपाठ आमदार रोहित पवारांनीही गोरे यांच्यावर निशाणा साधला. शिवाय गोरे यांचे चारित्र्य हनन करणाऱ्या बऱ्याच बातम्या एका युट्यूब चॅनलने प्रसारित केल्याने, या तिघांविरोधात गुरुवारी विधानसभेत तीन वेगवेगळे हक्कभंग प्रस्ताव गोरे यांनी दाखल केले. हक्कभंग प्रस्ताव मांडताना जयकुमार गोरे म्हणाले की, २०१७ सालच्या जिल्हा न्यायालयात दाखल प्रकरणाचा हवाला देत संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमात माझ्याबद्दल बिनबुडाचे, अत्यंत आक्षेपार्ह भाषा वापरून आरोप केले, याकडे गोरे यांनी लक्ष वेधले.

# उच्च न्यायालयाने फेटाळली वाझेची याचिका

**मुंबई** : बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाझने स्फोटकांनी भरलेले वाहन उद्योजक मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानी ठेवले आणि मनसुख हिरेनच्या हत्येचा कट रचला, त्यावेळी तो अधिकृत क्षमतेत काम करीत नव्हता, असे मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट करीत त्याची याचिका फेटाळली. त्याच्या अटकेसाठी राज्य सरकारकडून कोणतीही मान्यता गरजेची नव्हती, असे न्या. एस. व्ही. कोतवाल आणि न्या. एस. एम. मोडक यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. अटक करण्यापूर्वी शासनाची योग्य पद्धतीने मंजुरी घेण्यात आली नव्हती, त्यामुळे आपली अटक बेकायदेशीर असून, आपल्याला मुक्त करण्यात यावे, अशी मागणी करणारी त्याची याचिका न्यायालयाने फेटाळली. मी या प्रकरणातील तपास अधिकाऱ्यापैकी एक होतो. यावर अधिकृत क्षमतेत काम करीत असल्याने अटकेपूर्वी राज्य सरकारची मंजुरी घेणे आवश्यक होते, असा दावा त्याने याचिकेत केला होता. मात्र, खंडपीठाने त्याचा दावा फेटाळला. मुकेश अंबानी यांच्या घराजवळ स्फोटकांनी भरलेले वाहन ठेवले, त्याने कट रचला आणि मनसुख हिरेनच्या हत्येच्या कटाची अंमलबजावणी त्याने अधिकृत क्षमतेत केलेली नाही. त्यामुळे राष्ट्रीय तपास संस्थेला त्याला अटक करण्यासाठी राज्य सरकारची परवानगी घेण्याची कोणतीही गरज नव्हती, असेन्यायालयाने म्हटले.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



**सोलापूर : एसबीसीला २% स्वतंत्र आरक्षण मिळालेच पाहिजे यासाठी अन्याय निवारण कृती समितीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष निरंजन बोध्दूल यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी गिरीष सरवदे, बालाजी नल्ला, नागार्जून राऊळ हे उपस्थित होते.**



# सोलापूरच्या ग्रामीण विकासावरील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

## डॉ. एस.एच. पवार यांच्या 'औषधी वनस्पती' पुस्तकाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

ग्रामीण विकास आणि त्यांच्या व्यावसायिकीकरणासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर राष्ट्रीय परिषदेचा तीन दिवसीय भरगच्च कार्यक्रमांचा समारोप बुधवारी (ता. ५) झाला. ३ ते ५ मार्च रोजी एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात ही परिषद पार पडली.

स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेस, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि भारत सरकार च्या कृषी मंत्रालयातंर्गत डाळिंब राष्ट्रीय संशोधन केंद्र () यांच्या सहकार्यातून पार पडली. बुधवारी टॅलेंट सर्च क्विझ स्पर्धा, औद्योगिक संवाद, तोंडी पेपर सादरीकरणाने परिषदेचा समारोप झाला. ही परिषद सिंहगडचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली, सीआरटीडीचे संचालक डॉ. एस एच पवार, प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

प्रा. एस एच पवार लिखित ''औषधी वनस्पती आणि त्यांच्या बायोनोकॉम्पोझिट्समधील नॅनोटेक्नॉलॉजी ऍप्लिकेशन्स'' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हे पुस्तक लंडनच्या केंब्रिज स्कॉलरने प्रकाशित केले आहे.

दुसऱ्या दिवसाच्या सत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यावर भर देण्यासाठी विशेष कार्यक्रम घेतले. शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी कृषी उद्योजकता कार्यशाळा पार पडली. यात डाळिंब, केळी, भरड धान्य, फुले शेतीसह रेशीम शेतीवर भर देण्यात आली. यावर कृषी विज्ञान केंद्र, संशोधन केंद्रातील डॉ . निलेश गायकवाड, डॉ.सोमनाथ पोखरे, डॉ. सुरेश कुमार, किरण जाधव, दिनेश क्षीरसागर, परशुराम पत्रोती, डॉ. राहुल यादव, डॉ. गणेश कदम, विनीत पवार यांनी मार्गदर्शन केले. समारोपाच्या शेवटच्या दिवशी माजी कुलगुरू डॉ. एस एच पवार, सिंहगडचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, एनआरसीपीचे संचालक डॉ. राजीव मराठे, डॉ. निलेश गायकवाड, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. बी. जे. लोखंडे यांची उपस्थिती होती. औद्योगिक संवाद सत्रात केतन शहा, अमोल मेहता, अश्विनी झांबरे, सुमीत कुडाळ यांनी मार्गदर्शन केले. विविध विषयांवर तज्ज्ञांचे व्याख्याने, शोध प्रबंधाचे सादरीकरण, विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, विज्ञान प्रदर्शन, संशोधकांशी थेट संवाद, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा व नव उद्योजकांसाठी मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठाची रेशीम उद्योगाची फिरती प्रयोगशाळा (बस) ही विद्यार्थ्यांसाठी आकर्षण राहिली. यात रेशीम प्रक्रियाविषयी प्रत्यक्ष माहिती घेतली.वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रकल्प प्रदर्शनात जवळपास ४० प्रकल्प सादर झाली. तोंडी पेपर सादरीकरणात राज्यभरातील ६२ पेपर सादर केले. प्रश्न मंजुषा कार्यक्रमात ३२ टीममधून पाच फेऱ्या घेण्यात आल्या. निबंध स्पर्धाही झाल्या. समारोपावेळी विविध स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, सन्मान पत्र, सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**सिंहगड आणि एनआरसीपीमध्ये सामंजस्य करार**

स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेस, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि डाळिंब राष्ट्रीय संशोधन केंद्र () एकत्रित आल्या होत्या. पहिल्यादाच सोलापूर विद्यापीठाचे गीत आणि एनआरसीपीचे गीत बाहेर म्हणजे सिंहगड महाविद्यालयात वाजले. समारोपादिवशी एनआरसीपी आणि सिंहगड मध्ये एक सामंजस्य करार झाला. यातून सिंहगडच्या विद्यार्थ्यांना संशोधनास वाव मिळणार आहे.

# १० मार्च पासून ऊस तोडणी मशीन मालक करणार बेमुदत आंदोलन

## साखर आयुक्तांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**पुणे, ६ मार्च -**

ऊस तोडणी मशीनचा तोडणीदर ५० टक्यांनी वाढवून देणे, बँकेचे हप्ते आहेत त्या परिस्थितीत ३ वर्ष मुदत वाढ मिळावी आणि पाचट कपात १.५ टक्के असावी. या सारख्या अनेक महत्वपूर्ण मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशिन मालक संघटनेचे सचिव अमोलराजे वसंतराव जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी साखर आयुक्त सिद्धराम सालीमठ यांना दिले. या मागण्यांसाठी राज्यातील १३०० मशीन मालक १० मार्च पासून साखर संकुल समोर बेमुदत आंदोलनास बसण्याचा इशारा दिला आहे. तसेच हे निवेदन राज्याचे उपमुख्यमंत्री यांना सुद्धा देण्यात येणार आहे.

साखर आयुक्तांना निवेदन देतांना संघटनेचे अभय कोल्हे, राजाभाऊ लोमटे, धनंजय काळे, गणेश यादव, निलेश बागटे, कलीम शेख, शरद चव्हाण, राहुल इथापे आणि रजत नलावडे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मशीन मालक संघटना, सातारा यांच्या वतीने ऊस मशीनचे तोडणीदार/वाहातूकदार वाढविणेबाबतची मागणी सुद्धा केली आहे. कृषी क्षेत्रातील प्रोत्साहन पर योजनेमुळे कृषी यांत्रिकीकरणात गतीने वाढ झाली आहे. यामुळे राज्यात ऊस तोडणी मशीन जवळपास १३०० मशिन कार्यरत असून यातील काहींना अनुदान मिळाले आहे. त्यातच २०१९ पासून जवळपास ९०० मशिनला अनुदान मिळालेले नाही. यासाठी वेळोवेळी आंदोलन करण्यात आले पण त्यांना न्याय मिळाला नाही.

डिझेल वृद्धिमुळे एक टन ऊस तोडणीसाठी मशीनला जवळपास ३ लीटर डिझेल लागत असून २६० ते २८० रू. खर्च येतो. मशिन चालविण्यासाठी ऑपरेटर/इनफिल्डर ड्रायव्हर यांचे पगार, टनानूसार ऑपरेटिंग खर्च ८० रूपये येतो. दुरूस्ती, ग्रीस व स्पेअर पार्टससाठी प्रति टनानूसार १०० रूपये खर्च येतो. म्हणजेच एक टन ऊस तोडणीसाठी ४६० रूपये खर्च येतो. इकडे कारखाने आम्हाला ४५० ते ५०० रूपये देतात. आम्हाला आवक कमी असून बँकेचे हप्ते भरणे ही अवघड झाले आहे. आयुक्तांच्या जी.आर नुसार ४.५ टक्के पाचट कपात ही शेतकऱ्यांकडून ऊस तोडणीदार आणि वाहतूकदार यांच्याकडून एकूण १३.५ टक्के केली जात आहे. त्यामुळेच राज्यातील सर्व मशीन मालकांची ही समस्या लवकर सोडवावी अशी मागणी संघटनेने केली आहे.

### प.पू. कुमार स्वामी जीवन चरित्र अमृत गाथा

# मराठी ओवीबद्ध ग्रंथ प्रकाशन सोहळा रविवारी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

प.पू. कुमार स्वामीजी जीवन चरित्रामृत गाथा मराठी ओवीबद्ध ग्रंथ प्रकाशन सोहळा आणि साधक भक्त स्नेह मेळाव्याचे आयोजन रविवार दि. ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता परमपूज्य महा तपस्वी कुमार स्वामीजी प्रार्थना योग मंडळ, शेळगी येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शिवानंद दसाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी तपोवन धारवाडचे बलभीम बिराजदार, संत कवी ग्रंथ लेखक नारायण कुलकर्णी, संजीव कुसुरकर पुणे तपोवन फाउंडेशनचे चेअरमन रामण्णा भद्रावनरु आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी सोलापूरवासियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवानंद दसाडे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस दादा बनसोडे, बसवराज नरके, कुमार दसाडे, धानय्या स्वामी, मल्लिकार्जुन मल्लारे, गोपाळ वडतिले, श्रीधर स्वामी आदी उपस्थित होते.

# आस्था सामाजिक संस्थेचे महिला गुणगौरव पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

सोलापूर समाज कार्यात अग्रेसर असणारी आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना गुणगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष आनंद तालिकोटी व प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे यांनी दिले.

या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, शाल, फेटा, रोप असे असणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा वार शनिवारी ८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता तुळजापूर वेस चौक नगरेश्वर मंदिर या ठिकाणी होणार आहे. या पुरस्कारास प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सिनेट सदस्या रोहिणी तडवळकर, माजी सदस्या अश्विनी चव्हाण, माजी सहशिक्षिका उमाबाई श्राविका विद्यालय वसुंधरा पवार, अध्यक्ष नगरेश्वर देवस्थान महेंद्र सोमशेट्टी, आस्था सामाजिक संस्था अध्यक्ष आनंद तालिकोटी, संचालक देविदास चेळेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत.

या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित रहावे असे आस्था सामाजिक संस्थेचे सचिव शिवानंद सावळगी यांनी केले आहे.

**हे आहेत पुरस्काराचे मानकरी**

रेखा पेंबर्ती (मुख्याध्यापिका दमाणी प्रशाला), गिता सादूल (मुख्याध्यापिका, भु.म.पुल्ली कन्या प्रशाला), संरोजना मुलिंटी (मुख्याध्यापिका गांधी नाथा रंगजी प्राथमिक प्रशाला), डॉ. शिल्पा फडकुले, प्रा. प्रतिभा कंगळे (उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय), आरती मलजी (शारीरिक शिक्षण संचालक सेवासदन ज्यु. कॉलेज), सुवर्णा कटारे (सहशिक्षिका रोशन प्रशाला), सुवर्णा कट्टीमनी (सहशिक्षिका चतुराबाई श्राविका प्राथमिक), रामेश्वरी क्षिरसागर, सपना कांबळे (पत्रकार),सुवर्णा कांबळे (प्रा.सोनी कॉलेज), अर्चना गव्हाणे (सहशिक्षिका सुशील मराठी प्रशाला), अनुराधा थोरात (कराटे प्रशिक्षिका).

# क्लाऊड कॉम्प्युटिंग प्लॅटफॉर्म्स राष्ट्रीय कार्यशाळेत ५० प्राध्यापकांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

विजापूर रोडवरील ए. जी.पाटील अभियांत्रिकी मधील संगणक विभाग व ऑटोमॅटिक इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील क्लाऊड कॉम्प्युटिंग प्लॅटफॉर्म्स या विषयावर कार्यशाळेत महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातून सुमारे ५० प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅम्पस डायरेक्टर डॉक्टर एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, एक्स्पर्ट प्रा. प्राची सुर्वे, कन्व्हेनर प्रा. एस. व्ही. कुलकर्णी व सर्व विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. ऑटोमॅटिक इन्फोटेकचे अमित कुलकर्णी यांनी की नोट स्पीकर म्हणून मार्गदर्शन केले. प्रा. प्राची सुर्वे यांनी या कार्यशाळेत प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे उद्दिष्ट प्राध्यापकांना आणि यासारख्या प्रमुख क्लाऊड सेवांबद्दल आत्याधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण हे होते.

संगणक विभागाचे प्रमुख प्रा. एस व्ही. कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे कन्व्हेनर म्हणून काम पाहिले. प्रा. ए. बी. वळसंग, प्रा.ए. पी. होसाळे यांनी को-ऑर्डिनेटर म्हणून काम पाहिले. प्रा. एम. एन. देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. ए. बी. हन्नूरे, प्रा. पी. बी. कुलकर्णी, प्रा. डी. पी. सुलगावकर, प्रा. टि. व्ही. पाटील, प्रा. ए. एस. पाटील, श्री बसवराज नलवार, श्री आर. आर. कुंदूर यांनी परिश्रम घेतले. कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी सर्वांना मार्गदर्शन केले संस्थेचे अध्यक्ष एस.ए. पाटील व ट्रस्टी शिवानंद पाटील यांनी याप्रसंगी सर्वांचं कौतुक केले.

# सोलापूर स्मार्ट सिटीचे सीईओ गोपीचंद कदम यांची बदली

**नव्या अधिकाऱ्याची अद्याप नियुक्ती नाही**

## महत्वाकांक्षी दुहेरी जलवाहिनी प्रकल्पाला आता वाली कोण?



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

सोलापूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) गोपीचंद कदम यांची अवघ्या अडीच महिन्यातच बदली झाली आहे. अतिरिक्त आदिवासी आयुक्त ठाणे म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने तसे आदेश काढले आहेत.

फडणवीस सरकारकडून राज्यातील ८ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्येच सोलापूर स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम यांची बदली करण्यात आली आहे. सोलापूर स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारीपदी गोपीचंद कदम यांची दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी पदोन्नतीने बदली करण्यात आली होती. अवघ्या अडीच महिन्यात कदम यांची शासनाने बदली केली आहे. तत्कालीन सीईओ शितल तेली - उगले यांच्या जागी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या रिक्त पदावर शासनाने कोणाची नियुक्ती केली नाही. सोलापूर शहराचा महत्वकांक्षी प्रकल्प मानला जाणाऱ्या उजनी सोलापूर दुहेरील वाहिनीचे काम अंतिम टप्प्यात आले असतानाच दोन अधिकाऱ्यांची पदावरून बदली करण्यात आली आहे. तर महापालिकेच्या माजी आयुक्त शितल तेली - उगले यांच्याकडे अद्याप कोणत्याही पदाची जबाबदारी सोपवण्यात आली नसल्याचे कळते. त्यांनी या जलवाहिनीचे काम पाठपुरावा करून पूर्णत्वास नेले. आता स्मार्ट सिटीच्या नूतन सीईओ पदी कोणाची नियुक्ती करणार याकडे आता सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे. महत्वाकांक्षी दुहेरी जलवाहिनी प्रकल्पाला आता वाली कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.




# महिलांनी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे

## जिल्हा न्यायाधीश एम.एस. शर्मा यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मार्च -**

महिलानीं रोजच्या धावपळी मध्ये आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करु नयेत. महिलांना कामाच्या ठिकाणी व घरी काम करत असताना कामाचा ताण जास्त घेवू नये. आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. तळागाळातील ते उच्चपदस्थ महिलांचे आरोग्य स्वास्थ्य राहणे महत्वाचे आहे, असे मत जिल्हा न्यायाधीश एम एस शर्मा यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर, डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर, महिला तकार निवारण समिती, जिल्हा न्यायालय सोलापूर व सोलापूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांचे आरोग्य तपासणी शिबीर ५ मार्च रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे आयोजीत करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश एम.एस. शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा न्यायाधीश जे. जे. मोहिते, प्रभारी अधिष्ठाता श्रीमती. डॉ. विद्या तिरणकर, जिल्हा सरकारी वकिल प्रदिपसिंग रजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष व्ही.पी. शिंदे आदी उपस्थित होते.

या शिबीराची प्रस्तावना जिल्हा न्यायाधीश जे. जे. मोहिते, जिल्हा न्यायाधीश यांनी केली. शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख जिल्हा न्यायाधीश एम.एस. शर्मा यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व विषद केले. सूत्रसंचालन ॲड. सरोजनी तमशेट्टी यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी यांनी मानले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावातील ऊर्जेप्रमाणे विद्यापीठाची उंची वाढावी : डॉ.चासकर

## सहाव्या नामविस्तार सोहळ्यानिमित्त ग्रंथदिंडी, वृक्षारोपण, राष्ट्रीय चर्चासत्र



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या नावातच मोठी उर्जा आहे. अशा या महान रणरागिणी व कुशल प्रशासक राहिलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण भारतभर विविध मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याबरोबरच विहिरी, बारवा निर्माण करत आदर्श राज्यकारभार पाहिला आहे. त्यांच्या नावाने वाटचाल सुरू ठेवलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने अल्प कालावधीत चांगली भरारी घेतली आहे, या पुढील काळात पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या नावातील ऊर्जेप्रमाणे विद्यापीठाने मोठी उंची गाठावी, अशी अपेक्षा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केली.

गुरुवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा सहावा नामविस्तार दिनाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्त विद्यापीठ कॅम्पसमधून ग्रंथदिंडी काढण्यात आली. यात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता. वृक्षारोपणही करण्यात आले. त्यानंतर मुख्य सभागृहात कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यक्रम व राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले.

याचे उद्घाटन कुलगुरू प्रा. मनोहर चासकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर होळकर इतिहास साधन ग्रंथाचे संपादक डॉ. देविदास पोटे, कुलसचिव योगिनी घारे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी अध्यासन केंद्राकडून सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कुलगुरू प्रा. चासकर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास पीएमउषा योजनेतून १०० कोटी रुपयांचा निधी मिळाला. यातून विद्यार्थ्यांसाठी चांगल्या सोयी-सुविधा निर्माण होतील. यातून विद्यापीठ नावावररूपाला येईल. विद्यार्थी केंद्रबिंदू म्हणून वाटचाल करत असताना चांगले विद्यार्थी घडवण्यासाठी अध्यापक व प्रशासनाने प्रयत्नशील राहिले पाहिजे. संशोधन केंद्रांमधून चांगले संशोधन व संशोधक निर्माण झाले पाहिजे, अशी अपेक्षा देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी डॉ. देविदास पोटे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्य इतिहासाची महती सांगताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जनकल्याणाचा वसा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी पुढे चालविल्याचे सांगितले. प्रजावत्सल्य, कर्तव्य कठोर प्रशासक, लोक कल्याणकारी लोकमाता राहिलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आदर्श राज्यकारभार पाहिल्याचे सांगितले. या कार्यक्रमात विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, प्रा. सचिन गायकवाड, स्मारक समितीचे सदस्य प्रा. सुभाष मस्के तसेच विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सदस्य, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली, डॉ. तेजस्विनी कांबळे, प्रा. श्रुती देवळे यांनी केले तर आभार कुलसचिव योगिनी घारे यांनी मानले.

## गर्भ खाली करण्यासाठी गोळ्या खाल्लेली विवाहिता अत्यवस्थ

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

दीड महिन्याचा गर्भ खाली करण्यासाठी गोळ्या खालल्याने रक्तस्त्राव होऊन विवाहिता अत्यवस्थ झाली. हा प्रकार बुधवार १२ च्या सुमारास घडला. या विवाहितेवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील २२ वर्षीय विवाहितेने बुधवारी दीड वर्षाचे गर्भ खाली करण्यासाठीच्या गोळ्या कसल्यातरी खालल्या. यानंतर विवाहितेला रक्तस्त्राव सुरु झाला. यात तिच्यावर अकलूज येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रात्री ९ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली असून विवाहिता शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## गवतावरील तणनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

अज्ञात कारणातून गवतावरील तणनाशक प्राशन करून एकाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे बुधवारी रात्री नऊ वाजता उघडकीस आला. शिवानंद धर्मण्णा पुजारी (वय ४०, रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट) असे व्यक्तीचे नाव आहे. मैंदर्गी येथे किरण केसूर यांचे शेत आहे. याठिकाणी असताना बुधवारी रात्री ९ च्या सुमारास शिवानंद याने गवतावर मारण्याचे तणनाशक औषध प्राशन केले. त्यात त्रास होऊ लागल्याने १०.४५ वाजता मित्र संगमनाथ याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. रुग्ण शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर | शुक्रवार, ७ मार्च २०२५

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

▌dainiktarunbharat.com
▌epaper.dainiktarunbharat.com

# पाकिस्तानने चोरलेला भाग परत घेतल्यावरच काश्मिरात शांतता

## जयशंकर यांची ठाम भूमिका

◆ **लंडन, ६ मार्च**

पाकिस्तानने भारताचा चोरलेला भाग आम्ही परत घेण्याची वाट पाहत आहोत. तो भाग भारतात सामील होताच जम्मू-काश्मीरमध्ये पूर्ण शांतता प्रस्थापित होईल, अशी ठाम भूमिका परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी विशद केली. लंडनमधील चॅथम हाऊस थिंक टॅंकमध्ये बुधवारी 'जगात भारताचा उदय आणि भूमिका' या विषयावरील सत्रात ते बोलत होते.

जयशंकर यांनी काश्मीर आणि केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबद्दल भाष्य केले. त्यात कलम ३७० निष्प्रभ करणे, आर्थिक उपाययोजना आणि मतदानात लोकांचा सहभाग वाढवणे आदी मुद्यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत डॉलरच्या वापराबद्दल ब्रिक्स देशांच्या मतांवरही त्यांनी यावेळी चर्चा केली.

काश्मीरबद्दल विचारले असता जयशंकर म्हणाले, काश्मीरमधील बहुतांश समस्या सोडवण्याचे चांगले काम आम्ही केले आहे. मला वाटते की, कलम ३७० निष्प्रभ करणे हे एक पहिले पाऊल होते. त्यानंतर काश्मीरमध्ये विकास, आर्थिक उलाढाल आणि सामाजिक न्याय पुर्नस्थापित करणे हे दुसरे पाऊल होते. निवडणुकांमधील मतदानात लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढवणे हे तिसरे पाऊल होते. मला वाटते की, आम्ही ज्याची वाट पाहत आहोत, तो म्हणजे पाकिस्तानने काश्मीरचा जो भाग चोरलेला आहे, तो परत मिळवणे. जो बेकायदेशीरपणे पाकिस्तानच्या ताब्यात आहे. हे व्याप्तकाश्मीर परत मिळवल्यानंतर मी तुम्हाला खात्री देतो की, काश्मीरचा मुद्दा सुटेल. जयशंकर म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन प्रशासन बहुध्रुवीयतेकडे वाटचाल करीत आहे. जे भारताच्या हिताशी सुसंगत असे आहे. दोन्ही देशांनी द्विपक्षीय व्यापार कराराच्या आवश्यकतेवर सहमती दर्शविली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### द्विपक्षीय व्यापार कराराच्या चर्चेसाठी गोयल अमेरिकेत

आयात शुल्काबाबत जयशंकर म्हणाले की, गेल्या महिन्यात व्हाईट हाऊसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली होती. आता वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल द्विपक्षीय व्यापार करारावर चर्चा करण्यासाठी वॉशिंग्टनमध्ये आहेत. आम्ही शुल्काबाबत खुली चर्चा केली. त्या चर्चेनंतर द्विपक्षीय व्यापार कराराच्या आवश्यकतेवर सहमत झाली आहे.

## पंतप्रधान मोदींनी केली गंगा देवीची पूजा

◆ **उत्तराखंड, ६ मार्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी उत्तरकाशी जिल्ह्यातील देवी गंगेचे हिवाळी निवासस्थान असलेल्या मुखवा मंदिरात पूजा केली. पुजाऱ्यांनी वैदिक स्तोत्रांचा जप केला. पारंपरिक पोशाख परिधान केलेल्या स्थानिक लोकांनी मोदींच्या भोवती नृत्य सादर करून त्यांचे स्वागत केले. त्यांनी परिसराभोवती असलेल्या दूरवरच्या बर्फाच्छादित शिखरांचे सकाळचे दृश्य देखील अनुभवले.

मुखवा हे गंगा देवीला समर्पित गंगोत्री मंदिराच्या मार्गावर वसलेले एक गाव आहे. दरवर्षी हिवाळ्यासाठी दरवाजे बंद झाल्यानंतर गंगोत्री धाम येथून तिची मूर्ती मुखवा मंदिरात हलवली जाते. पंतप्रधान हर्षिल येथे ट्रेक आणि बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवतील आणि एका जाहीर सभेला संबोधित करतील. पंतप्रधान म्हणून मोदींच्या पहिल्याच भेटीमुळे उत्तराखंडमध्ये हिवाळी तीर्थयात्रा आणि पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. ◂ (वृत्तसंस्था)



देवी गंगेचे वास्तव्य असलेल्या मुखवा मंदिरात पूजा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

# आयएएस अधिकाऱ्यांना हवे 'आयपीएस'वर वर्चस्व

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

◆ **नवी दिल्ली, ६ मार्च**

भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) अधिकारी अनेकदा भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) व भारतीय वन सेवा (आयएफएस) अधिकाऱ्यांवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतात, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

वनसंपत्तीच्या वनीकरण आणि संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी असलेल्या भरपाई वनीकरण निधी व्यवस्थापन व नियोजन प्राधिकरण (कॅम्पा) निधीच्या गैरवापरावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. न्या. भूषण गवई आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायासनाने म्हटले आहे की, सरकारी वकील आणि न्यायाधीश म्हणून आपल्या अनुभवावरून आयएएस अधिकारी हे आयएफएस व आयपीएस अधिकाऱ्यांवर वर्चस्व गाजवतात.

न्या. गवई म्हणाले की, आयएएस अधिकाऱ्यांची वर्चस्व गाजवण्याची प्रवृत्ती सर्व राज्यांमध्ये कायम आहे. यामुळे आयपीएस आणि आयएफएस अधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. सर्वोच्च न्यायालयाने आयफोन व लॅपटॉप खरेदी करण्यासारख्या गैर-अनुज्ञेय कामासाठी कॅम्पा निधी वापरला जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आणि संबंधित राज्याच्या मुख्य सचिवांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश दिला. अधिकाऱ्यांमधील अंतर्गत संघर्षाचे निराकरण करण्याचा प्रयत्न करू, असे महान्यायवादी तुषार मेहता यांनी सांगितले.. ◂ (वृत्तसंस्था)

# गाझा पट्टीत आता जगण्यासाठी संघर्ष!

## अन्न, औषधांचा पुरवठा रोखल्याने महागाईचा भडका

◆ **जेरुसलेम, ६ मार्च**

इस्राईलने अन्न, इंधन, औषधे व इतर वस्तूंचा पुरवठा रोखल्यामुळे गाझा पट्टीत सुमारे २० लाखांहून अधिक लोकांचा जगण्यासाठी संघर्ष सुरू आहे. इस्राईलच्या या कृत्यामुळे महागाई गगनाला भिडली असून, गाझा पट्टीत मानवतावादी संघटनांकडून कमी होत चाललेल्या साठ्यांचे गरजू लोकांना वाटप करण्यात येत आहे.

इस्राईल आणि हमासदरम्यानच्या १६ महिन्यांच्या युद्धानंतर नुकताच जानेवारी महिन्यात शस्त्रसंधी करार करण्यात आला. या कराराच्या पहिल्या टप्प्यात गेल्या सहा आठवड्यांत मदत पथकांनी केलेली प्रगतीही इस्राईलच्या या निर्णयामुळे धोक्यात आली आहे. गाझा पट्टीतील संपूर्ण लोकसंख्या सध्या ट्रकद्वारे होणाऱ्या अन्न व इतर वस्तूंच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे. येथील बहुतांश लोक आपल्या घरातून विस्थापित झाले असून, अनेक जण मदत छावण्यांत राहत आहेत.

रुग्णालये, पाण्याचे पंप, बेकरी, दळणवळणासह मदतसाहित्य पुरविणाऱ्या ट्रकसाठीही इंधनपुरवठा गरजेचा आहे. इंधनाबरोबरच अन्न तसेच इतर वस्तूंचा पुरवठाही धोक्यात आला आहे. गाझातील मदत पथकाकडून सर्व साठ्याचा आढावा घेतला जात आहे. शस्त्रसंधीच्या पहिल्या टप्प्यात मानवतावादी संघटनांकडून मदतकार्याला वेग देण्यात आला. गाझापट्टीत अधिक स्वयंपाकघरे, आरोग्य तसेच जलकेंद्र उभारण्यात आली. गाझा पट्टीत पुन्हा परतणाऱ्या पॅलिस्टिनींसाठी जवळपास एक लाख तंबू उभारण्यात आले. मात्र, हे सर्व मदतकार्य जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे. आंतरराष्ट्रीय बचाव आयोगाकडील ६.७ टन औषधे गाझा पट्टीत प्रवेश करण्याच्या प्रतीक्षेत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवतावादी कार्यालयाच्या माहितीनुसार भाज्या व पीठाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ३२ कार्यालयांना हिंदी दक्ष कार्यालयाचा दर्जा!

◆ **नवी दिल्ली, ६ मार्च**

सरकारी कार्यालयांमध्ये हिंदीचा वापर वाढवण्यासाठी गृह मंत्रालयाने एक मोठा उपक्रम हाती घेतला आहे. मंत्रालयाने आयटीबीपी, एनडीआरएफ आणि सीआयएसएफसह ३२ कार्यालयांना हिंदी दक्ष कार्यालये म्हणून मान्यता दिली आहे. येथील ८२ टक्के कर्मचाऱ्यांनी हिंदीत काम करण्याचे ज्ञान मिळवले आहे. केंद्रीय संस्थांमध्ये भाषिक एकरूपता आणण्यासाठी केंद्र सरकारने हा उपक्रम हाती घेतला आहे.

हिंदी दक्ष कार्यालय म्हणून मान्यताप्रार्पंत कार्यालयांमध्ये एकूण ३२ कार्यालये समाविष्ट आहेत. यात इंडो तिबेटीयन बॉर्डर पोलिसांची सात कार्यालये, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पाच आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची २० कार्यालये समाविष्ट आहेत. गृह मंत्रालयाचे म्हणणे आहे की, हा उपक्रम हिंदी आणि प्रादेशिक भाषांमधील कामाला प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. गृह मंत्रालयाने गेल्या आठवड्यात आपल्या अधिकाऱ्यांना आणि सीएपीएफ कर्मचाऱ्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांच्या कार्यालयांमध्ये हिंदी भाषेतील प्रवीणतेला मान्यता देणारी अधिसूचना जारी केली होती. या ऐतिहासिक निर्णयात गृह मंत्रालयाने एप्रिल २०२३ मध्ये केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांसाठी कॉन्स्टेबल (जनरल ड्यूटी) परीक्षा हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त १३ प्रादेशिक भाषांमध्ये घेण्यास मान्यता दिली होती. ◂ (वृत्तसंस्था)



## अग्रलेख...

# आव्हानांच्या छाताडावर...

कोणत्याही सरकारकडून जनतेच्या काही अपेक्षा असतात. सामान्यतः शांततापूर्ण जगण्याचा नैसर्गिक हक्क जपला जावा, ही सर्वसामान्य जनतेची सरकारकडून असलेली प्राथमिक आणि वास्तविक अपेक्षा असल्याने त्या अपेक्षेस धक्का लागणार नाही, याची खबरदारी घेणे व तसा विश्वास जनतेच्या मनात रुजविणे ही सरकारांची जबाबदारी असते. याचे मुख्य उत्तरदायित्व सरकारचे प्रमुख या नात्याने देशाच्या संदर्भात पंतप्रधान किंवा राज्यांच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांवर असते. १५ ऑगस्ट २०१४ रोजीच्या स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून देशातील जनतेस उद्देशून केलेल्या आपल्या पहिल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच अपेक्षापूर्तीचे आश्वासन दिले होते. जनतेस सुरक्षित आणि शांततापूर्ण जीवनाची हमी देण्यासाठी सरकार आणि समाज यांच्यात मानसिक समन्वयाची गरज असते. त्यासाठी ज्याप्रमाणे सरकारकडून जनतेच्या काही अपेक्षा असतात, तशाच अपेक्षा सरकारांनी जनतेकडूनही ठेवावयास हव्यात. असे झाले तर जनजीवनाचा गाडा सुरळीत चालतो. १० वर्षांपूर्वीच्या त्या भाषणात मोदी यांनी जनतेस काही हमी देतानाच जनतेकडून काही अपेक्षाही अप्रत्यक्षपणे व्यक्त केल्या होत्या. प्रामुख्याने समाज आणि सरकार यांच्यातील दुवा असलेल्या प्रशासन व्यवस्थेस त्यांनी खडे बोल सुनावले होते. यापुढे 'चलता है' संस्कृती चालणार नाही, असे बजावतानाच, 'क्षमता सिद्ध करा, नाही तर चालते व्हा' असा थेट इशाराच त्यांनी त्यावेळी दिला होता. आज त्या भाषणाची, त्या इशाऱ्याची आणि त्या अपेक्षांची आठवण ठेवण्याची वेळ आली आहे. कारण, देशातील सामाजिक, राजकीय, प्रशासकीय परिस्थितीवर त्या इशाऱ्याचा आणि अपेक्षांचा काय परिणाम झाला, त्यात सरकारची जबाबदारी किती, समाजाची जबाबदारी किती आणि अपेक्षापूर्तीच्या या पर्वात समाजाने काय मिळविले, सरकारांनी काय मिळविले याचा धांडोळा घेणे आवश्यक ठरते. विशेषतः गेल्या काही महिन्यांत विधानसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार अस्तित्वात आल्यानंतर राज्यात ज्या काही सामाजिक, राजकीय उलथापालथींचा गदारोळ सुरू आहे, ते पाहता, महाराष्ट्रापुरते तरी पंतप्रधानांच्या त्या वक्तव्याची आठवण करून घेणे गरजेचे ठरले आहे. स्वच्छ, पारदर्शक प्रशासन ही सामान्य माणसाच्या सुरक्षित आणि शांततापूर्ण जगण्याचा हक्क जपण्याची पहिली गरज असते. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी या गरजेच्या पूर्ततेसाठी हमीपूर्वक सुरू केलेल्या वाटचालीची फळे किंवा परिणाम आता दिसू लागले आहेत. अर्थात्?, स्वच्छ प्रशासनासाठी काही वेळा कठोर निर्णयांची आवश्यकता असते. तसे करणे हे एक आव्हान असते. त्यासाठी आवश्यक असलेली कृती करणे सोपे नसते, अनेकदा त्याचे राजकीय परिणाम गंभीरदेखील असू शकतात. कदाचित त्यामुळेच कठोर निर्णय घेताना बोटचेपेपणा दाखविणे नेत्यांस भाग पडते आणि त्याचे थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम जनजीवनास भोगावे लागतात. ते टाळण्याकरिता आव्हानाच्या छाताडावर पाय देऊन उभे राहण्याचे धाडस दाखविताना, जनतेस सुरक्षित जगण्याच्या हमीचे उत्तरदायित्व पेलणाऱ्या मुख्यमंत्र्यांना प्रशासन, सरकार आणि समाजाचीही सक्षम साथ आवश्यक असते. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात उफाळून आलेल्या अस्वस्थ वातावरणावर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उचललेली कठोर पावले ज्या दिशेने महाराष्ट्रास घेऊन जाऊ पाहात आहेत, ते पाहता ती वाट सोपी नाही, हे स्पष्ट असले, तरी जनतेच्या प्राधान्याच्या अपेक्षांची पूर्तता करण्याचा त्यांचा निर्धार अदम्य आहे, हे स्पष्ट दिसू लागले आहे. सरकार स्थापन करण्याच्या मुहूर्तावरच त्यांनी या दिशेने पहिले पाऊल टाकले, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. सातत्याने सत्ताकारणाच्या केंद्रस्थानी असल्यामुळे आणि त्यामुळेच महत्त्व प्राप्त झालेल्या काही प्रस्थापितांना मंत्रिमंडळातून वगळण्याच्या निर्णयामुळे फडणवीस सरकारची वाटचाल खडतर राहील, अशी अटकळही बांधली जात होती. क्षमता सिद्ध करा किंवा चालते व्हा, हा पंतप्रधान मोदी यांनी दिलेला संदेश केवळ नोकरशाहीसाठी नव्हता, तर सरकारसोबत काम करण्याची जबाबदारी असलेल्या प्रत्येकासाठी होता, हे अनेकांस गेल्या १० वर्षांत बहुधा उमगलेच नव्हते. भरभक्कम जनादेश प्राप्त होताच, जनतेच्या आपल्यावरील विश्वासाच्या खात्रीने देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच या संदेशाचे तंतोतंत पालन केले आणि दिग्गज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही नेत्यांच्या हाती नारळ दिला. संघटनेची गरज लक्षात घेऊन भारतीय जनता पक्षातीलही काही नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही, पण पक्षाची कार्यपद्धती जाणून असलेल्यांना त्याचे फारसे आश्चर्य वाटले नाही.

प्रस्थापितांना सत्तेबाहेर ठेवणे हा फडणवीस यांचा पहिला धक्का होता, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. बीडमधील मस्साजोगच्या सरपंचांच्या भीषण हत्येप्रकरणी समोर येऊ लागणारे वास्तव कोणत्या दिशेला पोहोचणार, याची जाणीव होताच त्यांनी आपल्या प्रशासन कौशल्याचा कठोर वापर सुरू केला आहे. हे आव्हानही सोपे नाही, याची पुरेपूर खात्री असतानाही त्यांनी धनंजय मुंडे यांना राजीनामा देण्यास भाग पाडून जनतेच्या अपेक्षापूर्तीसाठी जबाबदारीचे भान राखले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावयास हवे. मुंडे यांच्या राजीनाम्याने राजकारण ढवळून निघेल, सत्तेतील सहकाऱ्यांमध्ये असंतोष उफाळेल वगैरे अटकळींचे मुटकुळे बांधून फडणवीस यांनी घेतलेल्या या निर्णयानंतर आता शासनातील स्वच्छता मोहीम वेग घेणार, हे स्पष्ट झाले आहे. मुंडे यांचा राजीनामा घेतल्यानंतर सरकारमध्ये महत्त्वाच्या स्थानावर बसलेल्या अन्य काही नेत्यांच्या भवितव्यावरही निर्णय घेण्याचे कर्तव्य फडणवीस यांना बजावावे लागणार आहे. त्यात मंत्रिपदावर असलेले सहकारी पक्षांचे काही नेते आहेत आणि स्वपक्षाच्या काही नेत्यांनाही आपले निर्दोषित्व सिद्ध करावे लागणार आहे. मस्साजोगचे सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांच्या राक्षसी हत्याप्रकरणामागील कटाचे काही धागेदोरे धनंजय मुंडे यांच्याकडे निर्देश करीत असल्याने सामाजिक रोषाचा उद्रेक होऊनही, केवळ आततायीपणाने त्यांच्यावर कारवाई न करता काही निश्चित संकेत प्राप्त होताच विनाविलंब कारवाई करून त्यांनी मुंडे यांना राजीनामा देण्यास भाग पाडले. आता सहकारी पक्षातील माणिकराव कोकाटे यांच्या संदर्भात निर्णय घेण्याची कसोटी मुख्यमंत्र्यांना पार पाडावी लागणार आहे. सरकारची फसवणूक केल्याचा आरोप असलेली व्यक्ती थेट सरकारमध्येच असणे राजकीय सभ्यतेच्या संकेतास धरून नसते. पारदर्शकपणे आणि संविधानाचे पालन करून पदाचे पावित्र्य राखण्याची शपथ घेतलेल्या मंत्र्यावर असा आरोप असणे हे एकूणच सरकारच्या प्रतिमेस आणि प्रतिष्ठेसही बाधा आणू शकते. कोकाटे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री आहेत. त्यांच्यावरील फसवणुकीचा ठपका न्यायालयाने पुसून टाकलेला नाही. त्यांच्या शिक्षेस तात्पुरती स्थगिती मिळाल्याने त्यांचे मंत्रिपद तूर्त वाचल्याची भावना व्यक्त होत असली, तरी कारभारातील पारदर्शकतेची आणि स्वच्छतेची हमी देणाऱ्या सरकारमध्येच असा कलंक असलेली व्यक्ती असल्यास प्रतिमा आणि प्रतिष्ठेचे काय होणार, याचा विचार करणे फडणवीस यांना अपरिहार्य ठरणारच आहे. अगोदरच्या महायुती सरकारच्या काळातीलच काही निर्णयांचा फेरविचार करण्याचे, काही निर्णयांना स्थगिती देण्याचे आणि काही निर्णय पूर्ण रद्द करण्याचे धाडस दाखवून फडणवीस यांनी 'चलता है' संस्कृतीला धक्का दिला आहे. ते योग्यच आहे.

सरकार आणि समाज यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे हे मुख्यमंत्र्यांचे कर्तव्य असते. विश्वास जपण्याची हमी देणारे निर्णय कटू असतील, कठोरही असतील; पण त्यामुळेच समाजाच्या नैसर्गिक हक्कांची जपणूक होत असेल, तर अशा निर्णयांच्या परिणामांची पर्वा न करता पावले टाकण्याचे आव्हान पेलण्याचे धाडस फडणवीस यांनी दाखविले आहे. सत्ता सांभाळण्यासाठी समाजाच्या विश्वासास वेठीला धरणाऱ्या बोटचेप्या राजकारणाचा काळ आता मागे पडत चालला आहे, याची चुणूक दिसू लागली आहे. समाजाच्या अपेक्षापूर्तीची आपली जबाबदारी पार पाडण्यास सरकार सिद्ध झाले आहे. आता त्यासाठी आवश्यक असलेले नैतिक पाठिंब्याचे बळ सरकारला देण्याची जबाबदारी समाजाची असणार आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१४)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

कुरुक्षेत्रावर काही वर्षांपूर्वी अमेरिका आणि रशिया यांच्या संयुक्त अणुशास्त्रज्ञांच्या चमूने संशोधन करून महाभारतीय युद्ध हे द्वापारयुगातील 'ऑटोमिक वॉर' होते, यावर शिक्कामोर्तब केले. त्याचा स्पष्ट अर्थ असा निघतो की, भारतीयांना सहस्त्रावधीच नव्हे, तर लक्षावधी वर्षांपासून अणू विज्ञानाची माहिती होती. त्या विज्ञानाच्या साह्याने त्यांनी असुरी शक्तींचा, दुष्ट शक्तीचा सनातन धर्म नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या धर्मद्रोही विध्वंसक शक्तींचा नाश केला. त्याचमुळे इतिहासाच्या प्रदीर्घ आक्रमणकारी आणि संघर्षमय कालखंडात हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि हिंदू समाज आपल्या परंपरा आणि वैशिष्ट्यांसह टिकला; त्याचेच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नुकत्याच झालेल्या प्रयागच्या कुंभमेळ्यात सुमारे ६६ कोटी हिंदूंनी श्रद्धेने मंगलस्नानाची डुबकी घेतली. रशिया, अमेरिका या देशांपर्यंतच ही जिज्ञासा आता थांबलेली नाही तर अनेक देशांमध्ये प्राचीन भारतीय अनेक शास्त्रांचे अधिकृत अध्ययन, संशोधन करणारे अध्यासने निर्माण झाली आहेत. अमेरिकेतील 'नासा' या प्रसिद्ध संशोधन केंद्रात प्राचीन भारतीय अनेक शास्त्रांचा प्राधान्य क्रमाने अभ्यास केला जातो. याची अधिकृत माहिती मला त्याच संस्थेत सुमारे १७ वर्षे संशोधक म्हणून कार्यरत असलेले मूळ निवासी बंगळुरू येथील डॉ. एस. राव यांनी दिली. त्याचे असे झाले-

सेवानिवृत्तीनंतर मी पुण्याला सुमारे १५ वर्षे होतो. संघकार्याशी संबंधित होतो. संघ म्हणेल ते काम करीत होतो. तेथील अनेक दायित्वांपैकी गीता धर्म मंडळाशी संचालक सदस्य म्हणून संबंधित होतो. गीता धर्म मंडळाच्या अनेक उपक्रमांपैकी 'नित्यज्ञान सत्र' या उपक्रमाची जबाबदारी माझेकडे होती. एक दिवस बैठक चालू असताना तेथे डॉ. एस. राव यांचे आगमन झाले त्यांनी त्यांचा परिचय दिला. त्यात नासामधून सेवानिवृत्त होऊन आता मायदेशी परत आल्यावर प्राचीन भारतीय विविध शास्त्रांचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करणारी एक संस्था काढण्याचा मानस आहे, त्याच हेतूने पुणे येथील वैदिक संशोधन मंडळ, भांडारकर इन्स्टिट्युट गीता धर्म मंडळ अशा प्रस्थापित आणि प्रसिद्ध संस्थांना मी भेटी देत आहे. 'टु फाईंड द सोर्सेस अँड रेफरन्सेस फॉर माथ प्रपोजड प्लॅनिंग-' त्यासाठी मी महिनाभर येथे राहणार आहे, असे त्यांनी सांगितले. बैठक संपली. पण मला गीता धर्म मंडळात नित्य चालणाऱ्या ज्ञानसत्रात भाषण देण्यासाठी एक आधुनिक विज्ञान युगातील 'वैज्ञानिक' आणि तेही नासासारख्या विश्वविख्यात संस्थेमधील वक्ता सापडला. माझ्या दृष्टीनने तर ती पर्वणीच होती. दुसऱ्या दिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन मी त्यांची भेट घेतली. त्यांना उपक्रमाची माहिती दिली. त्यांनी मान्य केले. त्यांच्याशी विचारविनिमय करून त्यांना पुढील दोन विषय व्याख्यानासाठी दिले ते असे -

- 'रामायणातील रामसेतू ही वास्तवता की कविकल्पना?' (कारण त्या काळात हा विषय 'हॉट अँड बर्निंग टॉपिक' होता) आणि दुसरा 'भारतीय प्राचीन संस्कृतीतील विविध शास्त्र परंपरा आणि आधुनिक विज्ञान.'

वरील दोन्हीही विषयांच्या अनुषंगाने त्यांनी विलक्षण आणि आश्चर्यमुग्ध करणारी माहिती दिली. ते म्हणाले, ''आमच्या नासातील संशोधकांनी उपग्रहातील अत्याधुनिक उपकरणांच्या साह्याने जे फोटोग्राफ्स घेतले, त्यात रामेश्वरमच्या समुद्रधुनीपासून तो लंकेपर्यंतचा एक समुद्रांतर्गत असलेला कसल्या तरी बांधकामाचा (ब्रिज-वे) स्पष्टपणे दिसतो. त्याला त्यांनी 'अॅडम्स-ब्रिज' असे जरी म्हटले तरी त्या आपल्या रामायणातील उल्लेखाप्रमाणे तो 'रामसेतू'चं आहे. कारण आधुनिक मोजमाप करण्याच्या पद्धतीप्रमाणे त्या सेतूचे वय नासातील शास्त्रज्ञांनी १७ लक्ष ३२ हजार वर्ष पूर्व काढले आहे. आपल्या युग कालगणनेप्रमाणे ते वय १७ लक्ष २८ हजार निघते. त्यामुळे रामसेतूच्या अस्तित्वामुळे आपले रामायण सिद्ध होते. प्रभू रामचंद्रांचा अवतार सिद्ध होतो.'' त्यांच्या या सखोल, संशोधित माहितीमुळे नित्य ज्ञानसत्रात सहभागी झालेले सर्व आनंदित झाले. या बाबतीत प्राध्यापक असलेल्या एका भगिनीने त्यांना प्रश्न विचारला की, हे जर इतके स्पष्ट आहे तर ''रामायण हे झालेच नाही हे 'शपथपत्रावर' (Affidavit) काही लोक कसे लिहून देतात?'' त्यावर ते म्हणाले, ''ही केवळ तुष्टीकरण नीती आहे. त्याने रामसेतू आणि रामायणावर काही परिणाम होत नाही.'' दुसऱ्या दिवसाच्या दिलेल्या विषयावर बोलताना त्यांनी विविध शास्त्रातील पारंपरिक असलेल्या अनेक संकल्पनांमागील विज्ञान मांडले. त्यातील अनेक महत्त्वाच्या संकल्पना या महाभारतातील होत्या. आधुनिक काळातील 'टेस्ट ट्यूब बेबी' आणि कौरवांच्या उत्पत्तीपासून तो महाभारतातील अणू विज्ञानावर आधारित अस्त्र परंपरेपर्यंत. ते म्हणाले, ''आजचे युद्ध विज्ञान हे तांत्रिक कौशल्यावर व एनर्जीवर आधारित आहे. एके फॉर्टी सेव्हन, मिसाईल, टारगेट- ओरिएंटेड मिसाईल, द्वारकेच्या संरक्षणासाठी शत्रूचा हल्ला झाल्याबरोबर त्याचा प्रतिकार करणारी यंत्रणा (ऑटोमॅटिक डिफेन्स सिस्टिम) तिच्या तटबंदीच्या चारही दिशेला प्रस्थापित केलेली होती. अत्याधुनिक युद्धात वापरल्या जाणाऱ्या सर्व अस्त्रांच्या बीजभूत संकल्पना या महाभारतात वर्णन केलेल्या दिसतात. भीष्म, द्रोण, अर्जुन यांनी एका वेळी शेकडो बाणांचे प्रक्षेपण करण्याचे युद्ध विज्ञानाचे आधुनिक स्वरूप म्हणजे एक फॉर्टी सेवन, मल्टी मिसाईलचा मारा करणारे रणगाडे, विराट युद्धात संमोहनशास्त्राच्या माध्यमातून कौरवांच्या सर्व प्रमुख योद्ध्यांना मूर्च्छित करण्याचा आधुनिक अवतार म्हणजे शत्रूच्या बंकर्समध्ये फोडण्यात येणारे विविध गॅस-पिल्स्, छोटे गॅस सिलेंडर्स-''

या भाषणाचा समारोप करताना त्यांनी मांडलेल्या विचारांनीच आपण या लेखाचा शेवट करूया. ते म्हणाले, ''आपली ज्ञानपरंपरा, शास्त्रपरंपरा अतिशय श्रेष्ठ आहे. कारण ती ऋषिमुनींच्या ऋतंभरा प्रज्ञेतून (बियाँड स्पेस अँड टाईम) निर्माण झाली आहे. त्यामुळे रामायण-महाभारत या महाकाव्यांचा, त्यातील विखुरलेल्या जीवनस्पर्शी, वैज्ञानिक बीजभूत असलेल्या अनेक संकल्पनांचा, आजच्या परिस्थितीच्या संदर्भात, आजच्या प्रगत विज्ञानाच्या संदर्भात विचार नवीन पिढीने आवश्यक केला पाहिजे. आपल्या पूर्वजांनी संशोधित करून ठेवलेले संचित अतिशय भव्य दिव्य आहे. नासातील अंतराळ संशोधक (स्पेस सायंटिस्ट) भारतीय खगोल विज्ञानाचा, जोतिष विज्ञानाचा, वराहमिहीर, आर्यभट्ट यांच्या ग्रंथांचा मुळातून अभ्यास करतात. "Thay get the radymade formulas and find the solution'- मग आम्ही का मागे राहावे?''

- विचारी मना तूची शोधूनि पाहे. (माझ्या जवळील टिपणावरून)

९८६०२९६१३१


(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# पाण्याचे पुण्य अन् बॉटलचे मूल्य

जग वेगाने जवळ येते आहे. माणुसकी तेवढ्या वेगाने संपत चालली आहे. कुटुंब व्यवस्था ढासळत चालली आहे. संस्काराचे तुणतुणे वाजवले जात असले, तरी कुटुंब व्यवस्थेच्या चिंध्या होत आहेत. मोबाईल, इन्स्टाग्राम, समाजमाध्यमांवर दोषारोप करून आपण हात झटकत असलो, तरी सदृढ समाजाची जबाबदारीही आपलीच आहे. समाजात विकृती आणि परिवारात कटूता वाढत चालली आहे. स्पर्धेतून द्वेषाची भावना बळावत चालली आहे. अभ्यासाने माणूस शिक्षित होतो. परंतु, त्याला सुशिक्षित म्हणता येणार नाही. अभ्यासात हुशार असलेल्यांना व्यवहार जमत नसल्याची अनेक उदाहरणं आहेत. अगदी गमतीने सुवर्ण पदकांची माळ गळ्यात पडलेल्याला बाजारात बटाटे आधी की टमाटर आधी विकत घ्यावे, याचे व्यावहारिक ज्ञान नसल्याचे म्हटले जाते. हा अतिशयोक्तीचा विषय असला, तरी समाजात बोटावर असे महाभाग वावरताना दिसून येतात. समाजावर राजकारणाचा पगडाही वाढतो आहे. समाजकारणातून राजकारणात जाणाऱ्यांच्या दारात आता फक्त हत्तीच डोलताना दिसून येत नाही. बाकी सर्व सुविधा हात जोडून उभ्या असतात. या सर्व गोष्टी ज्याच्या त्याच्या नशिबाने मिळत असल्या, तरी समाजात वावरताना स्वतःची जागा स्वतःच निर्माण करावी लागले. आता उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहेत. आजपासून १५-२० वर्षांपूर्वीपर्यंत गाव खेड्यांसह शहरातील चौकांमध्ये अगदी बसस्थानकावर मातीचे दोन रांजण त्यावर लाल कापड असलेल्या पाणपोई हमखास दिसत होत्या. फुकटचे पाणी नको म्हणून कोणी त्या ठिकाणी पाणी वाटप करणाऱ्याच्या हातावर चिल्लर पैसे ठेवत होते. हळूहळू समाजातून चांगल्या गोष्टी अदखलपात्र होऊ लागल्या. उन्हाळ्याच्या दिवसात प्रवासाला निघताना वॉटर बॅग हमखास सोबत घेतल्या जात होती. आता सर्वच बदलत जात



असल्याने पाणपोईही काळाच्या पडद्याआड गेली आहे. शासकीय कार्यालयांमध्ये उन्हाळ्यात रांजण दिसून होते. आता शासकीय कार्यालयात तर पिण्याच्या पाण्यासाठी दररोज थंड पाण्याच्या कॅन मागवल्या जातात. काही समाजसेवक उन्हाळ्यात चौकांमध्ये थंड पाण्याच्या कॅन ठेवतात. जीवन जगण्यात 'स्टेट्स' आल्याने अनेक गोष्टी सहज बदलत गेल्या. आता प्रवासात निघताना पिण्याच्या

पाण्यासाठी वॉटर बॅगची गरज नाही. बसस्थानकावरील ती पाणपोईही हरवली आहे. त्याची जागा आता 'बिसलरी'ने घेतली आहे. बरं, पाण्याची कोणतीही बॉटल ही बिसरलीच असते. आता हातोहात, पावलोपावली थंड पाण्याच्या बॉटल विक्रीसाठी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. बसस्थानकावर पाणीपोईसोबतच गावातील कोण्यातरी मोठ्या व्यक्तीच्या स्मृतीत साखळीने दोन पेले बांधून असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या दिसून येत होत्या. आता समाजसेवेतील पाणी पाजून पुण्य मिळवण्याचा भाव कमी होत असल्याने राज्य परिवहन मंडळानेच १५ रुपयांत नाथजल विक्रीसाठी बसस्थानक परिसरात उपलब्ध करून दिले आहे. एकंदरीत अल्प कालावधीत पाण्याच्या बॉटलने आपला जम बसवला आहे. पुण्य देणारे पाणी आता व्यवसाय झाले आहे. लिटर, अर्धा लिटरच्या पाण्याच्या बॉटलने प्रवासात तृष्णातृप्ती होते. हॉटेलात जेवायला गेल्यावर वेटरच नॉर्मल की चिल्ड विचारत बॉटल आणून ठेवू लागले आहेत. या प्रवासात पाण्याच्या बॉटलने आपले अस्तित्व निर्माण केले आहे. बॉटलची गरज लक्षात घेता आता त्याचे कारखाने तयार झाले आहेत. पाण्याच्या एक लिटरच्या १२ बॉटलचा बॉक्स ठोक बाजारात ८० रुपयांना मिळतो. याचा अर्थ सरासरी एक बॉटल ६ रुपये ५० रुपयांना मिळते. मात्र, पाण्याच्या बॉटलने आपली उपयोगिता सिद्ध केल्याने तिचे भावही स्थळ, काळपरत्वे बदलत जातात. अमेझॉनवर एक लिटर पाण्याची बॉटल १८ रुपयांची आहे. सुपर मार्केटमध्ये याच बाटलीची किंमत सुमारे २० रुपये आहे. चांगल्या हॉटेलमध्ये याच बाटलीची किंमत ३०-४० तर विमानतळावर त्या बॉटलची किंमत शंभरीच्या आसपास गेलेली असते. बाटली आणि ब्रँड एकच आहे, फक्त जागा बदलते. प्रत्येक ठिकाण एकाच उत्पादनाला वेगळे मूल्य देते. जेव्हा तुम्हाला असे वाटते की, तुमची काहीच किंमत नाही आणि प्रत्येक जण तुम्हाला खाली आणतो तेव्हा तिथे राहू नका, उठून नवीन जागा शोधा. ठिकाणे बदलण्याचे धाडस ठेवा आणि अशा ठिकाणी जा जेथे तुम्हाला तुमच्या लायकीचे मूल्य दिले जाईल. अन्यथा पाणपोईसारखे काळाच्या पडद्याआड जाऊन त्याची जागा बॉटल घेतल्याशिवाय राहत नाही.


९८८१९०३७६५

## दखल

# फडणवीसांचा 'मोदी अवतार'

**मोरेश्वर बडगे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालचे महायुतीचे सरकार सत्तेत आल्याला तीन महिने उलटले आहेत. या काळात बरेच काही घडलंय-बिघडलंय. पहिली विकेट पडली. दुसरीही डेंजर झोनमध्ये आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण मुंडे यांना भोवलं. तसं पाहिलं तर या हत्येशी त्यांचा थेट प्रत्यक्ष संबंध आहे, असं अजून तपासात समोर आलेलं नाही. सीआयडीने न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातही मुंडे यांचं नाव नाही. पण मारेकरी आरोपी मुंडेंशी संबंधित आहेत. या हत्येचा प्रमुख सूत्रधार वाल्मीक कराड हा आपला निकटवर्ती आहे, ही बाब मुंडे यांनीही लपून ठेवलेली नव्हती. त्यामुळे मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे आली. मुंडे राजीनाम्याला तयार नव्हते. त्यांच्या पक्षाचे म्हणजे राष्ट्रवादीचे सुप्रीमो अजितदादा पवार यांनाही त्यांचा राजीनामा मागायची हिंमत झाली नाही. 'योग्य वेळेस राजीनामा घेतला जाईल' असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणत होते. ८४ दिवसांनी ती वेळ आली. सरपंचाला ज्या क्रूरतेने मारले गेले त्याचे पोलिसांनी पुराव्यादाखल आरोपपत्रात जोडलेले फोटो बाहेर आले आणि स्फोट झाला. राज्यात संतापाची लाट पसरली. 'लोहा गरम है. मार हतोडा' असा एक संवाद 'शोले' सिनेमात आहे. फडणवीसांनी हातोडा मारला. फडणवीसांनी घाई केली असती तर हा विषय भलताच भरकटला असता. त्याला मराठा विरुद्ध ओबीसी असे स्वरूप दिले जाण्याचा धोका होता. त्यामुळेच योग्य वेळेची वाट पाहिली गेली. 'मी त्यांना मुक्त केलंय' एवढेच फडणवीस बोलले. फडणवीसांना हा निर्णय सोपा नव्हता. धनंजय मुंडे हा मराठवाड्यातील अजितदादांच्या राष्ट्रवादीचा मोठा चेहरा आहे. शिवाय मराठ्यांच्या राष्ट्रवादीत मुंडे हे बलाढ्य ओबीसी नेते आहेत. दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे पुतणे आहेत. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना अजितदादांनी मागेच घरी बसवले. आता मुंडे यांनाही गमावले तर अवघड होईल, याची अजितदादांना चांगली कल्पना आहे. तरीही दादा फडणवीसांना रोखू शकले नाहीत. महायुती सरकार तिघांचे असले तरी मीच 'पॉवर सेंटर' आहे, ही गोष्ट फडणवीसांनी या निमित्ताने मित्रपक्षांच्या लक्षात आणून दिली आहे. मुख्यमंत्र्याला निर्णयाचा सर्वोच्च अधिकार असतो; मात्र निर्णय घेता आला पाहिजे. आपण कठोर निर्णय करू शकतो हे फडणवीसांनीही दाखवून दिले. सरपंचाच्या हत्येच्या मामल्यात बीड जिल्हाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र त्या



देशमुख कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे या प्रतीक्षेत आहे. त्या न्यायाची वाट प्रशस्त झाली हा विश्वास लोकांना मिळाला आहे. या राजीनाम्यातून एक गोष्ट स्पष्ट दिसली, ती म्हणजे महायुतीत 'देवेंद्र इज द बॉस.'

मात्र पुन्हा अडचण इथेच आहे. एक 'वाल्मीक कराड' असता तर टेन्शन नव्हते. हल्ली राजकारणाचा चिखल झाला आहे. प्रत्येक नेत्याकडे 'एक कराड' आहे. कुणाकुणाला संपवणार? मंत्रिमंडळच रिकामे होण्याचा धोका आहे. रावण एक होता म्हणून प्रभू रामचंद्राला सोपे गेले असावे. मुंडेंना राजीनामा मागून फडणवीसांनी आपल्या ४० मंत्र्यांना मोठा संदेश दिला आहे. स्वच्छ, पारदर्शी कारभार करा हा तो संदेश आणि इशाराही आहे. 'इतके दिवस मुंडेंचा राजीनामा का घेतला नाही' असा सवाल विरोधकांनी केला आहे. पण प्रश्नांना अर्थ नसतो. फडणवीसांनी योग्य वेळ साधली. महाआघाडी सरकारमध्ये गृहमंत्री अनिल देशमुखांवर आरोप सुरू होते तेव्हा शरद पवार त्यांच्या पाठीशी उभे होते. नवाब मलिक जेलमध्ये होते तेव्हा त्यांनी राजीनामा द्यावा असे तेव्हाचे सत्ताधारी म्हणत नव्हते. अटक झाली तरी नवाब मलिक राजीनामा देणार नाही, असे तेव्हा शरद पवार म्हणाले होते. 'तुरुंगात राहून सरकार चालविन' असे अरविंद केजरीवाल म्हणाले होते. मुद्दा हा आहे की, शरद पवार किंवा केजरीवाल जेव्हा हे बोलले तेव्हा आजचे विरोधक कुठे होते? महायुती सरकारला बदनाम करायचा अजेंडा विरोधकांनी हाती घेतलेला दिसतो. धनंजय मुंडे यांची पहिली विकेट घेतली. दुसरा नंबर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा लावायचा त्यांचा प्रयत्न आहे. सदनिका लाटल्याचा कोकाटे यांच्यावर आरोप आहे. खालच्या कोर्टाने दिलेल्या शिक्षेला नाशिक सत्र न्यायालयाने अपील चालेपर्यंत स्थगिती दिली आहे. इथेच हिट लिस्ट संपत नाही. सातारा जिल्ह्यातले ग्रामविकास मंत्री भाजपाचे जयकुमार गोरे यांच्या शिकारीची तयारी सुरू झाली आहे. अण्णा हजारे यांच्या तक्रारींवर तब्बल सहा मंत्री ओळीने घरी गेले होते. तसले काही सुरू आहे का? राजकारण कमालीचे नासले आहे हे कोणी नाकबूल करणार नाही. पण फडणवीसांनी सावध राहिले पाहिजे. कारण येणाऱ्या रात्री वैऱ्याच्या आहेत.

विरोधकांची पोटदुखी समजू शकते. हे सरकार पडणार नाही. पाडतो म्हटले तरी पडणार नाही एवढे ते भक्कम आहे. मात्र पुन्हा तोच 'फेक नॅरेटिव्ह' खपवण्याची विरोधकांची धडपड सुरू झाली आहे. जमेल तेवढे सरकारची बदनाम करण्याचा एकसूत्री कार्यक्रम सुरू आहे. दुर्दैवाने मीडियाला यात ओढले आहे. एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या बातम्या ता सरकारच्या पहिल्या दिवसापासून पेरल्या जात आहेत. ''मी नाराज नाही. आमच्यात कुठलेही 'कोल्ड वॉर' सुरू नाही, आमचा 'फेव्हिकॉल'चा जोड आहे,'' हे एकनाथ शिंदे यांनी जाहीरपणे सांगितले तरीही खुटीउपाडपणा सुरू आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना काँग्रेसवाल्यांचे फोन घेत नव्हते. मात्र त्याची कधी ब्रेकिंग न्यूज झाली नाही. आता शिंदे गावाला गेले तरी 'शिंदे नाराज' म्हणून कोल्हेकुई सुरू होते. उद्धव ठाकरेंना संपवण्यासाठी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केले गेले. भाजपाची ही मोठी रणनीती होती. वेळ बदलली तर आपल्याला बाजूला व्हावे लागेल याची शिंदे यांना पूर्ण कल्पना नसेल एवढे ते लिंबूटिंबू नाहीत. राजकारणात कोणीही अमरपट्टा घेऊन येत नाही, हे वास्तव शिंदे आता पचवताना दिसत आहेत. देवेंद्र फडणवीस स्वच्छ, पारदर्शक कारभारासाठी आग्रही आहेत. सरकारची प्रतिमा जपण्यासाठी प्रत्येक गोष्टीवर ते बारीक लक्ष ठेवून आहेत. प्रत्येकाला त्याच्या कामाचे 'आऊटपुट' द्यावे लागत आहे. त्यांच्या या 'मोदी अवतारा'ने मित्रपक्षातल्याही काहींची नक्कीच गोची झाली आहे. पण सांगतील कुणाला? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना वापरलेले मॉडिल फडणवीस इकडे वापरू लागले आहेत. पंतप्रधान कार्यालयात वारंवार येणाऱ्यांवर लक्ष ठेवले जाते. आपल्या मंत्रालयातही तसलीच व्यवस्था झाली आहे. काही जण एक पास काढून अनेक मंत्र्यांना भेटून येत. आता ज्याच्या नावाने पास काढला असेल त्यालाच भेटता येईल. मंत्र्यांचे अधिकारी, पीए नेमतानाही प्रथमच फडणवीसांनी मोठी चाळणी लावली. प्रत्येकाची पृष्ठभूमी तपासली गेली. चुकीच्या कामात अडकलेल्यांना नाकारले गेले. मंत्र्यांनी आपला स्टाफ म्हणून १२५ जणांची नावं पाठवली होती. फडणवीसांनी यातले १६ जण नाकारले. कारण ते 'फिक्सर' होते. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो, तर मग राज्याचा कारभार जिथून चालतो ते प्रशासन स्वच्छ का असू नये? त्यामुळे तुम्ही पाहाल. मंत्रालयात फालतू गर्दी दिसणार नाही. दलाल दिसणार नाहीत. फडणवीस त्यासाठी आग्रही आहेत. कारण महायुती सरकारचा तेच चेहरा आहेत. म्हणूनच धनंजय मुंडे यांना राजीनामा मागण्याचे नैतिक बळ त्यांनी दाखवले. तुम्ही लिहून ठेवा, फडणवीस असे एकाहून एक दणादण निर्णय घेताना दिसतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### विदर्भ क्रिकेट संघाची कौतुकास्पद कामगिरी

देशांतर्गत स्पर्धेतील अत्यंत प्रतिष्ठेचा असणारा रणजी करंडक विदर्भ क्रिकेट संघाने आपल्याकडे खेचून पुन्हा एकदा कौतुकास्पद इतिहास घडविला आहे. विदर्भ क्रिकेट असोसिएशनने अनेक उत्कृष्ट क्रिकेटपटू तयार केले आहेत. ज्यांनी विदर्भातील क्रिकेट इतिहासात ठसा उमटवला आहे, त्यापैकी चंदू सरवटे, विजय पिंपरीकर, अरुण ओगिरल, विजय तेलंग, अनिल देशपांडे, ही नावे आजही लक्षात आहे. अलिकडील



काळातील नाव म्हटले तर प्रशांत वैद्य याचे येते. अकोला जिल्हा क्रिकेट असोसिएशनद्वारा १९७० ते १९८० दरम्यानच्या काळात अंतर जिल्हा क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जात. त्यावेळी यातील बरेच रणजी खेळाडू नागपूर जिल्हा संघात असायचे. त्यांना पाहण्यास त्या काळात अकोला क्रिकेट असोसिएशनच्या ग्राऊंडवर प्रचंड गर्दी व्हायची. यामधील काही खेळाडूंची नंतर निवड सेंट्रल झोनसाठी व्हायची. विदर्भातील क्रिकेट खेळाडूंमध्ये प्रतिभा पहिल्यापासून होती. पण त्याकाळी रणजी ट्रॉफी जिंकण्याचे सोडा, मध्यप्रदेशाला चांगली लढत दिली तरी कौतुक वाटायचे. विदर्भ क्रिकेट असोसिएशन निवड समिती पदाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन चंद्रकांत पंडितांसारख्यांना प्रशिक्षक नेमल्यापासून रणजी ट्रॉफीमध्ये विदर्भाची क्रिकेट टीमसुद्धा असते हे उर्वरित महाराष्ट्राला समजले. भारतीय संघात प्रशांत वैद्य यांची निवड एक दिवसीय सामन्यासाठी होणे ही बाब निश्चित विदर्भासाठी अभिमानास्पद होती. यामुळे एक गोष्ट झाली की, विदर्भातील क्रिकेट प्रतिभावान खेळाडू असतात ही बाब महाराष्ट्राला माहीत झाली. यंदा केरळ क्रिकेट संघाला हरवून विदर्भाने रणजी ट्रॉफी तिसऱ्यांदा आपल्या कडे खेचून आणली आहे ही बाब विदर्भ सारख्या छोट्या प्रदेशाला आणि येथील खेळाडूंना तसेच येथील क्रिकेट प्रेमींना निश्चितच अभिमानास्पद आहे. यासाठी विदर्भ क्रिकेट असोसिएशन अभिनंदनास प्राप्त आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### आपले आप्तेष्ट

मनुष्याचे जीवन हे सुसंस्कारानेच भरले असेल तर जीवनभर सुख-दुःखाला आनंदाने सामोरे जाणे अत्यंत जरूरीचे आहे. सुखात तर आपण रममाण होतोच; पण दुःखातही रममाण होता आलं पाहिजे. दुःखाचे वर्णन आपण करू शकत नाही, पण सुखाचे वर्णन आपण करीत असतो. खरे म्हणजे दुःखातूनच जीवन सावरते. तुकाराम महाराजांनी सुख-दुःखाचे वर्णन सुंदर केलेले आहे. 'दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसती!' देव अशांच्याच घरात वास करतो. आपले मन, विचार आणि कृती ही परमेश्वराला आनंदीत करणारी असेल तर आपले जीवन धन्य झाले असे वाटते. म्हणून समाजात वावरताना आपण भावंडे आहोत, आपला बंधुभाव प्रेमाने भारला असेल तर आपणावरही सर्वजण प्रेम करायला लागतात. तेव्हा शुद्ध अंतःकरणाने आपण सर्वांना बंधू समजून वागले पाहिजे. अशावेळी आपण एकटे राहात नाही. मी समाजाचा व समाज माझा ही भावना जागृत होते. त्यामुळे जगण्याचा आनंद वाढतो. आपल्यावर प्रेम करणारे आप्तेष्ट नातेवाईक हेच आपल्या जीवनाचे आधारस्तंभ. मनुष्य कितीही मोठा असला, पण आप्तेष्टांचे प्रेमच नसेल तर काय कामाचे? म्हणून आप्तेष्टांच्या प्रेमाने आपुलकीने आपले जीवन कृतार्थ होते.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### शिवशाही बसमध्ये अपकृत्य

बसमध्ये बलात्कार पहिल्यांदा झाला नाही; यापूर्वीही गुन्हेगार सापडले. परंतु शिक्षेचा पत्ता नाही. त्यांना वेळेवर अंगावर काटा येणारी शिक्षा झाली असती तर कदाचित हे कृत्य घडले नसते. शिवशाही बसमधील गुन्हेगारांचे नाव समजले. त्याला ताबडतोब अटक करून सार्वजनिक ठिकाणी कठोर शिक्षा द्या. सुरक्षा कर्मचाऱ्यांना निलंबित केले हे योग्य आहे. परंतु चालक-वाहकाने बसला बंद का केले नाही? याचीही चौकशी व्हायला हवी. पीडिता सज्ञान असूनही तिने परक्या माणसावर विश्वास कसा ठेवला? बसमध्ये अंधार असताना का चढली? अनेक प्रश्न निर्माण होतात. ही घटना नक्कीच दुर्दैवी आहे. स्त्रियांनी सदैव सतर्क राहायला हवे. आपल्या स्त्रीत्वाची जाणीव ठेवावी. वृथा आत्मविश्वास दाखवू नये. परस्त्री मातेसमान म्हणणाऱ्या शिवाजी महाराजांचे नाव असलेल्या बसमध्ये ही घटना घडली. त्यांत छत्रपतीचा अपमान आहे. तेव्हा नावे ठेवताना त्यांचा अपमान, अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# महावितरण ई-उपविभागात लाईनमन दिन साजरा

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

महावितरण शहर ई उपविभाग येथे लाईनमन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता आशिष मेहता उपस्थित होते. अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. आशिष मेहता यांनी महावितरणमधील चालू घडामोडी, कर्मचाऱ्यांची सुरक्षा, ग्राहकाभिमुख तत्पर सेवा, प्रसंगाचे गांभीर्य, भविष्यात कामकाजामध्ये होणारे बदल यावर मार्गदर्शन केले. यावेळी सुनिल काळे, रविंद्र कोळी, रमेश कुंभार, संजय फताटे, प्रविण माने, अनिलकुमार बनसोडे, धनराज पारेकर, स्वप्निल कोरे, धुळाप्पा टेळे, सचिन कानडे, संतोष कुंभार, जैनोद्दीन शेख, रोहिदास डांगे, मल्लिनाथ मुन्नोळी, चंद्रकांत कोळी, किरणकुमार इरनाळे, प्रदीप मुलादे, अजिंक्य खिलारे, नितीन कोळी, नंदकुमार मार्तंड, श्रीशैल विजापूरे, बसवराज कुरे, उमेश शेवाळकर, अपेक्षा बहादुरे, चंद्रकला शिंदे, प्रमिला सुरवसे, अर्चना घोडके यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्ह्याचे व्यवस्थापक विनायक पासंगराव, डेव्हलपमेंट ऑफिसर जे. बी. ठाकूर, अजय मीना, परशुराम धुळे, वैभव जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले.

# घरफोडी, चोरीचे गुन्हे उघडकीस





## शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मार्च -**

रात्रगस्तीच्या वेळी शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एक टेम्पो पकडून कुंभारी येथील शारदा सुत मिलमधील मोठ्या मशिनरी गॅस कटरच्या मदतीने कट करून चोरून नेत असल्याचा प्रकार उघडकीस आणला. सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून घरफोडी व चोरीचे मिळून ३ गुन्हे उघडकीस आणले असून ५ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहर गुन्हे शाखेचे पोलिस पथक हे रात्र गस्त करीत असताना जोडबसवण्णा चौकाजवळील जमखंडी पूल येथील रस्त्यावर एका टेम्पोमध्ये संशयास्पद साहित्य घेऊन जात असल्याचे दिसून आले. त्यावेळी पोलिसांनी त्या टेम्पोला थांबवून त्याची तपासणी केली असता त्या टेम्पोमध्ये तीन व्यक्ती व मशनरीचे साहित्य आढळून आले. त्यावेळी पोलिसांनी टेम्पोतील तिघांकडे साहित्यांच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी हे साहित्य कुंभारी येथील एमएससी बँकेने सील केलेल्या शारदा सूत मिलमधील असल्याचे सांगितले. मिलमधील मोठ्या मशिनरी गॅस कटरच्या मदतीने कट करून ते विक्रिसाठी नेत असल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी याबाबत वळसंग पोलिस ठाण्याकडे चौकशी केली असता शारदा मिल मधील मशिनरी चोरीबाबत वळसंग पोलिस ठाण्याकडे गुन्हा दाखल असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी मिलचा सिक्युरिटी इनचार्ज शुभम लक्ष्मण पाटील (वय २६, रा. यशवंत नगर, घर नं. ५४, बाळे, सोलापूर), गॅस वेल्डींगचे काम करणार अरिफ नुरूद्दीन सय्यद (वय ३०, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, पाच्छा पेठ, सोलापूर) आणि टेम्पो चालक इरफान बाबू मुच्छाले (वय ३२, रा. जुना विडी घरकुल, कुंभारी) या तिघांना अटक केली.

तसेच चोरीचे सोन्या-चांदीचे दागिने विकण्यासाठी जाणाऱ्या फरजाणा अब्बास शेख (वय ४२, रा. गोदूताई विडी घरकुल, कुंभारी) या महिलेला ताब्यात घेऊन तिच्याकडील दागिन्यांबाबत चौकशी केली असता तिने दागिने चोरीचे असल्याचे सांगितले. या महिलेकडून १ लाख ७ हजार ५०० रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले असून सदर बझार पोलिस ठाण्यातील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड, पोलिस अंमलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, अर्चना स्वामी, बाळू काळे यांनी केली.

मनोरमा परिवार अंतर्गत
**महिला उद्योजक नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**
मनोरमा कॉम्प्लेक्स, अवंती नगर, जुना पुना नाका, सोलापूर
**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क
कु. अरुंधती पद्माकर नायडू, चेअरमन (मो. ९०२८७१७२७२)
सौ. मंजुश्री विजय कालेकर, व्यवस्थापिका (मो. ९८८१४५५११९)

# सराईत गुन्हेगार विकास पवार कारागृहात स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मार्च -**

वाहन चोरी व घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार विकास पवार यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एमपीडीए कायद्यान्वये कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. त्यानुसार एमआयडीसी पोलिस ठाण्याचे एक पथक पवार यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.



विकास भिवा पवार (वय २४, रा. धोत्रीकर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे स्थानबध्द करण्यात आलेल्याचे नाव आहे. पवार याच्याविरुध्द एमआयडीसी, जोडभावी पेठ, फौजदार चावडी, सलगर वस्ती आणि सदर बझार पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे १५ गुन्हे दाखल आहेत. पवार यास सन २०२२ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तरीही त्याच्या गुन्हेगारी वर्तणात सुधारणा झाली नव्हती. त्यामुळे त्याला एमपीडीए कायद्यान्वये कारागृहात स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव एमआयडीसी पोलिसांकडून पाठविण्यात आला होता. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, प्रमोद वाघमारे, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

## संक्षिप्त वृत्त

### कचरा टाकण्याच्या कारणातून मारहाण

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

येथील नवीन विडी घरकुल येथे कचरा टाकण्याच्या कारणातून तरुणाला दगडाने तसेच लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केले. हा




प्रकार बुधवारी रात्री अकराच्या सुमारास घडला. सतिश श्रीनिवास गुर्रम (वय ३७) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. घराजवळ कचरा टाकण्याच्या तसेच घराजवळ लघुशंका करण्याच्या कारणातून सतिश याची शेजारी राहणारे अंबादास, अनिल व व्यंकटेश यांच्यासह अन्य एकाबरोबर तक्रार झाली. यातून बुधवारी रात्री अकराच्या सुमारास चार जणांनी लोखंडी पाईप, दगड तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. पत्नी नेहा गुर्रम यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### हातावर विळीने मारून तरुणाने केले स्वत:ला जखमी

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

अज्ञात कारणातून तरुणाने स्वत: विळीने हातावर मारून घेऊन स्वत:ला जखमी केले. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील कौठाळी गावात बुधवारी रात्री दहाच्या सुमारास घडला. चांगदेव तुळशीदास जाधव (वय ३२) असे तरुणाचे नाव आहे. चांगदेव याने अज्ञात कारणातून विळ्याने स्वत: स्वत:च्या उजव्या हातावर विळीने मारून घेतले. यात उजव्या हातास जखम झाल्याने वडाळा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून चुलता भैरवनाथ याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे २ तास सत्यागृह आंदोलन

## जिल्हाधिकारी यांच्या मार्फत शासनाला कळविल्या भावना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**



राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी तसेच शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे गेले ३ महिने राज्यातील शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना सोलापूर व सरकारी-निम सरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीमार्फत १७ मागण्यांकडे शासनाचा लक्षवेध करुन घेणेसाठी आज दि.०६ मार्च २०२५ रोजी सोलापूर येथील जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुनमगेट येथे दुपारी १२.०० ते ०२.०० या वेळेत धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात एक निवेदन देवून त्यांच्या संघटनेच्या भावना शासनाला कळविल्या आहेत. याबाबत दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात पुढे नमूद केले आहे की, सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतचे विस्तृत परिपत्रक तात्काळ जाहिर करण्यात यावे. खुल्लर समितीचा अहवाल तात्काळ प्रसिध्द करा. पीएमआरडीए कायदा रद्द करण्यात यावा व फंड मॅनेजरकडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी. तसेच ईपीएस ९५ नुसार असणाऱ्या सर्व वर्गणीदारांना परिभाषित पेन्शन योजना लागू करण्यात यावी. सर्व कंत्राटी / रोजंदारी / अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमीत करा. सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण रद्द करा. सरकारी विभागांचे संकोचीकरण तात्काळ थांबवा. आठव्या वेतन आयोगाची सत्वर स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अन्यथा प्रत्येक ५ वर्षाच्या कालावधीनंतर वेतनमान पुनर्रचनेसाठी राज्याचा स्वतंत्र आयोग नेमावा आदी मागण्यांसह इतरही मागण्यांसाठी हे सत्यागृह आंदोलन करण्यात आले आहे. दरम्यान, या आंदोलनाची शासनाने दखल घेण्याचेही त्यांनी आवाहन केले आहे.

वरील प्रलंबित मागण्यासाठी धरणे सत्याग्रह आंदोलन यशस्वी करण्यासाठी जिल्हा तथा तालुका स्तरावरील राज्य सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर, नगरपरिषद-नगर पंचायत, तसेच इतर विभागाकडील अनेक कर्मचाऱ्यांनी उपस्थिती लावली होती. यासाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र राज्य शाखा, सोलापूरचे अध्यक्ष राजीव साळुंके, सरचिटणीस अमृत कोकाटे, सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक अशोक इंदापूरे, अध्यक्ष शंतनु गायकवाड आदींसह इतरही संघटना पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. तर काही पदाधिकाऱ्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनही केले.



# घराचा पत्रा पुढे घेतल्याने एकास मारहाण

**सोलापूर, दि. ६ मार्च -**

घरावरील पत्रा पुढे घेतल्याच्या कारणातून एकास मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी रात्री साडेआठ वाजता होटगी स्टेशन येथे घडला. हुसेन गुलाब शेख (वय ४७, रा. होटगी स्टेशन, मड्डी वस्ती, सोलापूर) असे मारहाण झालेल्या व्यकतीचे नाव आहे. यातील जखमी हुसेन याने त्यांच्या घरावरील पत्र्याचे काम केले. ते काही प्रमाणात पुढे आल्याने त्यांच्या शेजारी राहणारे युवराज सरवदे, प्रणव शिंदे, ऋषी शिंदे यांच्यासह अन्य दोघांनी लोखंडी रॉड व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात चेह-याला तसेच कमरेला मुकामार लागला. तसेच नाकातून रक्तस्राव झाल्याने मध्यरात्री दोन वाजता स्वत: उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## Classifieds

### पाहिजे

सोलापूर तसेच आसपासच्या जिल्ह्यात कॉम्प्रेसरच्या सेल्स, सर्व्हिससाठी, प्रतिनिधी हवा आहे. स्वराज न्युमॅटीक्स, सोलापूर
फोन : ८३८००५०४८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### नावात बदल

माझे जुने नाव **करजगी शिवराज मल्लिकार्जुन** असे होते. ते बदलून नविन नाव **करजगी शिवराज मल्लिकार्जुन** असे वाचण्यात यावे.
ऑफि. नं. (10856)
दि. 05/03/2025

### CHANGE IN NAME

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME IS **Balkrishan Anjayya Saggam** HAS BEEN CHANGED TO **Balkrishna Anjayya Saggam**
KINDLY NOTE

### CHANGE IN NAME

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME IS **Shaikh Ayeshabegam Parvijahamad** HAS BEEN CHANGED TO **Ayesha Parvijahamad Shaikh**
Resi. - 11, Amrut Nagar, Vijapur Road, Solapur - 413004
KINDLY NOTE
THE SAME. (10910 Dtd.06.03.2025)

## खरेदीपूर्व जाहीर नोडीस

दिनांक तमाम लोकांस विशेषतः शहर व ता. बार्शी तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे रातंजन येथील जमीन ग.नं. ९९/१ याचे क्षेत्र ४ हे. २४ आर + पो.ख ० हे.०१ आर आकार रु. ५.१५ पैसे यापैकी पुर्वेकडील बाजुचे क्षेत्र ० हे.८० आर आकार रु.०.७४ पैसे याची चतु:सिमा पुर्वेस सदर ग.नं. ९९/१ पैकी भारत उध्दव घोडके यांचे उर्वरित क्षेत्र, दक्षिणेस वैराग उस्मानाबाद रस्ता, पश्चिमेस सचिन व नितीश सहदेव जाधव यांची जमीन व उत्तरेस ग.नं. ९९/२ पैकी रामचंद्र उध्दव घोडके यांची जमीन येणेप्रमाणे जमीन आतील तदंगभूत वस्तुसह.

वर नमूद केलेली जमीन ही भारत उध्दव घोडके, रा. मालेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी वर नमूद त्यांचे नांवाची नोंद आहे. सदर मिळकत भारत उध्दव घोडके, रा. मालेगांव, ता. बार्शी यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलास कायम खुषखरेदी देणेचा ठराव केलेला असून इसारादाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान जमीन मालकानी आमचे खरेदीदार अशिलास दिलेला आहे.

याउपरही या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कोणीही गहाण, दान, साठेखत, खरेदीखत, बँक लोन, खाजगी सावकारी, नोटरी वा तत्सम स्वरुपाचा कोणतेही व्यवहार वा दस्त असलेस, वहिवाटीचे हक्क असलेस संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसात आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह येवून आमची खात्री करुन द्यावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत ही खरेदीयोग्य व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल पुढील ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुरा करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ०६/०३/२०२५

सही/-
**ॲड. गणेश ज्ञानोबा जगताप**
**बी.एस.एल., एल.एल.एम**
**स्वामी समर्थ कॉम्प्लेस, कोर्टासमोर, बार्शी,**
**ता. बार्शी जि. सोलापूर (अशिलातर्फे ॲडव्होकेट)**
**मो.नं. ९०११३३९९३८**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं.४४/२०२२
नि.नं. २४

**बार्शी येथिल मे. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

**सौ. करुणा नागनाथ लिगाडे,** वय- ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सौंदरे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**१) किरण उत्रेश्वर आंधळकर,** वय - ५५ वर्षे, धंदा - शेती, रा. ३८१४, शिवाजी आखाडा, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) कल्पना उत्रेश्वर आंधळकर, (लग्नानंतरचे नाव) कल्पना संगप्पा मसुडगे,** वय - ५७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. शांतीसागर हौसिंग सोसायटी, सिव्हील हॉस्पिटलच्या पाठीमागे, मिरज, ता. मिरज जि.सांगली — **सामनेवाला**

**अर्ज - Bombay Regulation Act section VIII चे कलम २ प्रमाणे**

ज्या अर्थी, यातील अर्जदार व सामनेवाला नं. १ व २ यांनी मयत कुसुम उत्रेश्वर आंधळकर व किर्तीकुमार उत्रेश्वर आंधळकर हे अनुक्रमे दि. १६/१२/२०१८ व दि. १२/११/२०१० रोजी मयत झालेले असल्याने यातील अर्जदार यांनी मयत कुसुम उत्रेश्वर आंधळकर व किर्तीकुमार उत्रेश्वर आंधळकर यांचे पश्चात यातील अर्जदार व सामनेवाला नं. १ व २ हे जवळचे व कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदार व सामनेवाले नं. १ व २ यांचे शिवाय मयत कुसुम उत्रेश्वर आंधळकर व किर्तीकुमार उत्रेश्वर आंधळकर यांना दुसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयताचे पश्चात यातील अर्जदार व सामनेवाले नं. १ व २ यांना शासकीय सवलती व इतर लाभ मिळणेसाठी अर्जदारांना वारस दाखला मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी मयत कुसुम उत्रेश्वर आंधळकर व किर्तीकुमार उत्रेश्वर आंधळकर यांचे पश्चात यातील अर्जदार व सामनेवाला नं. १ व २ हेच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना त्यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणेसाठी अर्जदाराचा हा अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार व सामनेवाले नं. १ व २ यांचे व्यतिरीक्त मयत कुसुम उत्रेश्वर आंधळकर व किर्तीकुमार उत्रेश्वर आंधळकर यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता ०७/०४/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ०६/०३/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**बार्शी, ता, बार्शी**

## तहसिल कार्यालय बार्शी
**(कुळ कायदा शाखा)**

दुरध्वनी क्र. (०२१८४) २२२२१३ Email : tahbarshi@gmail.com
क्र. कुळकायदा/१४/एसआर-०५अ/२४ दिनांक ०१/०३/२०२५

### जाहीर समन्स

प्रति,
**सच्चिदानंद दत्तात्रय जगदाळे - अर्जदार / वादी**
**रा. चारे, ता. बार्शी**
विरूध्द
**भगवान दादा कापसे - सामनेवाले / प्रतिवादी**
**रा. पाथरी, ता. बार्शी**

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

**दावा जमीनीचे वर्णन**

| गावाचे नांव | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | पो.ख. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| पाथरी | ४०३ | १.१७ | ०.२५ | ०.२५ |

अर्जदार सच्चिदानंद दत्तात्रय जगदाळे यांनी दावा जमीनीचे इतर अधिकारातील भगवान दादा कापसे यांचे नाव कमी करुन मिळणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशीची तारीख दि. १९/०९/२०२४, ०५/१२/२०२४, २६/१२/२०२४, ३०/०१/२०२५ व २०/०२/२०२५ रोजी ठेवण्यात आलेल्या होत्या. तथापि प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले आहेत. तसेच ग्राम महसूल अधिकारी पाथरी यांनी प्रतिवादी हे पाथरी येथे रहात नसलेने नोटीस बजावणी करता येत नसलेबाबत अहवाल पंचनामासह सादर केलेला आहे. त्यामुळे त्यांचा सद्याचा पत्ता समजून येत नसलेने या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वरील नमूद प्रतिवादी हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या सुनावणीकामी हजर रहावे. सदर दाव्याची पुढील सुनावणीची तारिख दिनांक २७/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता तहसिल कार्यालय बार्शी येथे नेमणेत आलेली आहे. तरी तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यामार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह हजर रहावे. जर तुम्ही सदर दिवशी व वेळी हजर झाला नाही तर तुमचे गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का
सही/-
**तहसिलदार याशी**

## जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील मड्डी वस्ती, हिप्परगा रोड झोपडपट्टी नवीन वार्ड क्र. ४, यांसी जुना वार्ड क्रं.१७ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर ४२४ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-३९ यांसी हद्द पूर्वपश्चिम १६ फुट दक्षिणोत्तर ६० फुट एकूण क्षेत्र ९६० चौरस फुट इतके असून यात १० X १० मापाची पत्र्याची दोन खोल्या असून बाकीची खुली जागा आहे. यात नळ कनेक्शन व विद्युत कनेक्शन सह आहे. त्यांसी चतुःसिमाः पूर्वेस रस्ता, पश्चिमेस बोळ रस्ता, दक्षिणेस - रोड, उत्तरेस-बोळ रस्ता.

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली, घरजागा ही सुशिलाबाई वसंत तांबट यांचे कब्जे वहिवाटीची होती त्यांनी दिनांक ०३/०३/२०२५ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी घरजागा ही आमचे अशिल गजानन ज्योतिबा ढोणे यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर घरजागेवर नगर परिषद मैंदर्गी यांचेकडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, मड्डी वस्ती, हिप्परगा रोड झोपडपट्टी नवीन वार्ड क्रं.४, यांसी जुना वार्ड क्रं. १७ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर ४२४ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-३९ या जागेवर आमच्या अशिल गजानन ज्योतिबा ढोणे यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता. ०६/०३/२०२५

सही/-
**ॲड. ए.डी. नाईकवाडी (नोटरी भारत सरकार)**
**१८८६/४, विणकर वसाहत मु.पो.**
**मैंदर्गी ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.**
**मो.नं. ९८८१५२२९०७ / ८४२१०९८१७७**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आझादी का अमृत महोत्सव

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

तर,जेथे, आर्थिक मालमत्तांचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट ॲक्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना 26/11/2024 जारी केली आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, खालील स्वाक्षरीकर्त्याने 05.03.2025 रोजी सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तांशी व्यवहार करू नये आणि मालमत्तांशी संबंधित कोणत्याही व्यवहारावर वर नमूद केलेल्या रकमेचा आकार बँक ऑफ महाराष्ट्रकडून आकारला जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आमंत्रित केले आहे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव आणि जामीनदार/शाखा | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचनेची तारीख आणि एकूण देय |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा कॅम्प** **कर्जदार -** **श्री. शेखर आलियास अमोगसिध्द खंडेराव गायकवाड** तुळजामाई व्हिला, प्लॉट क्र. 157, आर्य चाणक्य नगर, मजरेवाडी, ओम गर्जना चौक, विजापूर रोड, जुळे सोलापूर - 413004 | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन** **श्री. शेखर आलियास अमोगसिध्द खंडेराव गायकवाड** यांच्या नावाने निवासी फ्लॅटचे गहाण खंडेराव गायकवाड तुळजामाई व्हिला, प्लॉट क्र. 157, जुना सर्व्हे नंबर 329/2b/1 चा नवीन सर्व्हे नंबर 116/2B/1 क्षेत्र 92.90 आर्य चाणक्य नगर, मजरेवाडी, विजापूर रोड, जुळे सोलापूर 413004 **सीमा: - पूर्व :-** प्लॉट क्रमांक 166 **पश्चिम :-** रस्ता **दक्षिण :-** प्लॉट क्रमांक 158 **उत्तर :-** रस्ता | **मागणी सूचना:** दि.26/11/2024 रु. 21,37,246.00/-अधिक अनुपालित व्याज (एकवीस लाख सदोतीस हजार दोनशे शेहेचाळीस रुपये फक्त) w.e.f 26/11/2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत **सांकेतिक ताबा** दिनांक : 05/03/2025 |

**ठिकाण : सोलापूर**
**तारीख :** 05/03/2025

सही/-
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर विभाग.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### कॅमिला ओसोरियोचा नाओमी ओसाकावर विजय

**इंडियन वेल्स** : येथे सुरु असलेल्या इंडियन्स वेल्स टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या सामन्यात कोलंबियाच्या कॅमिला ओसोरियोने माजी विजेत्या नाओमी ओसाकाला ६-४, ६-४ असे पराभूत केले. या बरोबरच वओसाकाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आणि कॅमिला ही माजी प्रथम विश्वमानांकित खेळाडूला हरविणारी कोलंबियाची पहिली महिला टेनिसपटू ठरली. चार वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेत्या जपानी खेळाडू ओसोरियोच्या गतिमान फटकेबाजीविरुद्ध खेळताना कधीही समाधानी दिसली नाही आणि कॅलिफोर्नियाच्या वाळवंटात एका थंड सायंकाळी खेळताना तिने अनेक नाहक चुका केल्या. ओसोरियोकडून जवळजवळ निर्दोष पहिल्या सेटनंतर, ओसाकाने दुसऱ्या गेममध्ये ५-३ असा मॅच पॉइंट मिळवून टिकून राहण्याचा प्रयत्न केला. पुढच्या गेममध्ये सामना संपवण्याचा प्रयत्न करताना ओसोरियोला चिंता वाटू लागली, मात्र त्यानंतर तिने स्वतःला सावरले व सामन्यात वर्चस्व गाजविले. प्रथम, सर्वांना शुभ संध्याकाळ, मी कॅमिला ओसोरियो आहे, असे ती कोर्टवर मुलाखतीत हसत म्हणाली. हे माझ्यासाठी वेडेपणाचे आहे, हे स्वप्न सत्यात उतरल्यासारखे आहे.

### ऑस्ट्रेलियाचे टेनिसपटू फ्रेड स्टोल यांचे निधन



**मेलबर्न** : दोन ग्रॅण्ड स्लॅम एकेरी विजेतेपद व १७ प्रमुख दुहेरीचे चषक जिंकणारे ऑस्ट्रेलियाचे महान टेनिसपटू फ्रेड स्टोल यांचे निधन झाले आहे. ते ८६ वर्षांचे होते. स्टोल हे टेनिसमध्ये खेळाडू म्हणून आणि नंतर ऑस्ट्रेलियाच्या नाइन नेटवर्क आणि अमेरिकन ब्रॉडकास्टर्ससाठी समालोचक म्हणून एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व होते. १९६० च्या दशकात टेनिस हौशी खेळापासून व्यावसायिक खेळात प्रगती करत असताना १.९१ मीटर (६ फूट ३) उंच स्टोल ऑस्ट्रेलियाच्या यशस्वी टेनिस युगाचा भाग होते. ते "फायरी फ्रेड" किंवा थोडक्यात "फायरी" या टोपणनावाने ओळखले जायचे. त्यांनी पहिल्या पाच ग्रॅण्ड स्लॅम एकेरी अंतिम फेरीत- त्यापैकी चार ऑस्ट्रेलियन सहकारी रॉय एमर्सनकडून गमावले. त्यांनी १९६३, १९६४ आणि १९६५ मध्ये सलग विम्बल्डन अंतिम फेरी गाठली होती. १९६५ च्या फ्रेंच ओपनमध्ये त्यांनी टोनी रोशेला अंतिम फेरीत हरवले. १९६२-६९ पर्यंत त्यांनी ग्रॅण्ड स्लॅममध्ये १० पुरुष दुहेरीचे जेतेपद जिंकले.स्टोल यांनी सात मिश्र दुहेरीच्या मोठ्या स्पर्धा जिंकल्या. त्यांनी १९६४, १९६५ आणि १९६६ मध्ये डेव्हिस चषक जिंकला. स्टोल यांनी १९७७ च्या ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपदासाठी अमेरिकन विटास गेरुलायटिसचे प्रशिक्षकपद भूषवले होते.

### मोहम्मद शमीने उपवास न ठेवल्याने पाप केले : धर्मगुरू



**बरेली** : भारतीय क्रिकेटपटू मोहम्मद शमीने इस्लामिक पवित्र रमजान महिन्यात उपवास न ठेवून पाप केले आहे, असे अखिल भारतीय मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी बरेलवी यांनी गुरुवारी म्हटले. शरीयतच्या दृष्टीने तो गुन्हेगार आहे, त्याने हे अजिबात करायला नको होते, असेही बरेलवी धर्मगुरू म्हणाले. मंगळवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यादरम्यान शमी मैदानावर बाटलीतून काहीतरी पिताना दिसला, शहाबुद्दीन यांनी एका व्हिडिओमध्ये म्हटले आहे. त्यांनी शमीला शरीयतच्या नियमांचे पालन करण्याचा सल्ला दिला. शरीयतच्या नियमांचे पालन करणे ही सर्व मुस्लिमांची जबाबदारी आहे. इस्लाममध्ये उपवास करणे अनिवार्य आहे. जर एखाद्या व्यक्तीने जाणूनबुजून उपवास ठेवला नाही, तर तो इस्लामिक कायद्यानुसार पापी मानला जातो, असे रझवी म्हणाले.

क्रिकेट खेळणे वाईट नाही, परंतु मोहम्मद शमीने त्याच्या धार्मिक जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. मी शमीला शरीयतच्या नियमांचे पालन करण्याचा आणि त्याच्या धर्माप्रती जबाबदार राहण्याचा सल्ला देतो, असे ते म्हणाले. शमी सध्या दुबईमध्ये आहे. तो सध्या सुरू असलेल्या आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी भारतीय संघाचा भाग आहे.

# अरविंद चिदम्बरम्‌ला एकमेव आघाडी

### आर. प्रज्ञानंद दुसऱ्या स्थानावर



अनिश गिरीविरुद्ध खेळताना अरविंद चिदम्बरम्

**प्राग, ६ मार्च**
येथे सुरू असलेल्या प्राग मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेच्या सातव्या फेरीच्या शेवटी ग्रॅण्डमास्टर अरविंद चिदम्बरम्ने सुपर-स्टॉलिड अनिश गिरीच्या बचावफळीला भेदून एकमेव आघाडी घेतली.

आर. प्रज्ञानंदाने विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या चीनच्या वेई यी सोबत बरोबरी साधली. त्यामुळे अरविंदचा एकमेव आघाडी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला. अरविंदने संभाव्य सात पैकी पाच गुण मिळवले व प्रज्ञानंदावर अर्धा गुणांची आघाडी घेतली. कालपर्यंत हे दोघे संयुक्त आघाडीवर होते.

केवळ दोन फेऱ्या शिल्लक असताना अमेरिकेच्या सॅम शँकलँडने व्हिएतनामच्या क्वांग लेम ले याला हरवले. विशेष बाब म्हणजे, क्वांग लेम व गिरी या दोघांनीही पहिले सहा डाव बरोबरीत सोडवले होते व आता त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. दुसऱ्या निर्णायक डावामध्ये तुर्कीच्या १६ वर्षीय गुरेल एडीझने स्थानिक न्गुयेन थाई दाई व्हॅनवर विजय मिळवून पन्नास टक्के गुण मिळवले, तर झेक प्रजासत्ताकच्या डेव्हिड नव्हाराने जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमर सोबत बरोबरी साधली.

अरविंद पाच आणि प्रज्ञानंद ४.५ गुणांसह आता त्यांच्या पाठोपाठ वेई यी, एडिझ, कीमर आणि शँकलँड यांचे प्रत्येकी ३.५ गुण आहेत आणि हे चौघेही गिरी, नवरा आणि ले या त्रिकुटापासून अर्धे गुण मागे आहेत. दाई व्हॅन आता २.५ गुणांसह तळाशी आहे.

अरविंद सामान्य स्थितीत एक चांगला स्पर्धक आहे व रणनीतिक गुंतागुंतीवर खोलवर लक्ष ठेवतो. गिरीविरुद्धच्या दुर्मिळ संधीमुळे त्याला किंग संघाला पराभूत करून रेकॉर्ड बुकमध्ये प्रवेश करण्याची संधी मिळाली. अव्वल १५ मध्ये पाच भारतीय आहेत आणि आनंद १५ व्या क्रमांकावर आहे. १४ व्या क्रमांकावर अरविंदने अव्वल १५ मध्ये प्रवेश केला.

(वृत्तसंस्था)

# कोहली आयपीएल जिंकण्यास पात्र : डीव्हिलियर्स



विराट कोहली व एबी डीव्हिलियर्स

**बंगळुरू, ५ मार्च**
विराट कोहली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसोबत (आरसीबी) आयपीएल जेतेपद जिंकण्यास पात्र आहे, असा विश्वास दक्षिण आफ्रिकेचा महान फलंदाज एबी डीव्हिलियर्सने व्यक्त केला.

१७ हंगामांपासून आरसीबीचा तावीज असलेल्या कोहलीला २००९, २०११ आणि २०१६ मध्ये असे तीन वेळा उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले असले तरी आणि नऊ वेळा प्ले-ऑफमध्ये पोहोचले असले तरी अद्याप आयपीएल चषक जिंकता आलेली नाही.

२०११ ते २०२१ पर्यंत ११ हंगामांसाठी आरसीबीकडून खेळणाऱ्या डीव्हिलियर्सने कोहलीच्या स्ट्राईक रेटवरील चिंता फेटाळून लावल्या.

कोहलीला त्याच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडताना नवीन फटके वापरून पाहताना व त्याच्या खेळाच्या विविध पैलूंचा शोध घेताना बघणे खूप छान वाटते. त्याच्यात नेहमीच ती क्षमता होती. त्याच्यासाठी ते किती महत्त्वाचे आहे हे तुम्ही बघू शकता, असे एबी डीव्हिलियर्स म्हणाला.

आरसीबीसोबत आयपीएल जिंकणे हे त्याच्या आधीच अभूतपूर्व कारकिर्दीला परिपूर्ण फिनिशिंग टच असेल, असे एबी म्हणाला.

गत हंगामात आरसीबीने आपले शेवटचे ६ साखळी सामने जिंकून प्ले-ऑफमध्ये प्रवेश मिळवला. कोहलीने १५ सामन्यांमध्ये १५४.७० च्या स्ट्रायकर रेटने ७४१ धावा केल्या, त्यात ५ अर्धशतके व एका शतकाचा समोश आहे.

(वृत्तसंस्था)

## एप्रिलमध्ये कोलंबोत महिलांची तिरंगी मालिका

**कोलंबो** : आगामी २७ एप्रिल ते ११ मे दरम्यान कोलंबो येथील आर. प्रेमदासा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर महिलांची एकदिवसीय तिरंगी मालिका होणार असून या मालिकेत भारत, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका संघ सहभागी होणार आहेत, असे श्रीलंका क्रिकेटने (एसएलसी) सांगितले. श्रीलंका आणि भारत यांच्यात २७ एप्रिल रोजी तिरंगी मालिकेच्या पहिला सामना होणार आहे. प्रत्येक संघ चार सामने खेळेल आणि त्यातील अव्वल ठरणारे दोन संघ ११ मे रोजी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील. सर्व सामने दिवसाच्या खेळांसारखे खेळले जातील. भारतासाठी या वर्षाच्या अखेरीस त्यांच्या घरच्या मैदानावर होणाऱ्या १३ व्या महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीला चालना देण्यासाठी ही तिरंगी मालिका स्वागतार्ह आहे. या स्पर्धेतील ही शेवटची वेळ असेल ज्यामध्ये आठ संघ असतील आणि ऑस्ट्रेलिया गतविजेता म्हणून स्पर्धेत सहभागी होईल. १९७८, १९९७ आणि २०१३ नंतर भारत चौथ्यांदा महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करणार आहे. २०१६ च्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकानंतर भारत पहिल्यांदाच जागतिक महिला आयसीसी स्पर्धेचे आयोजन करणार आहे, श्रीलंका सध्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी न्यूझीलंड दौऱ्यावर आहे,

(वृत्तसंस्था)

# राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत ३०० महिला खेळाडू भाग घेणार



**नवी दिल्ली, ६ मार्च**
आगामी २१ ते २७ मार्च दरम्यान ग्रेटर नोएडा येथे होणाऱ्या ८ व्या एलिट महिला राष्ट्रीय मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत तब्बल ३०० मुष्टियोद्धे विजेतेपदाचा मान मिळविण्यासाठी भाग घेणार आहेत.

उत्तर प्रदेश मुष्टियुद्ध संघटनेच्या सहकार्याने आयोजित ही स्पर्धा २०२३ मध्ये शेवटची आवृत्ती आयोजित केलेल्या ठिकाणी परतली.

जागतिक मुष्टियुद्ध व भारतीय मुष्टियुद्ध महासंघाच्या स्पर्धा मार्गदर्शक तत्त्वांनुसार आयोजित ही स्पर्धा १ जानेवारी १९८४ ते ३१ डिसेंबर २००५ दरम्यान जन्मलेल्या मुष्टियोद्ध्यांसाठी खुली आहे.

प्रत्येक राज्य युनिट जास्तीत जास्त १० खेळाडूंना मैदानात उतरवू शकतो, संख्यांनुसार प्रवेशिका १० मार्च रोजी बंद होतील आणि १५ मार्चपर्यंत अंतिम नाव निश्चित केले जाईल. २० मार्च रोजी आगमन, सोडत आणि तांत्रिक बैठकीसह अधिकृतपणे ही कारवाई सुरू होईल.

सुरुवातीच्या फेऱ्या २१ ते २४ मार्च दरम्यान होतील, त्यानंतर २५ मार्च रोजी उपांत्यपूर्व फेरी आणि २६ मार्च रोजी उपांत्य फेरी होतील, त्यानंतर २७ मार्च रोजी अंतिम फेरी होईल.

ही स्पर्धा तीन फेऱ्यांच्या स्वरूपात असेल, प्रत्येक लढतीत तीन मिनिटांच्या फेऱ्या असतील आणि एक मिनिट विश्रांती असेल. दहा-गुणांची मस्ट-स्कोअरिंग सिस्टम असेल आणि सर्व सामने जागतिक मुष्टियुद्ध तांत्रिक आणि स्पर्धा नियमांचे पालन करतील. स्पर्धेदरम्यान खेळाडूंना दररोज वजन मोजावे लागेल.

३०० स्पर्धक मुष्टियोद्ध्यांशिवाय या स्पर्धेत १०० हून अधिक प्रशिक्षक व सहायक कर्मचारी, ६० तांत्रिक अधिकारी सुद्धा एकत्र येतील व त्यामुळे प्रेक्षकांना अव्वल दर्जाचा खेळ बघण्याची संधी मिळेल.

गतविजेता रेल्वे क्रीडा प्रोत्साहन मंडळ (आरएसपीबी) मागील आवृत्तीत प्रभावी कामगिरी केल्यानंतर त्यांचे जेतेपद राखण्याचा प्रयत्न करेल. आरएसपीबीने पाच सुवर्णपदके, एक रौप्य व दोन कांस्यपदके जिंकली होती. आरएसपीबीने हरयाणाला आठ गुणांनी मागे टाकले, त्यानंतर हरयाणा तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्यपदकांसह सात पदकांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला.

(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानच्या क्रिकेटमध्ये प्रथमच 'टाइम आऊट 'चा निर्णय

### पाकिस्तानी फलंदाज चक्क ड्रेसिंग रूममध्ये झोपला!

**रावळपिंडी, ६ मार्च**
आयसीसी चॅम्पियन ट्रॉफीमध्ये अत्यंत निराशाजनक कामगिरी करणाऱ्या पाकिस्तान क्रिकेट संघांवर देशातून चौफेर टीका सुरु असताना देशातील प्रथम श्रेणी क्रिकेटमध्येही एक हास्यास्पद प्रकार घडला आहे. सामन्या दरम्यान फलंदाज सौद शकील ड्रेसिंग रुममध्ये चक्क झोपी गेला. तो फलंदाजीसाठी उशिरा क्रीजवर पोहोचला.

त्यामुळे पंचांनी त्याला बाद घोषित केले. पाकिस्तान प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहासातील

ही एक दुर्मिळ घटना ठरली आहे. कारण पाकिस्तान प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये टाईम आउट होणारा शौद शकील हा पहिला पाकिस्तानी फलंदाज ठरला आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकाराची नेटिझन्सनी पाकिस्तानी क्रिकेटपटूंची

खिल्ली उडविण्याची चांगली संधी मिळाली आहे.

#### ३ चेंडूत ४ विकेट..!

पाकिस्तान संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडल्यानंतर काही दिवसांनी, सौद शकीलने

रावळपिंडी येथे झालेल्या देशांतर्गत प्रेसिडेंट्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत भाग घेतला. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानकडून पाचव्या क्रमांकावर तो फलंदाजीसाठी जाणार होता. पाकिस्तान टेलिव्हिजन संघाचा वेगवान गोलंदाज मुहम्मद शहजादने स्टेट बँक ऑफ पाकिस्तानचा कर्णधार उमर अमीन आणि फवाद आलम यांना सलग चेंडूंवर बाद केले. यानंतर शकील क्रीजवर आला, पण त्याला तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागला. रिपोर्टनुसार, तो ड्रेसिंग रूममध्ये झोपी गेला होता

त्यामुळे त्याला क्रीजवर जाण्यास विलंब झाला. विरोधी संघाच्या कर्णधाराने टाइम आउटसाठी अपील केले आणि मैदानावरील पंचांनी अपील स्वीकारले आणि सौद शकीलला टाइम आउट घोषित करण्यात आले, ही प्रथम श्रेणीच्या इतिहासातील एक दुर्मिळ घटना आहे कारण अशा

प्रकारे बाद होणारा तो पहिला पाकिस्तानी फलंदाज आहे. गोलंदाज मुहम्मद शहजाद याने दोन चेंडूत सलग दोन फलंदाजांना बाद केले. तिसऱ्या चेंडूपूर्वी शकीलला टाइमआउट करण्यात आले आणि पुढच्या चेंडूवर शहजादला आणखी एक विकेट मिळाली. अशाप्रकारे त्याने ३ चेंडूत चार विकेट घेतल्या.

#### अँजेलो मॅथ्यूजच्या 'टाईमआउट'ची आठवण

शकीलच्या बाद झाल्यानंतर, २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात बांगलादेशविरुद्ध अँजेलो मॅथ्यूजला टाईमआउट केल्याचा उल्लेखही झाला. तो उशिरा क्रीजवर पोहोचल्याने त्याला 'टाईमआउट' घोषित करण्यात आले होते.

(वृत्तसंस्था)

# इंडियन ओपन गोल्फ स्पर्धा २७ मार्चपासून दिल्लीत

### भारताचे नेतृत्व शुभंकर शर्मा, वीर अहलावतकडे

**नवी दिल्ली, ६ मार्च**
आगामी २७ ते ३० मार्चदरम्यान डीएलएफ गोल्फ अँड कंट्री क्लब, गुरुग्राम येथे हिरो इंडियन ओपन २००५ गोल्फ स्पर्धा आयोजितक करण्यात येणार असून या स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व डीपी वर्ल्ड टूरवरील दोन वेळा विजेता शुभंकर शर्मा आणि गत वर्षीचा उपविजेता वीर अहलावत करणार आहेत.

या स्पर्धेत १३८ खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला असून इतर भारतीयांमध्ये शिव कपूर व मनु गंडास यांचा समावेश आहे. आणखी एक आकर्षण म्हणजे भारतीय किशोरवयीन खेळाडू कार्तिक सिंग हा सध्या फॉर्ममध्ये आहे. तो आपल्या गत तीन आंतरराष्ट्रीय हौशी स्पर्धांमध्ये (दोनदा दक्षिण आफ्रिकेत आणि एकदा ऑस्ट्रेलियात) अव्वल १० मध्ये राहिला आहे. अहलावतने इंडियन ऑर्डर ऑफ मेरिट जिंकला आणि आता तो डीपी वर्ल्ड टूरमध्ये भाग घेत आहे. स्थानिक गोल्फपटू गंडास २०२३ मध्ये डीपी वर्ल्ड टूरमध्येही खेळला होता.

२.२५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या या स्पर्धेत गतविजेता जपानची केइटा नाकाजिमा आंतरराष्ट्रीय आव्हानाचे नेतृत्व करेल. २४ वर्षीय नाकाजिमासोबत जर्मनीचा मार्सेल सीम असेल. २०२३ मध्ये नाकाजिमाने विजेतेपद पटकावले आणि १० वर्षांचा दुष्काळ संपवला. परदेशातील इतर उल्लेखनीय नावांमध्ये जॅक क्रुयस्विज्क, जोहान्स वीरमन, ज्युलियन गेरियर, एंजेल हिडाल्गो, फ्रेडरिक लॅक्रोइक्स, डेव्हिड रॅवेट्टो, इवेन फर्ग्युसन आणि गुइडो मिग्लिओझी यांचा समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

## दुबईच्या खेळपट्टीवर जुळवून घ्यावे लागेल : रचिन रवींद्र

**लाहोर, ६ मार्च**
रविवारी भारताविरुद्ध होणाऱ्या चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम सामन्यात दुबईच्या अज्ञात खेळपट्टीवर यशस्वी होण्यासाठी परिस्थितीशी जुळवून घेणे महत्त्वाचे ठरेल, असे मत न्यूझीलंडचा धडाकेबाज सलामीवीर रचिन रवींद्रने व्यक्त केले.

दुबईमध्ये भारताविरुद्धचा गट साखळी सामना वगळता न्यूझीलंडने आपले सर्व सामने पाकिस्तानमध्ये खेळले आहेत. पाकिस्तान व दक्षिण आफ्रिकेच्या गत तिरंगी मालिकेत न्यूझीलंडने लाहोरमध्ये दोन सामने सुद्धा खेळले होते. भारतीय संघाने आपले सर्व चॅम्पियन्स चषक सामने दुबईमध्ये खेळले आहेत, त्यामुळे त्यांना दुबईतील परिस्थितीची उत्तम जाणीव आहे. आम्हाला दुबईच्या खेळपट्टीविषयी पूर्णपणे माहिती नाही.

(वृत्तसंस्था)

# भारताच्या ऑलिम्पिक तयारीसाठी दोन दिवसीय 'चिंतन शिबिर' हैदराबादमध्ये

**हैदराबाद, ६ मार्च**
केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय हे आपल्या राज्यस्तरीय समकक्ष, वरिष्ठ प्रशासक व प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांसोबत दोन दिवसांच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील आणि भारताच्या ऑलिंपिक तयारीसाठी एक आराखडा तयार करतील.

आगामी ७ व ८ मार्च रोजी होणारी ही बैठक शहरातील कान्हा शांती वनम्‌ येथे होणार आहे. २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये भारत दोन अंकी पदक जिंकण्याचे लक्ष्य ठेवून आहे आणि २०३६ च्या ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी सुद्धा बोली लावत आहे, त्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीला इरादा पत्र पाठवण्यात आले आहे.

क्रीडा प्रशासन वाढवणे, तळागाळातील प्रतिभा ओळखणे, पायाभूत सुविधा विकास, समावेशकता आणि सहकार्य वाढवणे यावर चर्चा केंद्रित असेल, असे क्रीडा मंत्रालयाने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

विचारमंथन सत्राचे प्रमुख केंद्र विविध सरकारी योजनांचा आढावा आणि या विषयावर राज्यांशी समन्वय असेल. कॉर्पोरेट्‌ससह क्रीडा पायाभूत सुविधा विकास भागीदारी, प्रतिभा शोध आणि सुशासनाला प्रोत्साहन देणे यावर देखील चर्चा केली जाईल.

अलिकडच्या उत्तराखंड राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंचे यश आपल्या प्रचंड क्षमतेवर प्रकाश टाकते. आमचे ध्येय स्पष्ट आहे, म्हणजेच ऑलिम्पिक उत्कृष्टता साध्य करणे आणि भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवणे, असे मांडविया यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

कल्पना आणि सर्वोत्तम पद्धती सामायिक करून, आपण एक संरचित आणि शाश्वत क्रीडा चौकट सुनिश्चित करू शकतो. ऑलिम्पिकचे आयोजन हे एक राष्ट्रीय ध्येय आहे आणि आपण एकत्र पुढे जावे, असे ते म्हणाले.

मांडविया यांनी राज्यांना असे अव्वल खेळाडू हुडकून काढण्याचे आवाहन केले आहे, जे प्रशिक्षकाच्या भूमिकेत बदलू शकतात.

(वृत्तसंस्था)

# दुबईत कसे खेळायचे याबद्दल भारताला उत्तम जाणीव : विल्यमसन




**लाहोर, ६ मार्च**
आयसीसी चॅम्पियन्स चषकात भारतीय संघाने आपली सर्व सामने एकाच ठिकाणी खेळल्यामुळे त्यांना दुबईत कसे खेळायचे याची उत्तम जाणीव आहे, असे मत न्यूझीलंडचा फलंदाज केन विल्यमसनने व्यक्त केले.

भारताला एकाच ठिकाणी खेळण्याचा फायदा झाला असे मी म्हणणार नाही, कारण न्यूझीलंडला लाहोरमधील परिस्थितीची चांगली कल्पना आहे, असे तो म्हणाला. लाहोरमध्ये न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेवर ५० धावांनी विजय नोंदवून अंतिम फेरीत प्रवेश केला. विल्यमसन आणि रचिन रवींद्र दोघांनीही शतके झळकावून न्यूझीलंडचा विजय घडवला.

आता रविवारी दुबईत रोहित शर्माच्या नेतृत्व ाखालील भारतीय संघ व न्यूझीलंड यांच्यात दुबईत अंतिम सामना खेळला जाणार आहे.

पाकिस्तान व दक्षिण आफ्रिकेसह गत तिरंगी मालिकेत न्यूझीलंडने लाहोरमध्ये दोन सामने खेळले होते

एक संघ जेव्हा एकाच ठिकाणी अनेक वेळा खेळतो, तेव्हा त्यांना कसे खेळायचे याची खरोखर चांगली कल्पना असते, असेही तो म्हणाला. आम्ही जसे लाहोरमध्ये खेळलो, तसे भारतीय संघ सुद्धा दुबईत खेळला, हा क्रिकेटमध्ये अविभाज्य अंग आहे आणि म्हणून ते अंतिम फेरीत पोहोचले असे म्हणता येणार नाही, असे तो म्हणाला.

उपांत्य सामन्यात शतक झळकावल यानंतर केन विल्यमसनचा आत्मविश्वास उंचावला आहे आणि तो अंतिम सामन्यासाठी उत्सुक आहे.

आता आमचे लक्ष अंतिम सामना, त्या सामन्याचे ठिकाण, प्रतिस्पर्धी संघ, हे सर्व घटक आहेत. अर्थातच, आम्ही एकदा दुबईत भारताविरुद्ध खेळलो होतो, असे तो म्हणाला.

आता परिस्थिती वेगळी आह. गट साखळी फेरीच्या सामन्यातील काही सकारात्मक गोष्टी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहो आणि आता दोन किंवा तीन दिवसांच्या अंतराने आपण अंतिम फेरीत कसे वागण्याचे याबाबत स्पष्ट असणे महत्वाचे आहे, असे तो म्हणाला. गट साखळी सामन्यात न्यूझीलंडला भारताकडून पराभव पत्करावा लागला होता.

हा अंतिम सामना रोमांचक होणार आहे. रचिनकडे एक अविश्वस नीयपणे विशेष प्रतिभा आहे. त्याच्यासोबत फलंदाजी करणे नेहमीच छान असते. तो संघाला प्रथम स्थान देतो व त्या स्वातंत्र्याने खेळतो. आम्ही एकमेकांना फलंदाजीवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करतो, असे विल्यमसन म्हणाला.

भारत एक उत्कृष्ट संघ आहे व खरोखर चांगले खेळत आहे. आता शेवटच्या सामन्यातून काही शिकण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे आहे. अंतिम सामन्यात काहीही होऊ शकते, असेही तो म्हणाला.

(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### मेथवडेत राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिन साजरा

**सांगोला, दि.६ मार्च-**

मेथवडे (ता.सांगोला) येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीमधे भारतातील फार्मसी शिक्षणाचे जनक प्रो.एम.एल.श्रॉफ यांचा जन्मदिवस दि.६ मार्च हा राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात आला. भारतात सर्वप्रथम प्रो.एम.एल.श्रॉफ यांनी डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम.फार्मसीचे शिक्षण सुरू केले. त्यांच्या या योगदानाचा गौरव करण्यासाठी शासनाच्या निर्णयानुसार दि.६ मार्च रोजी फार्मसी शिक्षण दिन साजरा केला जातो. मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीमधे यानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. एस. एस. काळे यांनी प्रो. एम. एल. श्रॉफ सरानी भारतात फार्मसी क्षेत्राची मुहूर्तमेढ केल्याचे सांगून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. औषधे व सौंदर्य प्रसाधने संबंधित महत्वाचे असे ड्रग्स एंड प्रसाधन सामग्री नियम व ऍक्ट १९४० व १९४५ तयार व अंमलबजावणी करण्यात त्यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले.



### सुळेवाडीत परदेशीस्थित भूमीपुत्राने केली पाण्याची सोय

**पिलीव, दि.६ मार्च-**

सुळेवाडी (ता. माळशिरस) येथील इरकरवस्ती भागात सध्या भीषण पाणीटंचाई आहे. याबाबतची माहिती मिळताच येथील सध्या परदेशी स्थायीक असलेले रामा इरकर यांनी वडील स्व. आबा व आई स्व. यशोदा यांच्या स्मरणार्थ पिण्याच्या पाण्यासाठी मोफत टँकरची सोय केली आहे. या टँकर दवारे दिवसातुन दोन वेळा इरकरवस्ती, बापु सुळे वस्ती, बोडरेवस्ती , ढेरे वस्ती, एस.टी. स्टँड परिसर व मानेवस्ती या वाड्यांवर सध्या टँकरने मोफत पाणीपुरवठा केला जात आहे. गेल्या काही दिवसापूर्वी पाणीपुरवठा विहीरीत एक नागरिक सडलेल्या अवस्थेत सापडला होता. त्यामुळे सदरचे पाणी दुषीत असल्याचा अहवाल आला होता. या भागात सध्या भीषण पाणीटंचाई असुन नागरिकांचे पिण्याच्या पाण्याचे हाल होत होते. श्री. इरकर यांनी टँकर दिल्यामुळे सुळेवाडीकरांची पिण्याच्या पाण्याची थोडीसी अडचण दूर झाली आहे. सध्या सुळेवाडी गावाला गुंडखोरी तलावाच्या खाली असणाऱ्या पाणीपुरवठा विहीरीतून आठवडयातून एकदा पाणी सोडले जात आहे. प्रशासनाकडे टँकरची मागणी करुनही अद्यापही या गावात टँकर सुरू झालेला नाही. सध्या या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असुन जनावरे, शेळया , मेंढया यांना चारा व पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. श्री. इरकर यांच्या मोफत पाणीपुरवठा योजनेचा प्रारंभ नुकताच झाली यावेळी विक्रम सुळे, बाबुराव सुळे, दादा सुळे, सुखदेव झिंबल, तात्या बरकडे, रविंद्र सुळे, रामचंद्र झिंबल, उमाजी बोडरे, अशोक सोलंकर, विजय सुळे, मधु सुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### पिलीव परीसरात केवायसीवर परिणाम; मशीनवर ठसेच उमटत नसल्याची तक्रार

**पिलीव, दि.६ मार्च-**

शासनाने स्वस्त धान्य सुलभतेने मिळावे म्हणून ऑनलाईन पद्धतीने रेशन वाटप पद्धती सुरू केली. परंतू ग्रामीण भागात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाने याबाबत केवायसी करणे बंधनकारक केले आहे. यामध्ये वंचीत लोकांना १५ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली. मशीनवर वृद्ध व लहान मुलांचे ठसेच उमटत नसल्याने अनेक लोक अजूनही केवायसी विना वंचीतच आहेत.एकीकडे केवायसी होत नसल्यामुळे रेशन धान्यच मिळणार नाही. तर पुरवठा विभाग मात्र याबाबत अभिज्ञनच असुन ई केवायसी न होणाऱ्या लाभार्थ्यांची यादी आम्ही शासनाकडे सादर करणार असल्याचे सांगितले जात आहे. स्वस्त धान्य दुकानदारांनी रात्री उशीरापर्यंत दुकान सुरू ठेवून केवायसी करुन घेण्याचा प्रयत्न केला. पण सदरच्या मशीनवर माहीतीच अपडेट होत नाही. यामुळे अद्यापही अनेक लाभार्थी केवायसीविना वंचीतच आहेत. शासनाने १५फेब्रुवारी पर्यंत दिलेली मुदत संपली असुन आता पुन्हा १५ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पण यामध्ये अजुन अनेक लाभार्थी यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे यामुळे अनेक लाभार्थी रेशनपासुन वंचीत राहणार आहे हे निश्चित आहे. शासन मुदतवाढ देऊन केवायसी करुन घेणयाचा प्रामाणीकपणे प्रयत्न करत आहे पण अडचणीचा सामना करावा लागत आहे. ठसे उमटत नसल्यामुळे केवायसी होईना अशी विदारक परिस्थिती सध्या ग्रामीण भागात पाहवयास मिळत आहे.

## निधन वार्ता

### बायडाबाई रजपूत



**पिलीव, दि.६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील बायडाबाई खारकुसिंग रजपुत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त मुख्याध्यापक जे. के. रजपूत यांच्या मातोश्री होत्या.

### रशिदाबी कबीर



**करमाळा, दि.६ मार्च-**

करमाळा येथील पत्रकार कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे सचिव नासीरभाई कबीर करमाळा महसुल मंडल अधिकारी हुस्नोदिन कबीर यांच्या मातोश्री रशिदाबी शमसुद्दीन कबीर यांचे राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, परतवडे असा परिवार आहे. सैराट फेम सल्या उर्फ अरबाज शेख यांच्या त्या आजी होत्या. रशिदाबी

# आ.अभिजीत पाटलांनी विधानसभेत विविध प्रश्नांना फोडली वाचा

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. ६ मार्च -**

सध्या मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनामध्ये गुरुवारी (ता.६) सकाळच्या सत्रात माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी मतदार संघातील विविध प्रश्नांचा उहापोह करीत शासन दरबारी प्रश्नांची सरबत्ती केली.

**सोलापूर जिल्ह्यात रोजगार निर्मितीची गरज**

आमदार पाटील यांनी दाओस मध्ये झालेल्या राज्यातील १५ लाख ७२ हजार कोटींच्या गुंतवणूकीपैकी एखाद्या लाख कोटीं रुपयांची तरी गुंतवणूक माढा आणि सोलापूरात व्हावी अशी मागणी केली.

**उजनी धरण प्रकल्पाचे काम का रखडले**

उजनी धरण प्रकल्पासाठी २८२ कोटीं रुपये मंजुर होते. त्याचे काम रखडले आहे. प्रकल्प कशात आडकला आहे याची माहिती नाही. याबाबत गांभिर्याने विचार होण्याची गरज आहे.

**शेतकऱ्यांना कर्जे माफी होणार का आणि कधी**

शेतकरी कर्जमाफी होणार का ? यासाठी आपण आश्वासन दिलेले होते. नवीन कर्जासाठी त्याला अडचण येत आहे. कर्जमाफी कधी करणार असा सवाल आमदार पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला.

**पाणंद रस्त्यांचा प्रश्न जटिल**

पाणंद रस्त्यांवरुन भांडणतंटे होतात. पाणंद रस्त्यांची योजना सुरु राहणार का ? शेतकऱ्यांना रस्ता मिळणार का ? ही देखील महत्वाची बाब आहे यावर देखील आमदार पाटील यांनी प्रकाश टाकला.

**मुलींच्या मोफत शिक्षणाबाबत शिक्षणसंस्थांना तंबी द्यावी**

मुलींसाठी शासनाने मोफत शिक्षणाची घोषणा केली त्याचा अभिभाषणात उल्लेख नाही. शिक्षण संस्था मुलींना फी भरल्या शिवाय परीक्षांना बसू देत नाहीत. परीक्षेला बसू न दिल्यामुळे विद्यार्थिनींचे नुकसान होते आहे तशा कडक सूचना शासनाकडून शिक्षण संस्थांना देण्यात याव्यात.

**प्रशिक्षण योजनेचा कालावधी दोन वर्षाचा करावा**

राज्यात मुख्यमंत्री प्रशिक्षण योजनेत सुमारे १ लाख ३२ हजार युवकांना प्रशिक्षण दिले. त्यांना पुढे नोकरी मिळाली नाही. विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण कालावधी सहा महिन्या ऐवजी दोन वर्षे करावा.

**निरा नरसिंहपूर, शिखरशिंगणापूरचा समावेश करावा**

शासनाकडून नागपूर- गोवा शक्तीपीठ महामार्ग हाती घेण्यात आला आहे. नागपूर - गोवा शक्तीपीठाला तुळजापूर वरुन पंढरपूर- माढा मार्गे मुख्यमंत्र्यांचे कुलदैवत असलेल्या निरानरसिंहपूर, शिखरशिंगणापूर मार्गे तो जर रस्ता केला गेला तर ही देखील तिर्थक्षेत्रे नागपूर - गोवा या शक्तीपीठ महामार्गाला जोडली जावू शकतील.

**टिकाऊ रस्त्यांत शासनाकडून दुजाभाव नको**

शासनाकडून आगामी काळात सात हजार ४०० किलोमीटरचे टिकाऊ रस्ते करण्यात येणार आहेत. या मध्ये शासनाने दुजाभाव न करता हे त्वरीत करुन विकास कामाला गती द्यावी.

**नाविन्यपुर्ण योजनेत माढ्याचा समावेश व्हावा**

नाविन्यपुर्ण योजनेसाठी शासनाकडून शहरासाठी काम केले जाते .परंतु माढा शहरात गेल्या वर्षभरापासून दहा ते बारा दिवसांतून एकदा पाणी येते. पाणी पुरवठा योजना मंजुर होवून त्याचा निधी लवकरात लवकर वितरित व्हावा.

**सोलारपंप योजनेची व्यथाच वेगळी**

नदीकाठी पाचगुंठे क्षेत्र असेल तरच सोलारपंप वितरित होतो.पण पाच गुंठे क्षेत्र शेतकऱ्यांना मिळत नाही. या बरोबरच नदीच्या काठावर सोलारपंप लावला तर पुराच्या वेळी तो वाहून जाण्याचा धोका जास्त आहे. या बरोबरच सोलार योजना तर नाहीच पण विज जोडणी देखील शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पुढे ही मोठी अडचण आहे. या बरोबरच या योजने मध्ये सगळ्यात महत्वाची अडचण अशी आहे की ज्याला विज जोड आहे त्याला सोलार योजना मिळत नाही. जर ज्या शेतकऱ्यांकडे पाच, साडेसात एचपीचे विजजोड कनेक्श्न आहे त्याला जर सोलार दिला तर त्याचा विजेवरचा तेवढा भार कमी होण्यास मदत होईल.

**राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जास टाळाटाळ**

शेतकऱ्यांना नवीन कर्जांसाठी ७४ हजार कोटींचे लक्ष ठेवण्यात आल्याची माहिती शासनाकडून देण्यात आली. मात्र राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना कर्जेच देत नाहीत. याकडे जिल्हाधिकाऱ्यांचे देखील लक्ष वेधले मात्र त्यांनी देखील आपण केवळ बँकेच्या आधिकाऱ्यांना सुचना देवू शकतो असे सांगितले. मात्र राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी कर्जाबाबत सहकार्य करीत नाहीत.

**अन्यथा २३ हजार शिक्षक होतील अतिरिक्त**

वस्ती शाळा बंद करणार असल्याचे शासनाकडून सांगण्यात आले. जर वस्ती शाळा बंद झाल्या तर आमच्या भागातील २३ हजार शिक्षक हे अतिरिक्त होतील. या बरोबरच वस्तीशाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा देखील प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यामुळे वस्तीशाळा रद्द न करता त्याला अधिक बळकटी द्यावी.

**या प्रश्नांकडे देखील वेधले लक्ष**

या बरोबरच साखर कारखान्यांना इथेनॉलला सबमिशन आणि पर लिटर अनुदान देण्यात यावे, नैसर्गिक आपत्ती मध्ये ८१४ कोटी रुपये शासनाकडून दिले जाणार आहेत. मात्र २८ फेब्रुवारीच्या शासन आदेशान्वये यामधुन सोलापूर जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचा देखील यामध्ये समावेश व्हावा अशी मागणी करण्यात आली. माढ्यात तसेच सोलापूर जिल्ह्यात कुस्ती शौकींनाची संख्या अधिक आहे. माढ्यात कुस्तीसाठी संकुल तसेच तिरंदाज ( आर्चिरी ) खेळाव्दारे सुमारे ३२ अधिकारी सेवेत समाविष्ट झालेले आहेत. त्यामुळे या खेळांना प्रोत्साहनासाठी देखील शासनाकडून सोलापूर जिल्हा तसेच माढा मतदार संघाला मदत झाली पाहिजे. या बरोबरच आपण प्रतिनिधीत्व करीत असलेल्या भागात शेतकऱ्यांना युरीया लिंक केल्या शिवाय खत दिले जात नाहीत. त्यामुळे या प्रकाराकडे देखील शासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी देखील आमदार पाटील यांनी विधीमंडळात बोलताना केली.



# स्व. संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ बार्शीत कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ मार्च**

बार्शीचे सुपुत्र व मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी या व अन्य मागण्यांच्या अनुषंगाने पुकारण्यात आलेल्या बार्शी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अत्यावश्यक सेवा वगळता बार्शी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. समाज बांधवांच्यावतीने यावेळी निषेध मोर्चा काढून बार्शी तहसील समोर आ. धनंजय मुंडे तसेच वाल्मिक कराड व अन्य आरोपींच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले.




स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला आता जवळपास तीन महिने पूर्ण होत आले आहेत. नुकतेच त्यांच्या निर्घृण हत्येचे फोटो समाज माध्यमात व्हायरल झाले आहेत. देशमुख यांची आरोपींनी ज्या प्रकारे निर्घृण हत्या केली आहे, ते फोटो पाहून समाजात संताप उफाळून आला आहे. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेची क्रूरता समोर आल्यानंतर यातील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी या व अन्य मागण्यांच्या अनुषंगाने बंद पुकारण्यात आला होता. आज सकाळ पासून सर्वत्र शुकशुकाट होता. सकाळी १० च्या सुमारास समाजबांधव शिवसृष्टी येथे एकत्र जमले व तेथून कचेरी रोडने निषेध मोर्चा तहसील कार्यालयावर नेण्यात आला. यावेळी सरपंच स्व. संतोष देशमुख अमर रहे अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, आ. धनंजय मुंडे यांच्या आमदारकीचा राजीनामा घेण्यात यावा, आ. धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांचे संपूर्ण सीडीआर तपासुन धनंजय मुंडे यांना सहआरोपी करण्यात यावे. फरार आरोपी कृष्णा आंधळे याला लवकरात लवकर अटक करावी अशा मागण्या या मोर्चाद्वारे करण्यात आल्या.

यावेळी समाज बांधवांनी तहसीलदार एफ. आर. शेख यांना मागणीचे निवेदन दिले. समाज बांधवांच्या भावना शासना पर्यंत पोहोचवू असा शब्द यावेळी तहसीलदार यांनी दिला. दरम्यान, दिवसभर बाजारपेठ बंद होती. मुख्य बाजार पेठेत शुकशुकाट दिसत होता. बार्शीसह आगळगाव येथे ही कडकडीत बंद पाळण्यात आला. बुधवारी चिखर्डे येथेही बंद पाळण्यात आला होता.



# उपळाई खुर्द ग्रामस्थांचे वीज पुरवठ्यासाठी रास्ता रोको

**तहसीलदार सचिन मुळीक यांना दिले निवेदन; महावितरणनेही दिले आश्वासन**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ मार्च-**

उपळाई खुर्द (ता. माढा) येथे सततच्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे त्रासलेल्या ग्रामस्थांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातर्फे महावितरणच्या विरोधात गुरूवारी सकाळी दहा वाजता येथील यावली-माढा रास्त्यावर एसटी बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

शरदचंद्र पवार गटाच्या सोलापूर जिल्हा युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी यांनी गेल्या काही दिवसापूर्वी उपळाई खुर्द सबस्टेशनला भेट देऊन वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी तोंडी स्वरूपात मागणी केली होती. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. तसेच वीजपुरवठाही सुरळीत जाला नाही. श्री. कुलकर्णी व शेतकरी प्रतिनिधी शंभूराजे साठे यांच्या मार्गदर्शनाखाली उपळाई खुर्द परिसरातील गावातील शेतकरी व नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले. उपळाई खुर्द येथे ३३/११ के.व्ही. सबस्टेशन आहे. तेथून उपळाई खुर्द, उपळाई बुद्रुक, अंजनगाव, विठ्ठलवाडी, लोंढेवाडी, खैरेवाडी या गावासाठी वीज पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना किमान आठ तास वीज उपलब्ध करून देण्याचा शासन निर्णय असताना देखील गेल्या महिनाभरपासून वीज कंपनी कडून अखंड वीज दिली जात नाही. वारंवार वीज जात असल्यामुळे फळबागा तसेच इतर हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे सुरळीत वीजपुरवठा न झाल्यास त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीस महावितरण प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील असे महावितरणाला कळवून रास्ता रोको करण्यात येणार असल्याचे कळवण्यात आले होते. त्यानुसार गुरूवारी रस्ता रोको करण्यात आला. या रस्ता रोकोला महावितरण अधिकाऱ्यांकडून भेट देऊन उपळाई खुर्द व परिसरातील गावांचा वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी आवश्यक ती कामे चालू असून व राहिलेल्या कामासाठी गतीने पाठपुरावा करून कामे मार्गी लावण्याचे काम चालू आहे. काही काळात ही कामे पूर्ण होतील असे आश्वासनाचे पत्र माढा महावितरण कडून देण्यात आले आहे. तसेच आंदोलना ठिकाणी तहसीलदार सचिन मुळीक यांनी येऊन आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. या रस्तारोको वेळी विनंती कुलकर्णी, शंभू साठे, दीपक देशमुख, सुधाकर देवकर, रामभाऊ कदम, भागवत चौगुले, राजकुमार मोहिते, बालाजी गव्हाणे, हनुमंत जाधव, गोरे, लहू बोराडे औदुंबर कोल्हे, वसंत पाटील, अजित अनभुले, रायबा कदम, सचिन कदम, नितीन कदम उपस्थित होते.

# नगरपालिकेचा प्रताप; उन्हाळ्यात वृक्षारोपण

- पालिकेच्या उधळपट्टी धोरणा विरोधात लहुजी शक्ती सेनेची तक्रार
- नागरिकांच्या पैशाची उधळपट्टी थांबवा : वसंत देडे

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ६ मार्च-**

जुन महिन्यात वृक्षारोपण करण्याचा योग्य कालावधी असताना मार्च महिन्यात वृक्षारोपण करून नागरिकांच्या करस्वरूपात असलेल्या पैशांची उधळपट्टी अक्कलकांट नगर पालिकेकडून केली जात आहे याची त्वरीत चौकशी करावी अशी तक्रार सोलापुर जिल्हाधिकारी यांच्याकडे लहुजी शक्ती सेना सोलापुर जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी केली आहे. लहुजी शक्ती सेनेच्या शिष्टमंडळाचे निवेदन जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट नगरपालिका कार्यालय अधिक्षक शैलेश बिराजदार यानां देण्यात आले.



नगरपालिकेतील उधळपट्टी कामाची त्वरीत चौकशी व्हावी अन्यथा लहुजी शक्ती सेनेच्या वतीने आंदोलन उभारण्याच्या इशारा जिल्हा ध्यक्ष वसंत देडे यांनी दिला आहे निवेदन देण्या प्रसंगी शिष्टमंडळात .महेबुब मजावर,नवाज शेख,लहुजी शक्तीसेना तालुका. अध्यक्ष संतोष सुरवसे, तालुका स्टार प्रसारक सद्दाम शेख, जिल्हाध्यक्ष वसंत देडे, उपस्थित होते.नगरपालिकेत सध्या प्रशासकीय राजवट असल्याने अनेक निर्णय एकहाती होत आहेत .यामुळे सर्वच निर्णय शहरशीयानां हितकारक आहेत असे नाही . असे निवेदना मध्ये म्हटले आहे . कडक उन्हामध्ये नुकतेच मार्च महिन्यत शहरामध्ये काही ठिकाणी रोड डिव्हायडर जागेत अतांत्रिक पद्धतीने वृक्षारोपण करून अकलेचे तारे तोडले आहेत . वास्ताविक वृक्षारोपण जुन महिन्यात करण्याचा योग्य कालावधी होता . मार्च एपिल मे या तीव्र उन्हात ही झाडे जिवित राहणे बाबत मोठी शंका आहे . तीन महिने थांबुन जुन महिन्यात वृक्षारोपण करणे हितकारक होते . सध्या केलेले वृक्षारोप अतांत्रिक पद्धतीने केल्याचे प्रथम दर्शनी लक्षात येते . डिव्हायडर ची जागा कमी आहे . झाडे लावण्यासाठी खड्डे खोलवर घेतली नाहीत . केवळ छोटे एक फुटाचे खड्डे घेऊन बाहेर वाढलेली झाडे अलगद ठेवण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तीव्र उन्हा मध्ये ही झाडे टिकण्याची खात्री देता येणार नाही . केवळ झाडे लावण्याचा खर्च खर्ची घालण्यासाठी हा खटाटोप चालू आहे का? वृक्षारोपण योग्य वेळी तंत्र शुद्ध पद्धतीने करावेत. ऐन उन्हाळ्यात वृक्षारोपण करून नगरपालिके ला आर्थीक भुर्दड टाकण्याचा निर्णय घेणाऱ्यांवर वर योग्य ती कारवाई करा . या कामात किती रुपए खर्च झाली तेवढा दंड खर्च संबंधितांच्या पगारातुन वसुल करा अक्कलकोटमध्ये मोठ्या प्रमाणत विकास कामे चालु आहेत विकास कामे दर्जेदार व्हावीत शासनाचा पर्यायाने नागरिकाचा कर स्वरूपात जमा होणारा पैसा याच विनियोग योग्य पद्धतीने व्हावा ठेकेदारांची घरे भरण्यासाठी नपाची आर्थीक उधळपट्टी थांबवा. वृक्षारोपण बाबत झालेला खर्च याची ठेकेदाराची बिले अदा करू नयेत . अन्यथा लहुजी शक्ती सेना नगर पालिकेसमोर नपाच्या उधळपट्टी विरोधात जनतेचा पैसा वाचवा आंदोलन कराव लागेल. असा इशारा जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी जिल्हाधिकारी व नगरपालिका अक्कलकोट यांनां दिलेल्या निवेदनात दिला आहे .

# 'ओंकार' परिवाराला शुगर एक्सलन्स पुरस्कार

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ६ मार्च-**

ओंकार साखर कारखाना परिवाराला इंटरनॅशनल द शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शुगर एक्सलन्स पुरस्कार मिळाला. नवी दिल्ली येथे संस्थेचे प्रेसिडेंट मार्टीन व संजय आवास्वाकी यांच्या हस्ते संचालक बाबुराव बोत्रे-पाटील यांना प्रदान करण्यात आला.



साखर कारखानदारी म्हणजे न परवडणारा व अडचणीत असणारा व्यवसाय. पण ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखा बोत्रे-पाटील, संचालक प्रशातराव बोत्रे पाटील, ओमराजे बोत्रे-पाटील हे आव्हान गेल्या पाच वर्षांपूर्वी स्विकारले. बंद असलेले कारखाने सुरु झाल्यामुळे त्या भागाचा कायापालट झाला असून रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

# सहकार महर्षि कारखान्यात औद्योगिक सुरक्षितता सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.६ मार्च -**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये दि. ४ ते ११ मार्च २०२५ या कालावधीत औद्योगिक सुरक्षितता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्याचे उदघाटन शुक्रवारी सुरक्षितता दिनी सकाळी दहा वाजता कारखान्याचे इन्चार्ज शेतकी अधिकारी आर.एस.चव्हाण यांच्या हस्ते झाले.

यावेळी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अधिकारी, कर्मचारी यांना डेप्युटी चिफ् इंजिनिअर एस. पी. पताळे यांनी एकत्रितपणे सुरक्षिततेची शपथ दिली. त्यानंतर सेफ्टी ऑफिसर पी.बी. रणनवरे यांनी काम करताना कशी दक्षता घ्यावी, कामगाराचे हित व कारखान्याचे हित कसे जोपासावे, विविध विभागातील अडचणींबाबत मार्गदर्शन करून सुरक्षितता विभागामार्फत कामगारांना दिलेली सुरक्षा साधने याचा कसा वापर करावा याबाबतचे मार्गदर्शन केले. यावेळी सुरक्षिततेबाबतची व्हिडिओ फिल्म दाखवुन कामगारांना माहिती देण्यात आली. त्यानंतर कारखान्याचे चिफ् इंजिनिअर व फॅक्टरी मॅनेजर एस. के. गोडसे यांनी कारखान्यामध्ये काम करताना सुरक्षितता साधनांचा वापर करुन अपघात होणार नाही याची दक्षता घेणेबाबत मार्गदर्शन केले. या सप्ताहात फायर ट्रेनिंग, पर्यावरण व औद्योगिक सुरक्षिततेबाबतची माहिती दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी निबंध, चारोळी व घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यामध्ये निबंध लेखनात प्रथम क्रमांक जे.पी.साठे (को-जन), द्वितीय आर.टी. दौलतोडे (इंजिनिअरींग), तृतीय पी.के.पवार (टाईम ऑफिस), चारोळी लेखनात प्रथम क्रमांक एस.आर.कुंभार (शेती), द्वितीय व्ही. पी.कुंभार (परचेस), तृतीय डी. एस. चव्हाण (डिस्टीलरी) तसेच घोषवाक्य लेखनात प्रथम क्रमांक एस. जी. दोशी (ऍ.असिड), द्वितीय व्ही.आर.दुरणे (परचेस), तृत्तीय व्ही.एच.वाघ (ऍ.ऍसिड) यांना प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास कारखान्याचे कार्यलक्षी संचालक आर. डी. रणनवरे, परचेस ऑफिसर आर.एस.गायकवाड, लेबर ऍन्ड वेलफेअर ऑफिसर एस.एम. साळुंखे, हेड टाईम किपर व्ही.आर.वाघ, पर्यावरण अधिकारी पी. एच. इनामदार, इन्चार्ज कॉम्प्युटर प्रोग्रॅमर एस. जी. नरसाळे, सिक्युरिटी ऑफिसर एन.सी.निंबाळकर व कारखान्याचे सर्व कामगार तसेच युनियन प्रतिनिधी उपस्थित होते. गजानन पिसे यांनी सूत्रसंचालन केले.

## संक्षिप्त वृत्त



### संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेच्या निधी वितरणात विलंब : चाकोते

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ सेवा योजनेच्या निधी वितरणात विलंब होत आहे. निधी वितरण वेळेवर होण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी सुदीप चाकोते प्रदेशाध्यक्ष कॉँग्रेस सेवा दल यंग ब्रिगेड व योजनेचे लाभार्थी यांनी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे. राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या निधी वितरणात होणाऱ्या विलंबामुळे अनेक लाभार्थ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. वृद्ध, विधवा, अपंग आणि निराधार नागरिकांचे जीवन या अनुदानावर अवलंबून असल्याने वेळेवर निधी न मिळाल्यास त्यांचे जगणे कठीण होत आहे. राज्य सरकारकडून नियमित स्वरूपात निधी मिळणे अपेक्षित असताना वेळोवेळी होणाऱ्या विलंबामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजी आहे. याप्रसंगी सोशल मीडिया पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजय कुराडे, मल्लिकार्जुन सोलापुरे, नूरअहमद नालवार, चंद्रकांत टिक्के, यश माशाळे, श्रीकांत दासरी आकाश तिपरादी अक्षय बिराजदार आदी उपस्थित होते.



### मेहता शाळेत भूगोल प्रश्नमंजूषा स्पर्धा

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

भूगोल दिनाचे औचित्य साधून कै.वि.मो.मेहता प्रशालेत इयत्ता ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी भूगोल प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये अभ्यासक्रमाबरोबर सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांच्या फेरी पार पडल्या. प्रश्नमंजुषा स्पर्धेचे इयत्ता ९ वी च्या अनुष्का गायकवाड, विश्वभारती अंधारे, दीपक अंगडी, सुजय हजारे या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन दयानंद महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख वीरभद्र दंडे यांच्याकडून रोपाला पाणी घालून करण्यात आले. स्पर्धेनंतर विजयी गटांना पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी रांगोळी विभागाकडून 'सेव्ह प्लॅनेट' ही रांगोळी संदेशपर काढण्यात आली. सूत्रसंचालकांनी प्रेक्षक विद्यार्थ्यांनाही प्रश्न विचारले. बरोबर उत्तर दिलेल्यांना लगेच बक्षीसही दिले. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, भूगोल विभाग प्रमुख संपदा वळसंगकर उपस्थित होते.




### सेवासदन महाविद्यालयात विज्ञान दिवस

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दयानंद कला आणि शास्त्र महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक हेमंत वैद्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी यांनी विज्ञान दिवस साजरा करण्याचे महत्त्व विषद केले. रणजित माढेकर यांनी मराठी राज भाषा दिवस साजरा करण्याचे महत्त्व सांगितले. यावेळी सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. पद्मकुमार उपाध्ये, प्रा. मधुरा गोगटे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता मादळे यांनी केले. प्रा. गीता मोहोळकर यांनी आभार मानले.

### चौधरी फाउंडेशनच्यावतीने रविवारी महाआरोग्य शिबिर

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

चौधरी फाउंडेशन आणि शांताई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ९ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत गोविंद श्री मंगल कार्यालय जुळे सोलापूर येथील संतोषी माता मंदिर येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या शिबिरात विविध आजारावर निदान व उपचारही करण्यात येणार आहेत. कास्य थाळी फूट मसाज, मान, पाठ, कंबर, गुडघे दुखीवर मसाज पद्धतीने उपचार, एक्यूपंक्चर, ॲक्युप्रेशर, निरोपॅथी उपचार, दंत तपासणी, दंत व नेत्र तपासणी, रक्तदान शिबिर, रक्त तपासणी शिबिर घेण्यात येणार आहे. मधुमेहावर मोफत औषध उपचार करण्यात येणार आहे. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शांताई फाउंडेशनच्या लक्ष्मी चव्हाण यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. अविनाश काटकर, डॉ. अरुण जडे, महेश अलकुंटे आदी उपस्थित होते.

# विधानसभेत आ. कोठेंनी शहर विकासाकडे वेधले लक्ष

## अभियांत्रिकी महाविद्यालय, टेक्स्टाईल पार्क, गोरक्षण अन् गणेशमूर्तीकरांच्या समस्यां मांडल्या अधिवेशनात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

सोलापुरात प्रस्तावित असलेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, टेक्स्टाईल पार्क, गोरक्षकांवर दाखल करण्यात येत असलेले खोटे गुन्हे, गणेश मूर्तीकारांच्या समस्या आदी विषयांवर आमदार देवेंद्र कोठे यांची तोफ अधिवेशनात धडाडली. मुंबईत सुरू असलेल्या अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी बुधवारी रात्री उशिरा ११ वाजता सोलापूर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शहर विकासाच्या प्रश्नांकडे सभागृहाचे आणि शासनाचे लक्ष वेधले.




आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, १९६० सालापासून प्रलंबित असलेल्या सोलापूरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघर्षाला ६५ वर्षांचा इतिहास आहे. सोलापुरात अनुकूल परिस्थिती असूनही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराडला हलवण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी २०१६ साली सोलापुरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी ३०० कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. सध्या सुरू असलेल्या शासकीय तंत्रनिकेतनाची ३४ एकर जागा आहे. तसेच पुरेसा तज्ञ प्राध्यापक वर्गही या ठिकाणी आहे. त्यामुळे शासनाने तत्परतेने निर्णय घेतला तर येत्या जून महिन्यापासून येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होऊ शकते. एक लाखाहून अधिक यंत्रमागधारक व कामगार असलेल्या आणि वस्त्रोद्योगासाठी अनुकूल वातावरण असलेल्या सोलापुरात टेक्स्टाईल पार्क होणे गरजेचे आहे. चादर, टॉवेल, युनिफॉर्म गारमेंट याचा एकत्रित समावेश करून टेक्स्टाईल पार्क तयार केल्यास येथे उद्योगांना मोठा भाव मिळेल. केंद्राकडून जाहीर झालेल्या ३० टेक्स्टाईल पार्कपैकी तसेच राज्य शासनाच्या टेक्स्टाईल प्रकल्पातही सोलापूरला स्थान मिळालेले नाही. सोलापूर शहरात गणेशमूर्ती तयार करणारे १८ हजार मूर्तिकार आहेत. पीओपीवरील बंदीमुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे पीओपी प्रकरणावर अंतिम निकाल लागेपर्यंत या मूर्तिकारांवर कोणतीही कारवाई करू नये याबाबत शासनाला सूचना द्यावी, अशी मागणी यावेळी आ. कोठे यांनी केली. सोलापूर शहर कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशच्या सीमेवर असल्याने या जिल्ह्यात गोहत्येचे तसेच गोतस्करीचे प्रमाण मोठे आहे. गोरक्षक गोरक्षणासाठी गेल्यानंतर त्यांच्यावर हल्ले होणे, खोटे गुन्हे दाखल होणे असे प्रकार होतात. त्यामुळे शासनाने गोरक्षणासाठी चांगले कायदे करावेत. त्याचबरोबर हल्लेखोरांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यासाठी शासनाने पावले उचलावीत, अशी मागणीदेखील कोठे यांनी अधिवेशनात केली. याशिवाय प्रलंबित शासकीय योजना पूर्ण कराव्यात, सोलापूर शहरासाठी अमृत २ योजना, १०० इलेक्ट्रिक बस आदी योजनांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही आमदार कोठे यांनी केली.

**सोशल मिडियावर कौतुकांचा वर्षाव**

आमदार देवेंद्र कोठे यांनी अधिवेशन काळात दिवसभर सभागृहात कामकाजास उपस्थित राहून रात्री तब्बल ११ वाजेपर्यंत थांबून चर्चेची संधी मिळताच सोलापूरकरांच्या व्यथा मांडल्या. आमदार देवेंद्र कोठे यांच्या या कार्यतत्परतेबद्दल, विकासाची तळमळ आणि प्रामाणिक प्रयत्नांबद्दल सोलापूरकरांनी गुरुवारी दिवसभर फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम आदी समाजमाध्यमांवर आमदार देवेंद्र कोठे यांच्यावर कौतुकांचा वर्षाव केला.

# जुनी मिल जागेसाठी पैसे भरलेल्या नागरिकांनी प्लॉट ताब्यात घ्यावा

### कामगार नेते कुमार करजगी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

जुनी मिल येथील जागेसाठी पैसे भरलेल्या नागरिकांनी एक महिन्याच्या आत महापालिकेच्या नियमाप्रमाणे होणारी रक्कम भरून आपला प्लॉट ताब्यात घ्यावा अन्यथा संबंधितांना कोर्टाच्या आदेशाप्रमाणे व्याजासह रक्कम देण्यात येईल, असे आवाहन जुनी मिल बेकार कामगार संघटना, उमा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कुमार करजगी यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

मालक मुरारका यांनी जुनी मिल तडकाफडकी बंद केली. गरीब कामगारांना त्यांच्या कष्टाचा पैसा मिलच्या मशिनरी व इतर मालमत्ता विक्री करून २५ वर्षानंतर सुद्धा मिळाला नाही. मुंबई हाय हायकोर्ट रिसिव्हरने मिलची जमीन १९८८ साली जाहीर लिलावाने विक्रीस काढली. त्यावेळी कुमार करजगी यांनी जमिनीच्या जागा विक्रीतून गरीब कामगारांना पैसे मिळण्यासाठी ९ ऑगस्ट १९८८ रोजी जुनी मिल बेकार कामगार वारसदार संघटना स्थापन केली. दरम्यान, जुनी मिल मध्ये प्लॉट मिळविण्यासाठी प्रतिष्ठित मंडळांनी आवाहनाप्रमाणे युको बँकेत पैसे जमा केले होते. ७७८ नागरिकांनी दोन कोटी ५६ लाख रुपये लिलावाप्रमाणे २५ टक्के रक्कम न्यायालयात भरले. यामुळे जुनी मिलची सर्व जागा फक्त दोन कोटीच्या आत घेऊन पाहणाऱ्या राजकीय बिल्डर मंडळीचा स्वार्थी डाव उधळला गेला. त्या मंडळींनी अधिकारी वर्गाला हाताशी धरून गैरसमज निर्माण केल्याने नऊ कोटी ३६ लाख रुपये घेतलेली जागा राहिलेली ७५ टक्के रक्कम भरू न शकल्याने उच्च न्यायालयाने समितीच्या नावे मंजूर झालेला लिलाव रद्द करून जुनी मिल जागेसाठी ज्या ७७८ नागरिकांनी भरलेली रक्कम जप्त केली. उच्च न्यायालयाच्या आदेशाने २२ एप्रिल १९९८ रोजी उमा सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून १९८९ साली ज्या ७७८ नागरिकांनी जागेसाठी २५ टक्के रक्कम भरली होती त्यांना एक ते दहा उमा नगरी गृहनिर्माण संस्था स्थापन करून चिठ्ठी पद्धतीने प्लॉटचे वाटप केले. जागेवर पैसे भरलेल्या ८० टक्के नागरिक गेल्या वीस वर्षापासून आपले घर बांधून राहत आहेत. महापालिकेने जागेवरील पूर्ण आरक्षण न उठवल्याने प्लॉटचे वाटप होऊन सुद्धा या जागेवर पैसे भरलेल्यापैकी दहा टक्के लोकांना घरी बांधता येत नाही. ज्या किमतीत कोर्टातून जागा आली आहे त्याच किमतीत संबंधित पैसे भरलेल्या नागरिकांनी जागा घ्यावी. असे आवाहन करजगी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस तुकाराम मस्के, पल्लवी सुरवसे, विद्या माने, मनोज लोंढे, अमोल रणशृंगारे, सिद्राम ढोबळे, चंद्रकांत निंगफोडे आदी उपस्थित होते.



# 'सुवर्णधन'ला मुंबई वृत्तपत्र लेखक संघाचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने मुंबई येथे झालेल्या ४९व्या राज्य दिवाळी अंक स्पर्धेत संपादित केलेल्या अंकाची वृत्तपत्र लेखक चळवळीच्या अमृत महोत्सवी सांगता वर्षानिमित्त उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून, 'सुवर्णधन' ची आवाजकार मधुकर पाटकर पारितोषिकासाठी निवड करण्यात आली.

दुसऱ्या वर्षीच्या षण्मासिकाच्या पहिल्या अंकास आवाजकार मधुकर पाटकर यांच्या नावे, सुवर्णधन दिवाळी विशेषांकास गौरविण्यात आले. धुरु हॉल ट्रस्ट, दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, कामगार नेते दळवी, लेखक नितीन आव्हाड, पत्रकार सचिन परब ए.आय. चे मार्गदर्शक भानुदास साटम इत्यादी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्पर्धेसाठी एकूण १७३ दिवाळी अंक आले होते.

यातून सुवर्णधनची निवड करण्यात आली. यावेळी सुवर्णधन ज्ञानोपासक प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय चव्हाण, उपाध्यक्ष योगीराज चव्हाण, मुखपृष्ठकार दिग्विजय चव्हाण, प्राचार्य विजय गुंड, संचालक डॉ. संजय गुंड, प्रसन्न यरगल, गावगाथाकार धोंडाप्पा नांदे, डॉ. प्रदीप औजेकर वृत्त निवेदक शिवाजी भोसले, जय गुरुदेव,गौडगावचे लोकरे तात्या, संपादक प्रकाश जडे, कवी राजेंद्र भोसले, कॉम्ब्रेड दत्तात्रय डांगे आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

# उन्हाळ्याची चाहूल; पाणी साठवणुकीसाठी ड्रम बाजारपेठेत



### पाणी टंचाईत ग्राहकांचा ड्रम खरेदीसाठी कल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

सोलापूर शहर जिल्ह्यात उन्हाळ्याची चाहूल लागली असून, शहरातील बाजारपेठेत पाण्याच्या साठवणुकीसाठी वेगवेगळ्या प्रकारचे पाण्याचे ड्रम विक्रीसाठी दाखल झाले आहेत. शहर व जिल्ह्यातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर विक्रेत्यांनी मुंबई येथून ड्रम विक्रीसाठी मागवले आहेत. शहरातील कोंतम चौक येथील विविध दुकानात ड्रम उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

दरम्यान, उन्हाळ्यात तापमान वाढून पाण्याची पातळी घटल्यानंतर मुबलक प्रमाणात पाणी साठवण्यासाठी ग्राहकांकडून या छोट्या आणि मोठ्या आकाराच्या ड्रमची मागणी केली जाते. दर उन्हाळ्यात तापमान वाढून पाण्याची टंचाई भासते. शहरी आणि ग्रामीण भागात नेहमी हीच समस्या भेडसावते. पाणी पुरवठा लांबणीवर गेल्यास पाणी पुरवठा योजना विस्कळीत होत जाते. त्या परिस्थिती पाणी मुबलक प्रमाणात साठविण्यासाठी पाच लिटर पासून ते पाचशे लिटर क्षमतेचे ड्रम बाजारात उपलब्ध झाले आहेत. त्यांची किंमत सुमारे ३०० ते ८०० रुपये प्रति ड्रम अशी आहे.

**पाणी टंचाई वाढल्यास ड्रमची मागणी वाढेल**

मार्च महिन्याअखेर सोलापूर शहर व ग्रामीण भागात पाणी प्रश्न नेहमी भेडसावतो.अशा प्रसंगी ग्राहकांकडून ड्रमची मागणी केली जाते. मात्र यंदाच्या हंगामात अजून तरी पाणी टंचाईची परस्थिती निर्माण झालेली, नाही मात्र पुढील महिन्यात उन्ह वाढल्यास पाणी पुरवठा योजना विस्कळीत झाल्यास, पाणी साठवण्यासाठी ड्रमची मागणी वाढेल. सद्या बाजारपेठेत मागणी कमी प्रमाणात आहे.

**- गॉस पठाण, ड्रम विक्रेते**

पाणी पुरवठा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.उजनी धरणातील पाणीसाठा कमी झाल्यानंतर सोलापुर शहरावर पाणी संकट येते. अशावेळी पाण्यासाठी ड्रमची आवश्यकता असते. त्याच पार्श्वभूमीवर ड्रम खरेदी करण्यासाठी बाजारात आलो आहोत.

**- अजय खांडेकर, ग्राहक**

# वजनेमापे, तोलन उपकरणांची पडताळणी करा

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

सामान्य ग्राहकांना अचूक वजन व मापाने वस्तू अथवा सेवा देण्याच्या दृष्टीने सर्व किरकोळ व्यापारी, घाऊक व्यापारी व सर्व प्रकारचे वजन माप वापरकर्त्यांनी त्यांच्याकडील वजने, मापे व उपकरणांची विहीत कालावधीमध्ये फेरपडताळणी व मुद्रांकन करून घ्यावे, असे आवाहन वैध मापन शास्त्र उपनियंत्रक ए. डी. गेटमे यांनी केले आहे. वैधमापनशास्त्र अधिनियम २००९ च्या तरतूदीनूसार विहीत कालावधीत वजने मापे व तोलन उपकरणे यांची फेरपडताळणी व मुद्रांकन न केल्यास कारवाई शुल्क वा प्रशमन शुल्क याचा नाहक बोजा पडू शकतो. तरी सर्व वजन माप उपयोगकर्ते यांनी त्यांच्या वापरात असणारी वजने मापे व तोलन उपकरणांची फेरपडताळणी व मुद्रांकन करून घ्यावे.

# जुळे सोलापुरात आज खेळ पैठणीचा कार्यक्रम

### परशुराम जन्मोत्सव समितीतर्फे आयोजन

### कर्तृत्ववान महिलांचा होणार गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

जागतीक महिला दिनानिमित्त जुळे सोलापूर परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने शुक्रवारी दि. ७ मार्चला सायंकाळी साडेपाच वाजता द्वारकाधीश मंदिरात खेळ पैठणीचा हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी शहरातील सहा ब्राम्हण संघटनातर्फे कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे निवेदन आणि खेळाचे संचलन आर.जे. पल्लवी करणार आहे. सदर खेळात तीन क्रमांक काढण्यात यणार आहेत. प्रथम क्रमांकास पैठणी मिळणार आहे. ही प्रथम क्रमांकाची पैठणी टीजेएसबी सहकारी बँकेच्या उपशाखा प्रबंधक अंजली कुलकर्णी यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस मयुरेश इंटरप्रायजेसच्या सुवर्णा कुलकर्णी यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. यावेळी महापालिकेच्या उपनिबंधक डॉ. मंजिरी कुलकर्णी, दिपाली केटरर्सच्या संचालिका दिपाली कुलकर्णी, सामाजीक व नाट्य क्षेत्रातील स्मिता देशपांडे, ज्योतीषशास्त्रातील वसुंधरा पाठक, संगीत अलंकार प्राजक्ता देशपांडे, वि.मो. मेहता प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांचा सहा संघटानांच्या वतीने गौरव करण्यात येणार आहे. सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

खेळ पैठणीच्या स्पर्धेबाबत जयलक्ष्मी पडगानुर (९६९९६८८८०९), शर्वरी रानडे (९९६००२३७१८), स्वराली ढोनसळे (८७९३२९५६२६), स्वानंदी देशपांडे (८२०८७८५६४८) यांच्याशी संपर्क साधावा.

# पांडुरंग, स्वरा भजनी मंडळाने मारली बाजी

### शिवस्मारकतर्फे भजन स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे आयोजित भजन स्पर्धेत पुरुष गटात पांडुरंग भजनी मंडळ (वाघोली) आणि स्वरा भजनी मंडळाने बाजी मारली.

दोन दिवस चाललेल्या भजन स्पर्धेचे पारितोषिक वितरण विश्व हिंदू परिषदेचे प्रांत कार्यकारिणी सदस्य हभप मारुती महाराज तुणतुणे यांच्या हस्ते शिवस्मारक सभागृहात करण्यात आले.

यावेळी शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसने, गोविंद दाते, वैशाली देशपांडे, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर उपस्थित होते.प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या संघास ७, ५ व ३ हजार रुपये व उत्तेजनार्थ संघास एक हजार रुपये तसेच सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र तर सहभागी संघाना प्रमाणपत्र देण्यात आले. गोविंद दाते व वैशाली देशपांडे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

शिवस्मारकचे संचालक प्रसाद जिरांकलगीकर यांनी सूत्रसंचालन तर कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी आभार मानले.



**भजन स्पर्धेच्या निकाल पुढीलप्रमाणे (प्रथम तीन व उत्तेजनार्थ) पुरुष गट :** पांडुरंग भजनी मंडळ (वाघोली), छत्रपती शिवाजी महाराज भजनी मंडळ (जेवळी), माऊली भजनी मंडळ (मसले चौधरी), राधाकृष्ण भजनी मंडळ (हिप्परगा).

**महिला गट :** स्वरा भजनी मंडळ, चैतन्य भजनी मंडळ, ज्ञानेश्वर महिला भजनी मंडळ, उपासना भजनी मंडळ. उत्कृष्ट वादक : छत्रपती शिवाजी महाराज भजनी मंडळ (जेवळी).

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्रीराम पुजारी प्रतिष्ठानतर्फे शनिवारी तुझे आहे तुजपाशी नाटक

### जन्मशताब्दी निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

श्रीराम पुजारी प्रतिष्ठानच्या वतीने स्व. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत शनिवार ८ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात ''तुझे आहे तुजपाशी'' हे नाटक आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष डॉ. प्रकाश जोशी आणि कार्याध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णीवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्रीराम पुजारी प्रतिष्ठान सोलापूरच्या वतीने गेल्या चार दशकावून अधिक काळ विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी योगदान दिले आहे. आजपर्यंत एकूण ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मदत केली आहे. दरम्यान, प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सोलापूर रसिकांसाठी ८ मार्च रोजी पु.ल. देशपांडे यांचे नाटक आयोजित करण्यात आले आहे. सन २०२३ मध्ये प्रतिष्ठानच्या नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे.

अध्यक्ष म्हणून डॉ. प्रकाश जोशी हे कार्यरत आहेत. कार्याध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णीवाल, कोषाध्यक्ष डॉ. किरण जोशी, सचिव ललिता दातार , विश्वस्त डॉ. श्रीकांत कामतकर, डॉ. विद्याधर बोराडे, प्रा. केशव शिंदे, प्रा. प्रमोद वैद्य आदी व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...

### कर्ज काढून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**सोलापूर, दि. ६ मार्च -**

व्यवसायाकरता बँकेतून एक कोटीचे कर्ज काढून देतो, त्या कर्जाचे रकमेला ४० टक्के सबसिडी मिळेल असे आमिष दाखवून कर्ज मंजुरी करीता प्रोसेसिंग फी म्हणून ८३ हजार रुपये घेवून फसवणूक केली. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ऑगस्ट २०२३ ते आजतागायत शहरातील समाधान नगर या ठिकाणी घडली आहे. याबाबत फिरद जाफर शेख (वय ५२, रा. सरवदे नगर मुळेगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धानेश्वरी इरय्या समाधन (रा. समाधान नगर सोलापूर), शाम हब्बु राठोड (रा. प्रतापनगर तांडा, सोलापूर) यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरीद शेख यास आरोपींनी संगनमत करून व्यवसाय करीता बँकेतून १ कोटीचे कर्ज काढून देतो. त्या कर्जाचे रकमेला ४० टक्के सबसिडी मिळेल असे आमिष दाखवले. कर्ज मंजूरी करता लागणारी प्रोसेसिंग फी म्हणून फिर्यादी कडून ८३ हजार रुपये घेतले. कर्ज प्रकरणाचे काम केलेले नाही. त्यांना फिर्यादीने दिलेल्या रकमेची वेळोवेळी मागणी केली असता त्या दोघांनी फिर्यादीस न वटणारे चेक देवून फिर्यादीचा विश्वास घात करून फसवणूक केली आहे. याप्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक इंगळे करीत आहेत.

### कोऱ्या बॉन्डवर सही घेऊन झोपडपट्टी वर कब्जा

**सोलापूर, दि. ६ मार्च -**

पतीच्या आजाराचा फायदा घेवून कोऱ्या बॉन्डवर सह्या घेवून जागा लाटणाऱ्या एका सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १० जून २०२३ ते आज तागायत सत्तर फूट रोड इंदिरा नगर बी झोपडपट्टी क्र.७९७ सोलापूर या ठिकाणी घडली. याबाबत सारिका सुनिल विटकर (वय ४२ रा.सत्तर फूट रोड,इंदिरा नगर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिपक गुरप्पा कनले यांच्यावर सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनकर पुढील तपास करीत आहेत.

### पाच लाखांसाठी पत्नीचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ मार्च -**

पाच लाख रुपयांसाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ज्योती विशाल कलाल (वय २२, रा. सुशिल नगर, विजापूर रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती विशाल, सासू रेखा, दीर वसंत, नणंद आशा, सासरे मोहन (सर्व रा. इंदिरा नगर मड्डी नं. २, शहाबाद, ता. चितापूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ डिसेंबर २०२२ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत ज्योती या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती विशाल व इतरांनी मिळून किरकोळ कारणावरून शिवीगाळ करून ज्योती यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. तसेच विशाल याने चारित्र्याचा संशय घेऊन मारहाण केली. नोकरीवर कायम होण्यासाठी ५ लाख रुपयांची आवश्यकता आहे, ते माहेरून आण तरच मुलीला नांदायला घेतो अन्यथा तुला नांदविणार नाही अशी धमकी देऊन हुंड्यांची मागणी केली. म्हणून पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार सोनार तपास करीत आहेत.

### पंधे अपार्टमेंटमध्ये चोरी करणाऱ्यास नागरीकांनी पकडले

**सोलापूर, दि. ६ मार्च -**

पंधे अपार्टमेंटमधील फ्लॅटमधून मोबाईल चोरी करून पळून जाणाऱ्यास नागरीकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.याबाबत आकाश सूर्यकांत नारायणकर (वय २८, रा. पंधे अपार्टमेंट, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अशितोष उर्फ अशोक संतोष शेंडगे (रा. उद्यान चौक, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ मार्च रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास आकाश नारायणकर हे घरात झोपले असता वरील मजल्यावरील ब्लॉकमध्ये कशाचा तरी आवाज आल्याने नारायणकर यांना जाग आली व बाहेर आहे. नारायणकर हे बाहेर आले असता त्यांना एक इसम पायरीवरून खाली पळत जात असताना दिसला. त्यास अपार्टमेंटमधील १० ते १५ जणांनी पकडून चोप दिला. त्या व्यक्तीच्या हातात नारायणकर यांचे दोन वापरते मोबाईल हॅन्डसेट होते. ते नारायणकर यांनी काढून घेतले व ११२ ला कॉल केला. त्यावेळी जोडभावी पेठ पोलिसांनी घटनास्थळावर येऊन अशितोष शेंडगे यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.


## बांगलादेशी नागरिकांना पोलिस कोठडी

### बनावट आधार कार्डद्वारे सोलापुरात एमआयडीसीमधील गारमेंट कारखान्यात करीत होते काम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च -**

बनावट आधार कार्डचा वापर करुन सोलापुरात राहणाऱ्या १२ बांगलादेशी नागरिकांना एमआयडीसी पोलिसांनी बुधवारी रात्री ताब्यात घेतले. या सर्व बांगलादेशी लोकांना पोलिसांनी अटक केली असून त्यांना गुरुवारी न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर सर्वांना न्यायदंडाधिकारी श्रीमती कुलकर्णी यांनी पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

नासीर सरकार मो. बदी उज्जमान (वय २२, रा. ग्राम तैगोरिया भाग राजशाही जि नाटोर बांग्लादेश), मोहम्मद नजीरउल्ला इस्लाम (वय ३०, रा. कौदमपल्ली जि भोगुर बांग्लादेश), मोहम्मद मिजानूर रोहमन (वय २६, रा. नेत्रकोना बांग्लादेश), बाबुमिया सुलतान (वय २५, रा. कोदंलपुर गोसाई राहत शरियतपुर बांग्लादेश), शफिक रशिद मोडंल (वय ३१, रा. ढाका बांग्लादेश), मोहम्मद रहुलआमीन खलील फोराजी (वय ३३, रा. परगना पश्चिम बंगाल रावगा बांग्लादेश), इम्रान नुरआलम हुसेन (वय २७, रा. कोदंलपुर गोसाई राहत शरियतपुर बांग्लादेश), महमद हजरतअली पोलाश (वय ३१, रा. ग्राम काजीबारा जि बोगुरगा राजशाही बांग्लादेश), महमद हजरतअली पोलाश (वय ३१, रा. ग्राम नारहट्टा तथा तहालून जि बुगुरा बांग्लादेश), मोहम्मद सोहेल जाबेदअल्ली सरदार (वय २२, रा. ढाका बांग्लादेश), अलाल नुरइस्लाम मियाँ (वय ३५, रा. नॉर्थ परगना पश्चिम बंगाल), मोहम्मद अलीमीन हानिफ बेफिरी (वय २९, रा. नॉर्थ परगना पश्चिम बंगाल देश बांग्लादेश) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यां बांग्लादेशी नागरीकांची



नावे आहेत. याबाबत पोलिस उपनिरीक्षक राजेंद्रप्रसाद वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शिवाय सोलापुरात राहण्यासाठी त्यांना कोणी मदत केली? त्यांनी बनावट कागदपत्र कशी आणि कुठून मिळवली? याचा तपास सुरु आहे. भारतात अवैद्य मार्गाने घुसखोरी करून बनावट आधार कार्ड बनवून शहरातील अक्कलकोट रोडवरील एम आयडीसीमधील एका रेडीमेड ड्रेस तयार करण्याच्या कारखान्यातून बुधवारी रात्री ताब्यात घेतले. ई आर टी चौक येथील प्लॉट नं २०/२ मध्ये श्री जगंदबा महिला रेडीमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औदयोगिक संस्था मर्या सोलापूर ही अंध व अंपग कार्यरत असणारी सहकारी औदयोगिक संस्था आहे. या ठिकाणी वरील सर्व बांगलादेशी पोलिसांना सापडले आहेत. हे सर्वजण कारखान्यात टेलरिंगचे काम करीत गेल्या काही महिन्यापासून राहात होते.

भारत देशामध्ये येण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या वैध प्रवासी परवानगीशिवाय तसेच कागदपत्राशिवाय भारत-बांग्लादेश सीमेवरील मुलकी (नोदंणी) अधिकारी यांचे लेखी परवानगी शिवाय अवैध मार्गाने घुसखोरी करून भारत देशात प्रवेश करून बनावट भारतीय आधारकार्ड बनवून ते सोबत बाळगून सोलापूर शहरात वास्तव्य करीत असताना मिळून आले. या बांगलादेशी नागरिकांना सोलापुरात श्री जगदंबा औद्योगिक संस्थेमध्ये कुणी वास्तव्यास ठेवले होते, याचा तपास केला जात असून या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक खोमणे हे करीत आहेत.

**सिंडीकेट आहे का याचा तपास होणार**

शहरात पकडण्यात आलेल्या बांग्लादेशी नागरीकांकडे भारत देशाचे बनावट आधार कार्ड आहेत. त्यामुळे त्यांना भारत देशामध्ये आणण्यासाठी कोणी मदत केली, त्यांचे आधार कार्ड तयार करण्यासाठी कोणी मदत केली आणि त्यांचे आणखी साथीदार हे कोठे कोठे आहेत याचा तपास पोलिसांकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे याप्रकरणात बांग्लादेशी नागरीकांना भारतात आणण्यासाठी सिंडीकेट कार्यरत आहे का या अनुषंगानेदेखील पोलिसांचा तपास सुरु असल्याचे पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी सांगितले.



## शंभूप्रेमींकडून अबू आजमीचा तिरडी मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च -**

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने सपाचे आ. अबु आझमी यांचा गुरुवारी दुपारी तिरडी मोर्चा काढला. यावेळी जुना पूना नाका येथील स्मशानभुमीजवळ फौजदार चावडी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले.

आ. अबू आझमी यांनी औरंगजेबचे गुनगान गायल्याप्रकरणावरून त्यांच्या विरोधात संतापाची लाट उटली आहे. याच कारणावरून सोलापुरातील शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने अबु आझमी यांचा तिरडी मोर्चा काढण्यात आला. हॉटेल ॲम्बेसिटर येथून निघालेल्या या तिरडी मोर्चात राम नाम स्त्य है, अबू आजमीच कराच काय, खाली मुंडी वर पायच्या घोषणा देण्यात आल्या. हॉटेल अंबेसिटर ते पुना नाका स्मसानभूमी पर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. पूना नाका स्मशानभूमीजवळ फौजदार चावडी पोलिसांनी हा तिरडी मोर्चा अडवून आंदोलनतकर्त्यांना ताब्यात घेतले. अबू आजमी यांच्या वक्तव्यच्या विरोधात आम्ही आज त्या अबू आजमीची तिरडी काढली आणि मुख्यमंत्री फडणवीस यांनी अबू आजमीवर गुन्हा दाखल करून मोक्का लावावा किंवा अबू आजमीच पार्सल पाकिस्तान किंवा अफगाणिस्तानला पाठवावे. येणाऱ्या काळात अबू आजमी महाराष्ट्रात जिथे जाईल तिथे आम्ही सर्व शिवभक्त त्याच्या विरोधात गनिमी काव्याने आंदोलन करणार असल्याचे राम जाधव यांनी सांगितले. यावेळी राहुल दहिहंडे, राजाभाऊ गेजगे, संदीप चेळेकर, लोकेश इरकशेटी, पवन आलुरे, वीरेश कलशेटी, तुषार अर्जुन, बबलू सावंत आदी शिवभक्त उपस्थित होते.



कृष्णात पाटील



युवराज माळगे



अक्षय कुलकर्णी

## लायन्स मेट्रो क्लबचे युवारत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

लायन्स क्लब सोलापूर मेट्रो तर्फे महिला दिनच्या निमित्ताने स्त्रीरत्न व युवारत्न पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

स्त्रीरत्नमध्ये एस्ट्रो किड्सच्या संचालिका राजेश्वरीभादुले,डॉ.संस्कृतीवळसंगकर,प्राचार्या कीर्ती भोसले, पत्रकार अश्विनी तडवळकर व प्रमिला चोरगे आणि अभिनय क्षेत्रातील अर्चना सलवार यांचा तर युवारत्नमध्ये प्रशासकीय अधिकारी कृष्णात पाटील, युवराज माळगे व अक्षय कुलकर्णी यांचा समावेश आहे. ८ मार्च रोजी लायन्स क्लबचे प्रांतपाल एमजेएफ लायन ॲड. मल्लिनाथ पाटील यांच्या हस्ते डफरीन चौकातील आयएमए हॉलमध्ये या पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावेळी सर्वांग सुंदर शाळा पुरस्कार हा श्री वीरतपस्वी इंग्लिश मीडियम स्कूल अक्कलकोट रोड यांना प्रदान करण्यात येणार आहे व लायन्स क्लबतर्फे आयोजित विविध शैक्षणिक स्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांनाही बक्षिसे दिले जाईल.

यावेळी प्रांत सचिव डॉ. अभिजीत जोशी, प्रांत खजिनदार महेश नळे, मुख्य कार्यकारी अधिकारी गंगाप्रसाद बंडेवार, विभागीय सभापती राहुल दोशी, क्षेत्रीय सभापती किरण कुलकर्णी व मेट्रो क्लबचे मार्गदर्शक डॉक्टर व्यंकटेश यजुर्वेदी यांची प्रमुख उपस्थिती आहे. याचे संयोजन क्लबच्या अध्यक्षा शलाका कुलकर्णी, सचिव विश्वनाथ आमने, खजिनदार रजिया शेख आदी यांनी केले आहे.

## सकाळी थंडीची हुडहुडी...अन् दुपारी उन्हाची काहीली

### शहराच्या तापमानात चढ उतार; शहरवासीयांना एकाच दिवसात हिवाळा पावसाळ्याची मिळतेय अनुभूती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

शहराच्या तापमानात गेल्या काही दिवसांपासून चढ-उतार पहावयास मिळत आहेत. वातावरणातील गारवा आणि उकाडा जाणवत आहे. त्यामुळे एकाच दिवसात हिवाळा आणि उन्हाळा अशा दोन्ही ऋतींची अनुभूती या निमित्ताने शहरवासीयांना मिळत आहे.

शहराच्या तापमानात यंदाच्या वर्षी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान खात्याने अंदाज व्यक्त करताना यंदाच्या हंगामात सोलापूर हे ''शोलापूर'' बनले असे भाकीत केले होते. हे भाकीत खरे ठरताना राज्यात गेल्या दिवसांपासून सोलापूरचे तापमान हायेस्ट आहे. ३७ ते ३९.४ अंश सेल्सिअस इतके तापमान तीन दिवसात हवामान खात्याकडे नोंदवले आहे. अजून एप्रिल व मे महिना



बाकी आहे. मार्च महिन्यातच तापमानाचा आलेख दिवसेंदिवस वाढतच असल्याने शहरवासीयांना सकाळी सकाळी थंडीची हुडहुडी आणि दुपारी रखरखीत व कडक उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गारवा आणि उकाडा यांचा विपरीत परिणाम पडत आहेत. सकाळी थंडीची तीव्रता अधिक जाणवते. तर भर दुपारी रखरखीत उन्हाच्या झळांनी अंगाची लाही लाही लाही होत आहे. रात्री पुन्हा तोच अंगाला झोंबणारा गारवा सर्वत्र पसरतो आहे. सदरचे दिवसागणिक बदलते हवामान नागरिकांना अनुकूल ठरत नसल्याचे दिसत आहे. यामुळे सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी यांचे प्रमाण वाढत आहे. कडक उन्हातून घरी आल्यावर थंड पाणी पिण्याचे प्रमाण नागरिकांमध्ये अधिक आहे. त्यामुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे. त्याच प्रमाणे थंड अन् गरम अशा परस्परांनापूरक नसणाऱ्या गोष्टी जर एकत्रित आल्या तर, त्यातून नव्या गोष्टीचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार दोन्ही गोष्टींचे एकत्रित करणे टाळले पाहिजे. जेणे करून आपल्या शारीरिक आरोग्य चांगले आणि उत्तम राहणार आहे.

**थंडी व उन्हापासून शरीराचे संरक्षण करा**

आजच्या काळात हवामन बदल मोठ्या प्रमाणात होत आहेत. सकाळी थंडीची तीव्रता अधिक जाणवते आहे. तर दुपारी कडक उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. सोलापूरचे तापमान देशातील सर्वाधिक तापमान म्हणून काल हवामान खात्याकडे नोंदवले गेले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी आपल्या शरीराची काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध जेष्ठ नागरिकांनी दुपारी घराबाहेर जाणे टाळणे आवश्यक आहे. सकाळी थंडी पासून संरक्षण व्हावे यासाठी उबदार कपडे परिधान करावेत. दुपारी हलकासा आणि सकस आहार घ्यावा. शरीरातील पाणी पातळी टिकून राहण्यासाठी भरपूर पाणी व लिंबू सरबत घ्यावे. प्रकृती बिघडल्यास तात्काळ वैद्यकीय उपचार घ्यावेत. कोणताही आजार अंगावर काढू नये.

**- डॉ.सुभाष भांगे, वैद्यकीय अधिकारी**


## सोलापूरच्या मुख्यमंत्री सचिवालय कक्षातून जनतेची १ हजार ८८६ प्रकरणे निकाली

### ● सामान्य जनतेच्या मुंबईच्या फेऱ्याही वाचल्या ● तांत्रिक कारणाने १४४ प्रकरणे राहिली पेंडिंग

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात निर्माण झालेल्या मुख्यमंत्री सचिवालय कक्षातून डिसेंबर २०२४ ते आजतागायत म्हणजेच अवघ्या ३ महिन्यात १ हजार ८८६ प्रकरणे निकाली काढण्यात आल्याने सर्वसामान्य जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहेत. दरम्यान, यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचला असल्याने अनेकजण आता आपल्या तक्रारी या कक्षामार्फतच सोडविणे पसंद करू लागले आहेत. सध्या या कक्षातून १४४ प्रकरणे काही तांत्रिक कारणाने पेंडिंग आहेत.

प्रारंभी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्ष सुरु करण्यात आले. त्यानंतर सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात हा कक्ष सुरू झाला आहे. सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन प्रश्न, सरकार स्तरावर असलेली कामे, त्यासंदर्भात प्राप्त होणारे अर्ज, निवदने, मंत्रालयातील मुख्यमंत्री सचिवालय कक्षात स्वीकारून त्यावर कार्यवाहीसाठी संबंधीत क्षेत्रीय स्तरावरील सरकारी यंत्रणेकडे पाठविण्यात येतात. सोलापूरच्या जिल्हास्तरीय मुख्यमंत्री



सचिवालय कक्षातून डिसेंबर २०२४ पर्यंत ५२४ प्रकरणे दाखल झाली होती. यातील ४७७ प्रकरणे निकाली निघाली असून, ७ प्रकरणे अंतिम टप्प्यात तर ४० प्रकरणे पेंडिंग आहेत. मुंबई येथे सोलापूर जिल्ह्यातून थेट ४१५ अर्ज दाखल झाले होते. यातील ३१४ प्रकरणे निर्गत तर १५ प्रकरणे अंतिम टप्प्यात आहेत. ८६ प्रकरणे पेंडिंग आहेत. सोलापूर आणि मुंबईद्वारे एकूण १२६ प्रकरणे पेंडिंग होती. जानेवारी २०२५मध्ये ७ प्रकरणापैकी २ निर्गत तर ५ पेंडिंग आहेत. मुंबई येथे याच महिन्यात २७ पैकी १९ निर्गत तर ८ प्रकरणे पेंडिंग आहेत. फेब्रुवारी महिन्यात ६ पैकी १ निर्गत आणि ५ पेंडिंग आहेत. या ठिकाणी सर्वसामान्य जनतेने अर्ज दाखल केल्यास ३१ दिवसांत हे अर्ज निकाली काढावे लागतील. यासाही लोकशाही दिनी पेंडिंगबाबत आढावा घेतला जातो.

**मुख्यमंत्री सचिवालय कक्षाचा काय होतो फायदा**

सर्वसामान्य माणसाला त्यांचे दैनंदिन आणि स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी आपले गाव, शहर सोडून मुंबईला यावे लागू नये, त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचावेत या हेतूने हे कक्ष सुरु करण्यात आले आहेत. त्याचबरोबर क्षेत्रिय पातळीवरचे प्रश्न क्षेत्रीय स्तरावरच सुटावेत आणि जिल्हास्तरीय प्रश्न जिल्हा लेवललाच सुटावेत ही त्यामागची भूमिका आहे. आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री सचिवालय कक्ष' सुरु झाल्याने सर्वसामान्य माणसाला नक्कीच दिलासा मिळणार आहे. त्यांना क्षेत्रीय, जिल्हा स्तरावरचे प्रश्न घेऊन मुंबईला येण्याची आता गरज नाही. मुख्यमंत्री यांना संबोधून करण्यात येणारे अर्ज, निवेदने संदर्भ आता या विभागीय, जिल्हा मुख्यमंत्री सचिवालय कक्षात देऊ शकतील.

**अर्जांवर अशी होते कारवाई**

विभागीय, जिल्हा पातळीवरील कक्षात आलेले अर्ज, निवेदनं संबंधित क्षेत्रीय, जिल्हा स्तरावरील यंत्रणेकडे योग्य कारवाईसाठी त्वरित पाठवली जाणार असून, लोकशाही दिनाच्या दिवशी या अर्ज आणि निवेदनांवर नेमकी काय कारवाई काय झाली याचा आढावा घेण्यात येतो. परवाच पार पडलेल्या लोकशाही दिनी आरडीसी मनिषा कुंभार यांनी सोलापूर जिल्ह्याचा आढावा घेतला.

**निवेदनाची पोच मिळते; दरमहा मुख्यमंत्रीही घेतात आढावा**

या कक्षात आपला अर्ज/ निवेदन सादर केल्यानंतर त्यांना पोचपावती देण्यात येईल. क्षेत्रीय, जिल्हा स्तरावर कार्यवाही अपेक्षित असलेले अर्ज विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली संबंधित अधिकाऱ्यांकडे त्वरित पाठविण्यात येतील. ज्या अर्जांवर शासनस्तरावर कारवाई अपेक्षित आहे, जे विषय धोरणात्मक बाबींशी संबंधित आहेत, अशा महत्त्वाच्या प्रकरणांशी संबंधित असलेले अर्ज किंवा निवेदने मुख्यमंत्री सचिवालयातील प्रधान सचिवांकडे सादर करण्यात येतील. क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेले अर्ज, त्यावर झालेली कार्यवाही, प्रलंबित अर्ज याची माहिती मुख्यमंत्री सचिवालय कक्षात दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी सादर करण्यात येते. इतकेच कायतर मुख्यमंत्रीही याचा दरमहा आढावा घेतात.

## पहिले लपवून दुसरे लग्न करून विवाहितेचा छळ

### पतीसह पाच जणांवर गुन्हा नोंद

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी -**

पूर्वीचे लग्न केल्याचे लपवून दुसरे लग्न केले. विवाहितेचा छळ करून घर बांधकाम करण्यासाठी पाच लाखाची मागणी करून मारहाण केली. याप्रकरणी पतीसह पाच जणांवर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २१ नोव्हेंबर २०२१ ते १२ मे २०२४ दरम्यान विवाहितेच्या सासरी घडली.

पोर्णिमा अभिषेक शिंदे (वय २० रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अभिषेक शिंदे, सासू शारदा, नणंद सिध्दी जाधव व चुलत दीर रोहन पवार (सर्व रा. सोलापूर) यांच्यावर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. फिर्यादी ही सासरी नांदत होत्या. नांदत असताना आरोपींनी विवाहितेला मी पूर्वीपासून विवाहित आहे. दोन मुलं आहेत. मी फक्त तुला मोलकरीण म्हणून आणलो आहे. विवाहितेस छळ करून बाळे येथील घराचे बांधकाम करण्यासाठी पाच लाख रुपये घेवून ये तरच तुला नांदवतो. असे म्हणून छळ केला असल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४९

**देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला ।**
**का शेखीं उपेगा गेला । पांडवांसी ॥**

मोहग्रस्त अर्जुनाला मार्गदर्शन करुन, मोहातुन बोहर काढण्याचा व त्याला युध्दासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न श्रीकृष्ण भगवान करीत आहेत. माऊली म्हणतात की, या अर्जुनाचे भाग्य फारच थोर असले पाहिजे. कारण जगन्नाथ स्वत: याच्या रथाचे सारथ्य करीत आहेत. अर्जुनाला मागे सारुन आपण स्वत: रथ हाकण्याच्या निमित्ताने पुढे झाले आहेत. अर्जुनाला ते कर्मयोग, संन्यासयोग, कर्मयोगी, स्थितप्रज्ञ असे अनेक विषय उत्कृष्टप्रकारे समजावून सांगत आहेत. कित्येक वर्ष तपश्चर्या करणा-यास या परमात्म्याचे सुख व सहवास मिळाला नाही: पण या अर्जुनाला हे सर्व प्राप्त झाले आहे. सहवासात येणा-यांना तसेच भक्ति करणा-यांना तर भगवंतानी एवढा ज्ञान ठेवा सांगीतलाच नाही, पण साक्षात आई वडीलांनाही सांगीतला नाही. हे सांगतांना माऊली म्हणतात,



**देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला ।**
**का शेखीं उपेगा गेला । पांडवांसी ॥**

अर्थात, हातापायात बेडया असलेल्या तसेच कारागृहात असलेल्या देवकी मातेने उदरात सांभाळले त्या मातेलाही कांही सांगीतले नाही किंवा तिच्या उपयोगाला भगवंत आले नाहीत. तसेच भोळेपणाने, अत्यंत लाडाने आपले सर्वस्व अर्पन करुन यशोदा मातेने लहानाचे मोठे केले, त्या मातेच्याही उपयोगाला न येता, या पांडवांच्या म्हणजे अर्जुनाच्या उपयोगाला हा भगंवत आल्याने माऊलींना अत्यंत कौतुकाचे वाटते. श्रीकृष्ण अर्जुनाच्या उपयोगाला आल्यामुळे अर्जुनाच्या भाग्य अपार असले पाहिजे असे माऊली म्हणतात. श्रीकृष्णाची प्राप्ती करुन घेण्यासाठी अर्जुनाला प्रदीर्घ तपस्या करावी लागली नाही किंवा योग्य वेळ येण्याची प्रतिक्षा करुन विनंती करण्याचे श्रम करावे लागले नाहीत. अर्थात, अर्जुनाला हा परमात्मा प्राप्त झाला असुन तो अर्जुनाच्या अंकीत झाला आहे. अर्जुन आपला अधिकार भगवंतावर गाजवित आहे. अर्जुनाला भगवंत अधिकार गाजवूही देत आहेत. माऊली म्हणतात की, सख्य, भक्ती असावी ती अर्जुनासारखी. अर्जुनाच्या प्रेमापोटी भगवंत सगुणरुप साकार होऊन त्याचे सारथ्य करीत आहेत. साक्षात भगवंत सारथ्य करीत असल्याने या युध्दभूमीत अर्जुनाचा रथ कोठेही अडखळणार नाही. आपल्या जीवनाचे सारथ्य करण्यासाठी किंवा संसाराचा गाडा सुखाने हाकण्यासाठी भगवंत मिळणे तर कठीण आहे, पण चांगला संत महात्मा मिळाला तरी भरपुर होईल. शोधूनही संत महात्मा सापडला नाही तर संत महात्म्यांनी लिहलेले ग्रंथ तरी आहेत. त्या ग्रंथांना गुरु मानुन रुचेल, पचेल तेवढे त्यातून घ्यावे. जे योग्य वाटते तेवढे जरी त्यातुन घेतले व आपल्या जीवनात उतरविण्याचा प्रयत्न केला तरी आपला या संसाररुपी युध्द भूमीतला रथ कोठेही अडखळणार नाही. ही लेखमाला आपल्या जीवनाचे चांगल्याप्रकारे सारथ्य करु शकते. त्यासाठी पाहिजे तो आपला विश्वास आणि आपले वाचनातील सातत्य. श्रीकृष्णांचे जसे अर्जुनावर प्रेम आहे, तसे आपल्यावरही कोणाचे नि:स्वार्थ प्रेम असेल तर आपल्यासारखा भाग्यवंत तो कोण असणार. जर असा नि:स्वार्थ प्रेम व मार्गदर्शन करणारा कोणी नसेल तर त्याचा शोध आवश्य घ्यावा. संत महात्म्याचे विचार आचरणात आणले तरी न कळत नि:स्वार्थ प्रेमाची आपली अपेक्षा ब-याच अंशी पुर्ण होईल असे वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार**
**दि. ७ मार्च २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**शु. अष्टमी (०९.१८)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - मृग (२३.३१)**
**योग - प्रीति (१८.१३)**
**करण - बालव (२०.४३)**

**दिनविशेष - चांगला दिवस**
**दुर्गाष्टमी, परमहंस**
**श्री योगानंद पुण्यदिन**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**वृषभ** : निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे. जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते.

**मिथुन** : आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल.

**कर्क** : केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**सिंह** : महत्वपूर्ण व्यक्तिंचा संपर्क येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या** : आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ** : जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक** : आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु** : आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर** : मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन** : उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# अंगणवाडी सेविकांना प्रमाणपत्र बंधनकारक

### शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी
### डायटकडून पाच टप्यात प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता दहावी उत्तीर्ण अंगणवाडी सेविकांना एक वर्षाचा तर बारावी उत्तीर्ण सेविकांना सहा महिन्यांचा बालशिक्षण प्रमाणपत्र प्रशिक्षण बंधनकारक करण्यात आला आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) कडून अंगणवाडी सेविकांना पाच टप्यात प्रशिक्षण दिले जात आहे.

अंगणवाडी सेविकांची क्षमता व वृध्दी वाढविणे हा प्रशिक्षणामागील उद्देश्य आहे. हा प्रशिक्षण ऑनलाईन व ऑफलाईन पुस्तिका दोन्ही पध्दतीने सुरू असून सर्व अंगणवाडी सेविकांना कार्यरत करण्याचे काम सुरु आहे . जिल्ह्यात दोन हजार सहाशे अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू असून त्यांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी अंगणवाडी पर्यवेक्षकांवर देण्यात आली आहे. अंगणवाडी सेविकांचे प्रात्यक्षिक व स्वाध्यायद्वारे प्रशिक्षण सुरू असून पर्यवेक्षक पाठपुरावा करीत आहेत. सध्या बारावी उत्तीर्ण दोन हजार सहाशे सेविकांचे प्रशिक्षण सुरू असून मे २०२५ पासून दहावी उत्तीर्ण सेविकांचे प्रशिक्षण सुरू होणार आहे. मे महिन्यात जिल्हा व तालुकास्तरीय प्रशिक्षण पार पडणार आहे . त्यासाठी अभ्यासासंबंधी व्हिडिओ असलेले संकेतस्थळ देऊन त्यावरील व्हिडिओ पाहावे लागणार आहेत. याशिवाय त्यांना पुस्तिका देखील दिली जाणार आहे. दोन्हीकडील पाहून, वाचून सेविकांना डायटकडून अंगणवाडी सेविकांच्या प्रशिक्षणाचे सुरू आहे. अभ्यासक्रमाचे व्हिडिओ व पुस्तिका वाचून त्यांना उत्तरे लिहावी लागणार आहे. अंगणवाडी सेविकांच्या प्रगतीवर पर्यवेक्षिकांचे नजर व मार्गदर्शनही करणार आहे. बालशिक्षणाची संपूर्ण माहिती झाल्याचे त्यांच्या प्रगतीवरून समजल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे . दिलेल्या पुस्तिकेत उत्तरे लिहावी लागणार आहेत. त्यात उत्तीर्ण होणे फार कठीण नसणार आहे, पण नवीन धोरणानुसार अंगणवाड्यां मधील चिमुकल्यांना कशा पद्धतीने हाताळायचे आहे हे प्रशिक्षणात शिकवले जाणार आहे.

> नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करून त्यांना बालशिक्षण प्रमाणपत्र दिले जाणार आहे. जेणेकरून आगामी शैक्षणिक वर्षातील बदलानुसार त्या सर्वांना अध्यापन करता येईल. डाएटकडून जिल्ह्यातील २६०० अंगणवाडी सेविकांचे पाच टप्यात प्रशिक्षण सुरू आहे.
>
> **- जितेंद्र साळुंखे,**
> **प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर**

# जीवनगौरव साधना पुरस्काराने दामोदर पानगावकर सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ मार्च-**

ऑडिटर कौन्सिल अॅन्ड वेल्फेअर असोशिएशन, महाराष्ट्र राज्य. प्रमाणित लेखापरीक्षक यांचे राज्यस्तरीय अधिवेशन नाशिक येथील तपोवन पंचवटी, येथे झाले. या अधिवेशनात सोलापुरातील ज्येष्ठ लेखापरीक्षक दामोदर पानगावकर यांचा राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते आणि सहकार आयुक्त श्रीयुत तावरे तसेच माजी अप्पर आयुक्त एस.बी. पाटील धर्मादाय उपायुक्त श्रीयुत योगी यांच्या प्रमुख उपस्थितीत जीवन गौरव सहकार साधना पुरस्कार देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सन्मानचिन्ह, शाल, आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पानगावकर यांनी ऑडिट क्षेत्रातील दिलेले योगदान, सहकार कायद्याच्या अभ्यास, तसेच परखडपणे केलेले संस्थांचे ऑडिट याबद्दल त्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करून त्यांचा जीवन गौरव सहकार साधना पुरस्कार देऊन दामोदर पानगावकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पानगावकर हे सोलापूर जिल्हा सर्टिफाईड ऑडिटर्स असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांनी या अगोदर अखिल महाराष्ट्र सर्टिफाईड ऑडिटर्स फेडरेशनच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. परिषदेला ३२ जिल्ह्यामधून बहुसंख्य लेखापरीक्षक उपस्थित होते.



# कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावा

### कास्ट्राईब कर्मचारी महासंघ राज्य कार्याध्यक्ष गणेश मडावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ मार्च-**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, जिल्हा शाखा सोलापूरच्या वतीने कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी राज्य कार्याध्यक्ष गणेश मडावी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर खातेनिहाय शाखांचा आढावा घेण्यासाठी दौरा आयोजित करण्यात आला होता.यावेळी श्री. मडावी यांनी आपापल्या खाते प्रमुखांकडे बैठक लावून कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत सूचना केल्या. शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी बैठक आयोजन करण्याबाबतचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कुलगुरू, सोलापूर विद्यापीठ यांना बैठक घेण्याबाबतचे निवेदन देण्यात आले. यावेळी राज्य उपाध्यक्ष गिरीश जाधव, कास्ट्राईब कर्मचारी महासंघ जिल्हा शाखा सोलापूरचे जिल्हाध्यक्ष मनीष सुरवसे, जिल्हा सचिव अरविंद जेटीथोर, कोषाध्यक्ष विजयकुमार लोंढे, संघटक लक्ष्मण गायकवाड, प्रशांत सुरे, विजयकुमार इंजेवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवदासमय यांचे विचार समाजाला प्रेरणादायी : चोळ्ळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च,**

शिवदासमय यांचे विचार समाजाला प्रेरणादायी आहेत हे विचार व शिवदासमय जयंती समाजबांधवांनी घरोघरी पोहोचवावेत असे प्रतिपादन शिवशिंपी समाजाचे विश्वस्त शिवशंकर उर्फ राजु चोळ्ळे यांनी केले.

शिवदासमय जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. श्री मद्विरशैव शिव सांप्रदायक शिवशिंपी समाजाचे आद्यगुरु श्री शिवदासमय यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवदासमय जयंती निमित्त शिवशिंपी समाज महिला मंडळाच्या वतीने सलग पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रम,भजन,रुद्रपुजा तसेच शिवदासमय यांच्या जीवन चरित्रावर पुराण कथन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.जयंती दिनी पाळणा व प्रसाद कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास शिवशिंपी समाज विश्वस्त दयानंद विजापूरे, शिवशंकर उर्फ राजु चोळ्ळे, पशुपती माशाळ,सिद्रामप्पा नरोणे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज अध्यक्ष शिवानंद नसली होते. प्रारंभी महिला मंडळ अध्यक्षा पौर्णिमा तोटद यांनी प्रास्ताविकात शिवदासमय यांच्या समाजोपयोगी कार्याची माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सेक्रेटरी कविता तोटद यांनी केले.



कार्यक्रमास शिवशिंपी समाजाचे पदाधिकारी प्रकाश अतनुर,मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स चे विश्वनाथ आमाणे, चेतन विजापूरे, सदानंद म्हेत्रे,पतसंस्था चेअरमन जगदीश तोटद, महिला मंडळ उपाध्यक्षा गिरिजा कालदीप, कोषाध्यक्ष सुनीता लोणी, सह सेक्रेटरी सुप्रिया नसली पुष्पा छपरे, गीता विजापूरे, लता नरोणे, मनीषा चोळ्ळे, जयश्री नसली, विजयालक्ष्मी लंगोटे, श्रीदेवी डंबळ, नमिता चोळ्ळे, निर्मला कवठेकर, श्रीदेवी बुराणपुरे व महिला मंडळ कार्यकारिणी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पाटील पॉलिटेक्निकमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

### निबंध स्पर्धेत अंकिता सिरसाल प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

विजापूर रोडवरील सैफुल जवळील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील पॉलिटेक्निक मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय भौतिक शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन यांनी रमण इफेक्टचा शोध लावल्याच्या स्मरणार्थ हा दिन साजरा करण्यात आला. या विज्ञान दिनाचे औचित्य साधून पॉलिटेक्निक महाविद्यालयातर्फे विज्ञानावर आधारित पुढील विषयांवर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेमध्ये ५० विद्यार्थी स्पर्धकांनी आपले निबंध सादर केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते व प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही. आर. आवटे हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले यांनी निबंध पाहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले, याप्रसंगी ह्युमॅनिटी अँड सायन्स विभागाचे सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे कामकाज ह्युमॅनिटी अँड सायन्स विभागाच्या प्राध्यापिका एस. आर. मिठ्ठा मॅडम यांनी पाहिले.



निबंध स्पर्धेचे हे विषय होते : समाज कल्याणासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान, शाश्वत विकास : विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका, माझे आवडते शास्त्रज्ञ आणि त्यांचे विज्ञानातील योगदान, कृत्रिम बुद्धिमत्ता : फायदे आणि आव्हाने. अंतराळ संशोधनाचे भविष्य.

**प्रथम तीन विजेते असे :** सिरसाल अंकिता रामू (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), चौधरी आयुष राजेश (प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग),बशेट्टी प्रगती विलास (प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग).

# मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून फी वसुली करणाऱ्या महाविद्यालयावर कारवाई करावी

### बहुजन विकास आघाडीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून फी वसुली करणाऱ्या महाविद्यालयावर कारवाई करावी. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्था प्रमुखांना समक्ष बोलावून मौखिक व लेखी समज देण्यात यावी, असे आशयाचे निवेदन बहुजन विकास आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रवीण सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

मजरेवाडी येथील पी.एस.पी.एम.पी. महिला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल या महाविद्यालयाचे प्राचार्य व प्रशासनाकडून अनुसचित जाती प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शासन देय असलेली फी ही महाविद्यालयानी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये न भरल्यास दंड स्वरूपात अतिरिक्त रक्कम वसुल करण्याचे मेसेजे संबंधित विद्यार्थ्यांना पाठविले जात आहेत. याबाबत संबंधित विभागाने पारित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकानुसार अनुसूचित जातीसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क देण्याच्या योजनेबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर, २००३ अन्वये ठरविण्यात आली आहे. शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदान करणे या योजनेखाली वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ९० टक्के अनुदानातून विद्यार्थ्यांच्या फी ची प्रतिपूर्ती करावी. ज्या विना अनुदानित महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची सामाजिक न्याय विभागाकडून १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येत नाही, त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून शासनामार्फत प्रतिपूर्ती करण्यात येणाऱ्या रक्कमेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांकडून फी वसूल करु नये.असे स्पष्ट निर्देश असताना संबंधित विद्यार्थ्यांकडून फी वसुली करीत आहेत, तगादा लावला जात आहे.

# ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे हिताचे निर्णय शासन कधी घेणार


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

राज्यातील ११११५० सार्वजनिक ग्रंथालयात २०३२१ कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत.दिवसेंदिवस महागाई वाढत चालली आहे अशा परिस्थितीत कुटुंबाची उपजीविका भागविण्यासाठी कर्मचारी यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते आहे अशा परिस्थितीतही वाचन संस्कृती जोपासण्यासाठी कर्मचारी आत्मयतीने काम करीत आहे.शासन फक्त आश्वासन देवून कर्मचारी यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे. कर्मचारी यांची अवस्था आई जेवू देईना आणि बाप भीक मागू देईना अशी अवस्था कर्मचारी यांची असल्याची चिंता महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी व्यक्त केली.

राज्यातील अमरावती जिल्ह्यातील जयप्रकाश अग्रवाल सार्वजनिक वाचनालयातील नेरपिंगाळाई ता.मोर्शी जि.अमरावती या वाचनालयात लिपिक पदावर कार्यरत असलेला कर्मचारी यांनी आर्थिक परिस्थितीला कंटाळून वाचनालयाच्या बाथरूममध्ये आत्महत्या करुन जिवन संपवले. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी याकामी तातडीने ग्रंथालय कर्मचारी यांच्या हितासाठी शासन अध्यादेश काढून कर्मचारी यांना दिलासा द्यावा याबाबत आम्ही आमदार सत्यजित तांबे, सुधीर दादा गाडगीळ,.अभिमन्यू पवार यांना लेखी निवेदन देऊन चर्चा करून तातडीने बैठक घेण्यासाठी विनंती केली होती त्यांनुसार उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी २९ ऑगस्ट २०२४ व ११ फेब्रुवारी २०२५ रोजी मंत्रालयात बैठक घेतली व एक महिन्याच्या आत कॅबिनेट बैठकीत सर्व विषय ठेवून मंजुरी घेतो असे आश्वासित केले होते माजी मंत्रीसुधीरभाऊ मुनगंटीवार ग्रंथालय कर्मचारी यांच्या प्रलंबित मागणी संदर्भात त्यांच्या सोबत चर्चा केली आणि त्यांनी तातडीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांना पत्र दिले आहे.जर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी तेव्हाच निर्णय घेतले असते तर कर्मचारी यांनी आत्महत्या केली नसती जर चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात ग्रंथालय कर्मचारी यांच्या हितासाठी निर्णय न झाल्यास अनेक कर्मचारी यांना आत्मदहनच करण्याशिवाय पर्याय नाही असे सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७१ ब) विशेषज्ञ

श्री गुरुजींची कलकत्ता येथे काही प्रतिष्ठीतां सोबत बैठक होती. तिथल्या एका प्रौढ डॉक्टरचा व गुरुजींचा संवाद.

डॉक्टर:- आपल्या रा.स्व. संघाचा हिंदू राष्ट्रवाद आम्हाला मान्य आहे. पण एवढे मोठे ध्येय साध्य करण्यासाठी दक्ष-आराम, दंड, खड्ग, शूल, कबड्डी अशा क्षुद्र कार्यक्रमांनी, शाखा चालवण्याने ध्येय साध्य होईल का ?

गुरुजी:- (हसत हसत) डॉक्टर साहेब वर्तमानात ऍलोपॅथीचा मास्टर ड्रग कोणता आहे.

डॉक्टर:- पेनिसिलिन

गुरुजी:- पेनिसिलिन कशापासून बनतं.

डॉक्टर:- सर्वच लोक जाणतात ज्या सडलेल्या अन्नाच्या दुर्गंधीलाही आम्ही लोक पसंत करत नाही; त्यापासून पेनिसिलिन बनवतात.

गुरुजी:- याचा अर्थ हा झाला की योग्य लोकांच्या हातात गेलेल्या खराबीचा पण सदुपयोग होऊ शकतो.

डॉक्टर:- हो, बरोबर आहे पण तरीसुद्धा

गुरुजी:- तरीसुद्धा शंका नको आम्ही तेच आहोत; here we are the experts in the science of organisation. संघटन विशेषज्ञ

- क्रमशः

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### महिला दिनानिमित्त वैरागमध्ये ३०१ जणांनी केले रक्तदान

**वैराग, दि. ६ मार्च-**

जागतिक महिला दिना निमित्त पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली वैराग पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी ज्योती तीर्थ, पोलीस निरीक्षक कुंदन गावडे , पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, एपीआय जगदाळे, भगवंत ब्लड बँकचे चेअरमन शशिकांत जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. या रक्तदान शिबीरामध्ये ३०१ जणांनी रक्तदान केले. यावेळी महिला पोलीस पाटील, महिला दक्षता कमिटीतील सदस्य तसेच यमाई तांडा गावातील बंजारा समाजातील महिला यांची उपस्थीती होती. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी वैराग पोलीस स्टेशनचा स्टाफ, पोलीस पाटील, होमगार्ड, पत्रकार तसेच वैराग पोलीस ठाणे हद्दीतील संपूर्ण गावातील ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य तसेच पुरुष व महिला यांनी परिश्रम घेतले.




### बेताल वक्तव्य करणाऱ्या अबू आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**करमाळा दि. ६ मार्च-**

औरंगजेबाबाबत चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. त्यांनी अनेक मंदिरे बांधली. बनारसमध्ये पंडिताच्या मुली सोबत लग्न करू इच्छिणाऱ्या आपल्या सरदाराला हत्तीच्या पायी दिले. त्यामुळे पंडितांनी तिथे त्यांच्यासाठी मशीद बनवली. औरंगजेबाला मी क्रूर शासक मानत नाही. त्यावेळी हिंदू मुस्लिम लढाई नव्हती. ती राज्य निर्माण करण्यासाठी लढाई होती. औरंगजेबाच्या काळात भारत सधन होता, असे वादग्रस्त वक्तव्य समाजवादी पार्टीचे नेते अबू आझमी यांनी केले. अशा प्रकारचे वादग्रस्त करून महाराष्ट्रात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या अबू आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी करमाळा तालुक्याचे भाजप नेते तथा सोलापूर जिल्हा ग्रामीणचे जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन करमाळा पोलिस स्टेशनला देण्यात आले. यावेळी भाजपचे माजी जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, बळीराजा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आण्णा सुपनर, हिंदू जागरण चे जिल्हा संयोजक संग्राम परदेशी, भाजपा जिल्हा सचिव व शासन नियुक्त सदस्य पिक विमा तक्रार निवारण समिती लक्ष्मण केकान, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश क्षिरसागर, शहर सरचिटणीस जितेश कटारिया, उपाध्यक्ष सचिन चव्हाण उपस्थित होते.

### प्रा. डॉ. राहुल पालके यांची सेट, नेट परीक्षाविषयी मुलाखत

**बार्शी, दि. ६ मार्च-**

१६ वेळा नेट/सेट ही परीक्षा उत्तीर्ण होणारे श्री शिवाजी महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. राहुल पालके यांची आकाशवाणी केंद्र, सोलापूर येथे सेट व नेट या विषयावर मार्गदर्शनपर मुलाखत संपन्न झाली. यासाठी आकाशवाणी केंद्राकडून प्रश्नावली तयार करण्यात आलेली होती. एकंदरीत १३ ते १४ प्रश्न सेट व नेट या परीक्षावरती विचारण्यात आले. पालके यांनी या प्रश्नांची समाधानकारकपणे उत्तरे देऊन विद्यार्थ्यांना सेट व नेट या परीक्षांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास दिला. सामान्य परिस्थितीतून असामान्य जिद्द ठेवत सामान्य कुटुंबातील मुलगा एक यशस्वी प्राध्यापक होतो हे त्यांनी मुलाखतीप्रसंगी सांगितले. श्री सुजित बनसोडे व श्रीमती दिव्या जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मुलाखत झाली. यावेळी प्राध्यापक पालके यांचे मित्र आनंद लोंढे उपस्थित होते. पालके यांच्या या यशाबद्दल शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, खजिनदार बापू शितोळे, प्राचार्य डॉ. ए.बी.शेख व डॉ. समाधान पवार यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.





### स्वाभिमानी युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**नातेपुते, दि. ६ मार्च-**

नातेपुते येथील स्वाभिमानी युवा प्रतिष्ठानच्या अनेक कार्यकर्त्यांनी आज माळशिरस तालुक्याचे माजी आमदार राम सातपुते यांच्या उपस्थितीत ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष भानुदास राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश करण्यात आला. यावेळी जिल्हा कार्यकारण सदस्य राहुल पदमन, जिल्हा उपाध्यक्ष भैय्या चांगण, जिल्हा चिटणीस शशी कल्याणी, नगरसेवक अमित चांगण आदी उपस्थित होते. यावेळी युवा नेते शंभू वाघमोडे, प्रशांत कुचेकर, अनिल काळे, किरण खिलारे, आनंद सोरटे, गणेश मोरे, महेश मांजरेकर, ऐकाळ, दादासाहेब भांड, माऊली उराडे आदींसह प्रवेश केला.

# ऐन ऊन्हाळ्यात शाळांची वीज गायब

## वीज नसल्याने ई-लर्निंग बंद

## पाणीटंचाईमुळे पोषण आहारावर परीणाम

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

मार्च महिन्यात वर्षअखेर असल्याने व शाळांनी वीजबिल भरले नसल्याने वीजमंडळाकडून ऐन ऊन्हाळ्यात वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे ई-लर्निंगसह इतर शिक्षणावर परीणाम होत आहे. अनेक शाळांमध्ये वीज नसल्याने विद्यार्थ्यांना पाणीटंचाई जाणवत आहे. शिवाय शालेय पोषण आहारासाठी पाणी शोधण्याची वेळ मुख्याध्यापकांवर आली आहे. त्यामुळे शासनाने वीज बिल भरून वीजपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी मुख्याध्यापकांमधून होत आहे.

ग्रामीण भागातील शाळांना वीजपुरवठा केल्यानंतर अनेक वेळा वीज बिलाची समस्या निर्माण झाली आहे. शासनाकडून समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटानुसार अनुदान देण्यात येते. शाळेच्या वीज बिलासह खडू, फळा , स्वच्छता व इतर कारणासाठी समग्र शिक्षा अभियानकडून सहा महिन्यांनी किंवा एका वर्षांनी अनुदान देण्यात येते. हे अनुदान नियमित व वेळेवर देण्यात येत नसल्याने शाळा विकासावर परीणाम होत आहे. काही वेळा मुख्याध्यापकांना स्वत:कडील पैसा खर्च करून वीजबिलासह इतर सोईसुविधा उपलब्ध करून द्याव्या लागत आहेत. अनेक वेळा काही शाळांचे बिल ग्रामपंचायतीमार्फत भरण्यात येते, मात्र ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्यामुळे ग्रामपंचायतीकडूनही वीज बिल भरण्यास टाळाटाळ करण्यात येते. त्यामुळे शासन व ग्रामपंचायत यांच्या वादामध्ये चिमुकल्यांच्या शाळांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. सध्या सर्वत्र उन्हाची तीव्रता वाढली असून ऊन्हाचा पारा ४० अंशापर्यंत पोहोचला आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे भीषण पाणीटंचाई जाणवत असताना शाळेमध्ये वीज नसल्याने चिमुकल्यांना पाण्यासाठी शाळेच्या बाहेर भटकावे लागत आहे. अनेक शाळांमध्ये पोषण आहारासाठी शाळेच्या परिसरात असणाऱ्या कूपनलिकेमधून पाणी उपसा करण्यात येतो. मात्र कूपनलिकेचाही वीजपुरवठा बंद असल्यामुळे अनेक ठिकाणी पोषण आहार बनवताना अडचणी निर्माण होत आहेत. विज्ञान व संगणकाच्या युगात ई-लर्निंगला विशेष महत्त्व आहे. मात्र या शाळांमध्ये ई लर्निंगसाठी वीजपुरवठाच नसल्यामुळे मुलांना ई लर्निंग शिकवायचे कसे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे . अनेक शाळांमध्ये ई-लर्निंग साठी लाखो रूपयांचे संगणक विकत घेण्यात आले आहेत. मात्र या संगणकांच्या ई लर्निंग साठी वीजजोडणी नसल्यामुळे सध्या ते धूळखात पडले आहेत.

### शासनाने वीजबिल भरून सहकार्य करावे

वीजबिल भरले नसल्याने वीज मंडळाकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. यामुळे ई-लर्निंगसह अनेक समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे शासनाने वीजबिल भरून सहकार्य करावे.

**- बाळासाहेब वाघ, राज्य समन्वयक, सर फाउंडेशन**

### शिक्षण अधिकाऱ्यांकडून प्रतिसाद नाही

जिल्ह्यातील शाळांना वीजबिल भरण्यासाठी नोटीस आली असून काही शाळांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. ई लर्निंगसह पाणीटंचाईसारख्या संवेदनशील विषयासंदर्भात प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे वारंवार संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

### शाळांना वीजबिल भरण्याची नोटीस

मार्च अखेर असल्याने वीज मंडळाकडून सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना वीजबिल भरण्यासाठी नोटीस देण्यात आली असून आठ दिवसात वीजबिल भरा, अन्यथा वीजपुरवठा बंद करण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे मुख्याध्यापकांची गोची झाली आहे.

### खर्च करून अनुदान मिळवा

समग्र शिक्षा अभियानांतर्गत नियमित व वेळेवर अनुदान मिळत नाही. त्यामुळे मुख्याध्यापकांना स्वतःच्या खिशातील पैसा खर्च करून अनुदान मिळवावे लागत आहे. शिक्षण क्षेत्रातील अनियमित पणाचा विद्यार्थ्यांच्या अध्यापन व अध्ययनावर विपरीत परीणाम होत आहे.

## अहिल्यादेवी होळकर म्हणजे दातृत्वाचा महासंगम : कल्याणशेट्टी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या प्रशासनामध्ये दिलेले योगदान जनमाणसांमध्ये आजही रुजलेले आहे त्यांनी सुरू केलेला सातबाराचा उतारा तसेच मैलाचा दगड बांधलेले घाट जनसेवेसाठी पाणपोया तसेच मंदिराचा केलेला जीर्णोद्धार यातून त्यांच्या कर्तुत्व व दातृत्वाचा महासंगम दिसून येतो त्यामुळे आजही त्यांचे कार्य जनतेच्या स्मरणात आहे असे गौरव उद्गार मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केली

अक्कलकोट येथील महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या सर्व शाखांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव व विद्यापीठाचा सहावा नामविस्तार दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते अध्यक्षस्थानी समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी होते व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्र सिंह लोखंडे पर्यवेक्षक सुरेश रुगे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर.लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले आभार प्रा. राजशेखर पवार यांनी मानले.

### विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित प्राध्यापकांचा सत्कार

मातोश्री गुरु बसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रमाधिकारी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा राजशेखर पवार कृतिशील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा डॉ बाळासाहेब पाटील नॅक मानांकन समन्वयक आदर्श शिक्षिका प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांचा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला.

## रविवारपासून बणजगोळ येथे ग्रामसिध्द समाधी योगाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

ऋषी संस्कृती विद्या केंद्र बेंगलोर ही संस्था १९७८ सालापासून सिध्द समाधी योगाचे काम जगभर करत आहे. या संस्थेचे ऋषी प्रभाकर गुरुजी हे संस्थापक असून त्या अध्यात्मिक, शैक्षणिक, पर्यावरण, बालशिक्षण व युवा निर्मिती या माध्यमातून प्राणायाम योग समाधी तसेच व्यक्तीचा सर्वांगिण विकास करणेसाठी ही संस्था काम करत आहे. बणजगोळ गावामध्ये रविवार दि. ९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता ७ दिवसांचे ग्रामसिध्द समाधी शिबीराचे आयोजन केले आहे.

शिबिरात बेंगलोरचे योग गुरु सुनिल दोडमणी योगधडे देणार आहे. दोडमणी हे मेकॅनिकल इंजिनिअर असून ते १९९८ पासून जगभरात त्यांचे योग होत आहेत. आश्रम निर्मिती सत्संग भवनची निर्मिती, कैदी लोकांसाठी विशेष शिबीर घेतलेले आहे. बणजगोळ गावात उपस्थित राहून ग्रामशिबीर घेणार आहेत. त्यामुळे गावकऱ्यांना संधी उपलब्ध झाली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव वरळे, संदीप शिंदे, रामभाऊ मातोळे, गड्डेप्पा अरुण मुळे, सचिन मचाले, मल्लीनाथ पाटील, श्रीशैल पाटील, विश्वास मातोळे, कट्टप्पा मणुरे, नागूबाई व्हसुरे, सुरेखा पाटील, शोभा कुंभार, रावसाहेब राठोड, साहेबराव पाटील, संगीता शिंदे, अंजली निकंबे, बाबूशा पाटील, शशीकांत पेडसंगे, दयानंद राघोजी, जनाबाई चव्हाण, सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका परिश्रम घेत आहे. प्रयत्न करत आहेत. सदर शिबीर ही दुर्मिळ संधी असून याचा परिसरातील गावऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बणजगोळ गावकऱ्यांमार्फत करण्यात आले आहे.



## बालचमुच्या कलाविष्काराने पोफळजकर मंत्रमुग्ध

### यशकल्याणी सेवाभावी संस्थेकडून शाळेला २२ हजारांची मदत

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. ६ मार्च-**

पोफळज (ता. करमाळा) येथील जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात बहारदार गीतांवर नृत्य सादर करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे गीत, भक्तीगीते, लोकगीते, समूहनृत्य, पारंपारिक गीतांसह छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंग व नाटिका सादर करून चिमुकल्यांनी रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. प्रेक्षकांनी रोख रकमेची बक्षीसे देऊन सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रथमतः मान्यवरांचे हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा.गणेश करे-पाटील होते. यावेळी संचालक रामचंद्र पवार, सरपंच मारूती पवार, बिभिषण गव्हाणे, सरपंच दत्तात्रय गव्हाणे, राहुल धुमाळ, स्नेहल पवार, अंबादास कांबळे, प्रा. विष्णू शिंदे, प्रा. बाळकृष्ण लावंड. पत्रकार गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, रमाकांत सुरवसे, जालिंदर पवार, अक्षय कुलकर्णी उपस्थित होते. मुख्याध्यापिका मुमताज पठाण यांनी स्वागत केले. शिक्षिका रेखा शिंदे- साळुंके, शुभांगी शिंदे-बोराटे, जहांगीर सय्यद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. याप्रसंगी मुंबई पोलिस दलात निवड झाल्याबद्दल सागर पवार तसेच कृषी अभियांत्रिकी विभागात विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल श्वेता शिंदे हिचा प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. श्रीकृष्ण भिसे व फौजमल पाखरे यांनी सूत्रसंचालन केले. निलेश जाधवर यांनी आभार मानले.

## देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ जेऊर बंद



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. ६ मार्च-**

जेऊर येथे मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आरोपीस फाशीची शिक्षा होण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जेऊर कडकडीत बंद पाळण्यात आला. यावेळी निवेदन स्वीकारताना तहसीलदार यांच्यावतीने प्रतिनिधी गाव कामगार तलाठी भाऊसाहेब सोन टक्के व पोलीस हवालदार ढेंबरे व शेख साहेब यांनी निवेदन स्वीकारले निवेदनास मागण्या खालील प्रमाणे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या मागे सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. जे नेतेमंडळी अशा क्रूर आरोपींना पाठीशी घालणाऱ्या त्या नेतेमंडळीवर व तो कोणत्याही पक्षाचा असला तरी कठोरात कठोर कारवाई व्हावी. भविष्यात देशातील कुठल्याही शहरात व खेडेगावात असे खंडणीसाठी व इतर कुठल्याही बाबतीत असे अमानवीय क्रूर हत्या होऊ नये. अशा अमानवी क्रूर हत्या करणाऱ्यांना नराधमांना फाशीची शिक्षा व्हावी. तसेच जेऊर ग्रामस्थांनी व व्यापारी वर्गानी जेऊर कडकडीत बंद ठेवून निषेध व्यक्त केला. यावेळी उपस्थित निलेश पाटील, नितीन खटके, बाळासाहेब कर्चे, अतुल निर्मळ, अजिनाथ माने, धन्यकुमार गारुडे, सोमनाथ जाधव, सागर कोठावळे, अजय सोळंकी, बाळासाहेब तोरमल, प्रशांत लोंढे, सागर बनकर, सचिन गारुडी, नाथा गोडसे, उमेश मोहिते, वैभव मोहिते, नाना बोराटे, पोपट मोहिते, अविनाश घाडगे, विठ्ठल जाधव, माऊली सुतार, सुहास तावरे, श्रीकांत गावडे, दत्तात्रेय नलवडे, हनुमंत मोहिते, हेमंत शिंदे उपस्थित होते.



## घारगावच्या सरपंचपदी होगले-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ६ मार्च**

घारगाव ग्रामपंचायतच्या नूतन सरपंचपदी आ. नारायण आबा पाटील गटाच्या कविता संतोष होगले-पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे.

घारगाव ग्रामपंचायत सरपंच पदासाठी ६ मार्च रोजी निवडणूक झाली या निवडणुकीत होगले-पाटील यांचा सरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी जगताप-पाटील गटाचे माजी उपसरपंच सतीश पवार तसेच आ.नारायण आबा पाटील गटाचे इतर सर्व सदस्य यामध्ये माजी सरपंच लोचना पाटील, माजी सरपंच आशा देशमुखे, माजी सरपंच अनिता भोसले, माजी सरपंच लक्ष्मी सरवदे, उपसरपंच दत्तात्रय मस्तुद उपस्थित होते. सरपंच निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी विनोद बनसोडे यांनी काम पाहिले. सोबत तलाठी हर्षल शेंगळे तसेच महसूल सहाय्यक सोमनाथ खराडे घारगावचे ग्राम विकास अधिकारी रवींद्र काळे यांनी काम पाहिले. यावेळी किरण पाटील, कल्याण होगले, रामलिंग देशमुखे उपस्थित होते. किरण पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन संजय सरवदे यांनी केले.

# शैक्षणिक सुविधांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही

## आ. अभिजीत पाटील यांचे प्रतिपादन

## माढ्यात शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ मार्च-**

शैक्षणिक क्षेत्रात माढा मतदार संघ नेहमीच अग्रेसर राहील. शैक्षणिक सुविधांसाठी निधीची कसलीही कमतरता भासू देणार नाही. माढा शहरातील शिक्षणाच्या प्रगतीसाठी उत्तम पायाभूत सुविधा असणे तितकेच गरजेचे आहे. जितके गुणवत्तापूर्ण शिक्षण. विद्यार्थ्यांना आधुनिक आणि सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध होईल, असे मत माढ्याचे आ. अभिजित पाटील यांनी व्यक्त केले. केंद्र शासनाच्या मॉडेल स्कूल योजनेतंर्गत माढ्यातील जि. प. प्राथमिक शाळा क्र. १ ची निवड झाली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळेचे नवीन इमारतीचे भूमिपूजन आमदार अभिजीत पाटलांच्या हस्ते करण्यात आले. गुणवत्तापूर्ण शिक्षण. विद्यार्थ्यांना आधुनिक आणि सक्षम आहेत, यावेळी आ. पाटील बोलत होते.



प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुदळ मारुन इमारतीचे भूमिपूजन पार पडले. यावेळी दादासाहेब साठे आनंदराव कानडे, राजेंद्र चवरे शहाजी साठे दिनेश जगदाळे, शंभू साठे उपस्थित होते. सोलापूर जिल्हातून ११ शाळांची निवड, माढ्यातील शाळेसाठी १ कोटी ९० लाख जिल्हातून मॉडेल स्कूल योजनेतून ११ शाळांची निवड करण्यात आली असून माढा तालुक्यातून जि.प.प्राथमिक शाळा क्र.१ या शाळेची आदर्श शाळा म्हणून निवड झाली आहे. या शाळेस डॉ. आबेडकर आदर्श शाळा जि. प. माढा नं. १ असे नाव देण्यात आले आहे. या शाळेच्या इमारतीमध्ये १० वर्ग खोल्या होणार आहे. याकरिता एक कोटी ९० लाखांच्या निधी प्राप्त झाला आहे. यावेळी आ. पाटील म्हणाले, शाळेची नवीन इमारत माढा शहराच्या वैभवात नक्कीच भर घालणारी असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणप्रेमाची ही प्रेरणा घेऊन, नव्या पिढीला उत्कृष्ट शिक्षण आणि उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी ही वास्तू मार्गदर्शक ठरेल.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आष्टी उपसा सिंचन योजनेचे रणजित शिंदे यांच्या हस्ते पाणीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ६ मार्च-**

मोडनिंब (ता.माढा) येथील व्यवहारे तळ्यामध्ये आष्टी उपसा सिंचन योजनेचे पाणी पोहोचल्यानंतर पाणीपूजन जिल्हा दुध संघाचे रणजितसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पाणीपूजन करून शेतकऱ्यांशी संवाद त्यांनी साधला. यावेळी समाज कल्याण समितीचे माजी सभापती शिवाजी कांबळे, कैलास तोडकरी, चांगदेव वरवडे, सरपंच प्रतिनिधी राहुल पाटील, सदाशिव पाटोळे, संतोष पाटील, किरण खडके, वाल्मिक जाडकर, दिपक व्यवहारे, अशोक काळे, निवृत्ती व्यवहारे, सिद्धेश्वर लोंढे, विकास जाडकर, महादेव सुर्वे, उद्धव सुर्वे, शशिकांत लोंढे, विलास सुर्वे, गोरख साळुंखे, डॉ. योगेश गिड्डे, जयंत पाटील उपस्थित होते.





## संक्षिप्त वृत्त...



### कर्मयोगी विद्यानिकेतनमध्ये पासवर्ड उपक्रम

**पंढरपूर, दि. ६ मार्च -**

कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूर येथे युनिक फीचर्स प्रकाशन संस्थेद्वारा विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी व विद्यार्थी मोबाईल पासून दूर राहावेत यासाठी विविध प्रकारच्या गोष्टी, कविता, सामाजिक माहिती, विविध भाषांची माहिती, थोर व्यक्तींच्या आयुष्यातील प्रसंग तसेच विशिष्ट प्रकारच्या लेखांचे वाचन करून विद्यार्थ्यांच्या मनातील विचार निबंधाद्वारे एकत्र करून त्यातून उत्कृष्ट अशा निबंध लेखनास बक्षीस म्हणून वाचनासाठी पुस्तकच भेट देण्यात आले. पुणे येथील युनिक फीचर्स प्रकाशन यांच्यामार्फत पासवर्ड उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबवला जातो. या उपक्रमाचे प्रमुख गायधनी आणि त्यांच्या सहकारी वृषाली जोगळेकर वसुधा बोरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून निबंध लेखनास प्रवृत्त केले. यावेळी प्राचार्या प्रियदर्शिनी सरदेसाई यांनी कर्मयोगी विद्यानिकेतन मधील विद्यार्थ्यांकडून सामाजिक उपक्रम व मोबाईलपासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांकडून करून घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती पासवर्ड प्रमुखांना दिली. कार्यक्रमासाठी पांडुरंग प्रतिष्ठान संस्थेचे विश्वस्त उमेश परिचारक उपस्थित होते.



### पंढरपुरात नूतन अधिकाऱ्यांचा सन्मान

**पंढरपूर, दि. ६ मार्च -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार, उद्योग व व्यापार विभाग यांच्यावतीने कोर्टी तालुका पंढरपूर येथे महाराष्ट्र राज्यसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये कपिल भारत घोडके यांची सरळसेवेतून आरोग्यसेवक या पदासाठी निवड झाली आहे. तसेच सागर दिलीप जगताप यांची तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) या पदासाठी झाली आहे.सुकेशनी औदुंबर गव्हाणे यांची पुणे ग्रामीण पोलीस हवालदार या पदासाठी निवड झालेली आहे. तसेच माणिकराव म्हस्के आरोग्य सहाय्यक, पंढरपूर तालुका आरोग्य पर्यवेक्षक यांची सेवानिवृत्ती निम्मित्त त्यांचा ही सत्कार करण्यात आला. यावेळी प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव केला. यावेळी डॉ.रमेश फाटे, संजय पवार, भारत घोडके, दिलीप जगताप, औदुंबर गव्हाणे, गुजर, निवृत्ती पाटील, पुणेकर, ओमकर कठले, कुसुम घोडके, वर्षाराणी गव्हाणे, सुवर्णा जगताप, रोहिणी जगताप, जयश्री म्हस्के, साक्षी म्हस्के, आदमिले नागरिक उपस्थित होते.



### धर्मपुरीत महालक्ष्मी सभामंडपाचे भूमिपूजन

**नातेपुते, दि. ६ मार्च -**

धर्मपुरी ता. माळशिरस येथे महालक्ष्मी सभामंडप भुमीपूजन सम ारंभ माळशिरस तालुक्याचे माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते संपन्न झाले. सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत राम सातपुते यांच्या आमदार निधीतून बांधण्यात येणाऱ्या महालक्ष्मी मंदिर सभामंडपाचे भूमीपूजन माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बाजीराव काटकर, शिवप्रसादचे चेअरमन शरद मोरे ड . बी .वाय .राऊत तालुका अध्यक्ष ॲड. शरद मदने महादेव कावळे महादेव पवार सरपंच सौ. निता नवनाथ झेंडे ग्रा. पं सदस्या मोहिनी सपकाळ बाळासो मसुगडे रामदास माने तानाजी कर्णे उपस्थित होते. यावेळी बोलताना रामभाऊ यांनी धर्मपूरी गाव विकासासाठी दत्तक घेत आहोत असे जाहीर केले तसेच केंद्रात आणि राज्यात भाजपा सरकार असल्याने निधी कमी पडू देणार नाही, असा विश्वास दाखवला. जयवंत सपकाळ यांनी सूत्रसंचालन केले. नवनाथ झेंडे यांनी आभार मानले.

### हिंदुजा कॉलेज डीम्ड युनिव्हर्सिटी

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

शिक्षण क्षेत्रातील कारकिर्दीला ७५ वर्षे पूर्ण केल्याचे औचित्य साधून हिंदुजा समूहाने आपली प्रमुख संस्था हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्समार्फत भारताच्या भविष्याला आकार देण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. कॉलेज आता एक डीम्ड युनिव्हर्सिटी बनण्याच्या दिशेने पुढे जात आहे. आज हा समूह हिंदुजा फाउंडेशनच्या माध्यमातून रोड टू स्कूल आणि रोड टू लाईवलीहूड या उपक्रमांमध्ये भारतभर ७,००,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिक्षण प्रदान करत आहे. या समारोहाचे प्रमुख अतिथी म्हणून भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि मान्यवर उपस्थित होते.

# पंढरपुरात १४७ किलो गांजा जप्त

- तालुका पोलिसांची कारवाई
- ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ मार्च-**

येथील अहिल्यादेवी चौकात दिनांक ५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे गुरसाळे रोडवर अहिल्यादेवी चौकात उपविभागीय पोलीस अधिकार्यांना मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे पंढरपूर तालुका पोलिसांकडून अहिल्यादेवी चौकात नाकाबंदी करण्यात आली होती.

सदर नाकाबंदी कारवाईच्या वेळेस गुरसाळे येथून अहिल्यादेवी चौकात एक संशयित महिंद्राकार जात असताना पंढरपूर तालुका पोलिसांनी अडवून संशयित वाहनाची तपासणी केली. सदर वाहनांमध्ये प्रदीप दत्तात्रय हिवरे (वय २० वर्षे रा. पुरांदावडे ता.माळशिरस, जि. सोलापूर) याच्याकडे विचारपूस





केली असता सदर कार मध्ये मधल्या सीटवर आणि पाठीमागच्या सीटवर एकूण तीन पोते गांजा आंबट उग्र वासाचा एकूण ७२ पाकिटामध्ये पॅक करण्यात आला होता.

सदर गांजा जागीच शासकीय पंचांच्या उपस्थित वजन केला असता एकूण १४७ किलो ग्रॅम वजनाचा गांजा व महिंद्राकार (क्रं. एम.एच.१२ एच व्ही ५६६६) असा एकूण ४० लाख रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केलेला आहे. या गाडीतील प्रदीप दत्तात्रय दत्तात्रय हिवरे (वय २९ वर्षे रा.पुरंदावडे माळशिरस ) त्याचे साथीदार गणेश हनुमंत पवार (रा.चिंचपुर तालुका माळशिरस) आणि प्रमोद उर्फ सोनू मुळीक (रा गुरसाळे, ता.माळशिरस) यांच्याविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे एनडीपीएस छ्ब्झड ॲक्ट कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पंढरपूर तालुका पोलिसांची ही अवैध गांजाविरुद्ध आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करण्यात आलेली असून एकूण १४७ किलो इतका गांजा व कार असा चाळीस लाखाचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक घोडके, पीएसआय विक्रमशेठ वडणे, पीएसआय भारत भोसले, पीएसआय घुंगुरकर, पीएसआय पिसाळ, सहाय्यक फौजदार विजू गायकवाड, सहायक फौजदार दत्तात्रय तोंडले, साह फौजदार शरद कदम, पोलीस हवालदार विनायक क्षीरसागर, पोलीस कॉन्स्टेबल अमोल गावडे, सुजित उबाळे, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल रामकृष्ण खेडकर, सह फौजदार शरद कदम, पोलीस हवालदार सूरज हेंबाडे, सचिन हेंबाडे, पोलीस हवालदार प्रसाद आवटी, पोलीस कॉन्स्टेबल समाधान माने, पोलीस कॉन्स्टेबल शहाजी मंडले यांच्या पथकाने केली आहे.

## मोडनिंब बस स्थानकात खड्डेच-खड्डे

**● पाण्याची डबकीच डबकी; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ६ मार्च-**

माढा तालुक्यातील मोडनिंब येथे बस स्टँडजवळून पाणीपुरवठा करणारी ग्रामपंचायतीची पाइपलाइन जाते. महिनाभरापासून पाइपलाइन फुटल्याने ग्राम पंचायतीचे पाणी नाहक वाया जाते.शिवाय ते पाणी बस स्थानकातील खड्ड्यात साचते. त्यामुळे पाण्याची डबकीच डबकी तयार झाली आहेत.

सर्व्हिस रोडवर पाण्यामुळे खड्डे पडून डबकी तयार झाली आहेत. खड्यांतूनच बस चालकाना वाट काढावी लागत आहे. त्यामुळे खड्यांचा अंदाज येत नाही. खड्ड्यांचा अंदाज न आल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. याबाबत मोडनिंब





बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक परिसरातील नागरिकांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना फोनद्वारे व समक्ष भेटून पाइपलाइन दुरूस्त करण्यासाठी विनंती करूनही संबंधित विभागाला अद्याप जाग आलेली नाही.डबक्यातील पाणी ग्रामपंचायतीने सदर पाइपलाइन त्वरित दुरूस्त करून प्रवाशांची व परिसरातील लोकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, अशी मागणी नागरिकातून होत आहे.

## आष्टी उपसा सिंचन योजनेतून मोडनिंबला मिळाले पाणी

**आ. अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ मार्च-**

माढा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. अभिजीत पाटील यांच्याकडे मोडनिंब शहरातील अनेक ग्रामस्थांनी मागणी केली असता गेली कित्येक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मोडनिंब शहराला पाणी प्रश्नाला अखेर न्याय मिळाला असल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे.

मोडनिंब शहर आणि परिसरातील नागरिकांची पाण्यासाठीची प्रतीक्षा अखेर संपली असून आमदार अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा आणि पाठपुरावा केल्यानंतर आष्टी उपसा सिंचन



योजनेतून डाव्या कालव्यातून पहिल्यांदाच पाणी सोडण्यात आले. या क्षणी माजी जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, आनंद पाटील, डॉ.श्री.सागर गिड्डे, बाळासाहेब पाटील, बालाजी पाटील, श्री. शिवाजीराजे सुर्वे, दिपक सुर्वे, गौतम ओहोळ, गोटु शिंदे, विजयसिंह गिड्डे, संतोष म ुटकुळे, संभाजी काळे, अख्तरभाई तांबोळी, आकाश कोळी, संभाजी लादे, नंदकुमार लादे, प्रकाश कोळी, संचालक संदीप खारे, सचिन वाघाटे यांनी जलपूजन करून आनंद व्यक्त करत आमदार पाटील यांचे आभार व्यक्त केले. मोडनिंबसाठी हा विकासाचा 0महत्त्वाचा टप्पा असून, भविष्यात आणखी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असे देखील आ. अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

## पिग्मी एजंटला लुटणाऱ्या आरोपीस अटक

**पोलिस निरीक्षक बी.एस.खणदाळे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ मार्च-**

सांगोल्यातील पिग्मी एजंटला लुटणाऱ्या मुख्य आरोपीस अटक करण्यात आली असल्याची माहिती सांगोला पोलिस निरीक्षक बी.एस.खणदाळे यांनी दिली.

यावाबत अधिक माहिती अशी, सांगोला पोलीस ठाणे हद्दीमध्ये दि.३ मार्च २०२५ रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास सांगोला शहरातुन सांगोला मिरज रस्त्यावरून माउली वॉशींग सेंटरच्या जवळुन राउत मळयाकडे जाणारे ओडयाचे अलीकडील बाजुला असणा-या कच्या रस्त्यावर फिर्यादी आबासो अशोक राऊत, वय-३४, धंदा-नोकरी, रा.राऊत मळा, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापुर हे सांगोला शहरातुन पिग्मीची रक्कम जमा करून त्यांचे राहते घरी जात असताना चार अनोळखी ईसमांनी त्यांना अडवुन त्यांचे डोळयात मिरची पुड टाकुन, दुखापत करून, त्यांचेकडील २५ हजार रोख रक्कम असलेली बॅग जबरीने चोरून नेल्याने त्यांचे फिर्यादी वरून सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.सदरचा गुन्हा हा जाणीवपुर्वक दुखापत करून, जबरी चोरीचा गंभीर स्वरूपाचा असल्याने तात्काळ वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली दोन पोलीस पथके नेमण्यात आली होती. पोलीस पथकातील यांनी गोपनीय बातमीदारमार्फत खात्रीशीर माहीती प्राप्त करून गुन्हयातील मुख्य आरोपी शेखर शशिकांत कारंडे, वय-२०, मुळ रा.मठाचीवाडी, फलटण, ता.फलटण, जि. सातारा, सध्या रा.सोनंद, ता.सांगोला जि.सोलापुर यास बुद्धी कौशल्याने व चातुर्याने फलटण शहर पोलीस ठाणे, ता.फलटण, जि.सातारा येथुन ताब्यात घेतले. त्यास गुन्हयाबाबत विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपीने





गुन्हयाची कबुली दिल्याने व आरोपीचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दि.६ मार्च २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस न्यायालामध्ये हजर केले असता मा.न्यायालयाने ५ दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्हयाचा अधिक तपास सपोनि.जगताप हे करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, सांगोला पोलिस निरीक्षक बी.एस.खणदाळे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. सचिन जगताप, पोउनि.व्ही.व्ही.माहुरकर, पोहवा.वजाळे, पोहेकॉ.पलुसकर, पोकॉ.पांढरे, पोकॉ. आवटे, पोकॉ.शिंदे, पोहवा.पठाण यांनी केली.

## अधिवेशन संपण्यापूर्वी छावणी चालकांची बिले अदा करावीत

**आ. समाधान अवताडेंची अधिवेशनात मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ६ मार्च-**

मंगळवेढा तालुक्यातील ६१ व सांगोला तालुक्यातील १४९ चारा छावण्या सन २०१९-२० मध्ये दुष्काळी परिस्थितीत जनावरे जगवण्यासाठी सुरू करण्यात आल्या होत्या मात्र त्या छावण्यांची अंतिम बिले अद्याप अदा केलेली नाहीत ती बिले हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर अदा करावीत.

पाच वर्षापासून हे छावणी चालक बिले मिळवण्यासाठी सरकारचे उंबरठे झिजवत आहेत. दुष्काळी परिस्थितीत या छावणी चालकांनी घरातील लग्न, दवाखाने, मुलांच्या शैक्षणिक अडचणीसुद्धा बाजूला ठेवून मुक्या जनावरांना जगवण्यासाठी छावण्या चालवल्या होत्या तरीही शासनाने अद्याप त्यांची उर्वरित राहिलेली बिले अदा केलेली नाहीत सध्या त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे इतक्या दिवस ही बिले का दिली नाहीत कोणत्या अधिकाऱ्यामुळे हे बिले प्रलंबित राहिली याची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी छावणीचालकांची बिले अदा करावीत अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित करीत केली आहे.



यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की ही बिले इतके दिवस प्रलंबित राहण्यामागे कारण काय? ही बिले प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार? बिलासाठी आत्महत्याचा विचार करणाऱ्या छावणी चालकांना तात्काळ बिले देऊन त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणार का? असा प्रश्न उपस्थित करून आमदार समाधान आवताडे यांनी छावणीचालकांचा प्रश्नांना वाचा फोडली.या प्रश्नांना उत्तर देताना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील म्हणाले की, ३३ कोटी ४४ लाख ९९ हजार एवढं छावणी चालकांचं अंतिम देयक राहिलेल आहे या देयकसंदर्भात असलेला सुधारित अहवाल राज्य शासनाच्या समि तीकडे आलेला आहे या संदर्भात आजच मुख्य सचिवाला निर्दे श देऊनं पाच ते सहा वर्षापासून प्रलंबित असणाऱ्या देयकाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावू असे आश्वासन मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिले त्यामुळे छावणीच्या लोकांचा बिलाचा प्रश्न येत्या काही दिवसात मार्गी लागणार असल्याचे दिसत आहे.

## माळशिरचा 'लखन', हडपसरचा 'पाखऱ्या' प्रथम

**देवाभाऊ केसरी बैलगाडा शर्यतीत लाखाचे पारितोषिक**

**४०० बैलगाड्यांचा सहभाग; माजी आमदार राम सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ६ मार्च-**

माळशिरसचे कार्यसम्राट आरोग्य दूत, माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ५ फेब्रुवारी रोजी श्री क्षेत्र महालक्ष्मी ग्रामविकास प्रतिष्ठान, पुरंदावडे-सदाशिवनगर यांच्यावतीने आयोजित देवाभाऊ केसरी भव्य बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांक माळशिरसचा लखन व हडपसरचा पाखऱ्या या बैलजोडीने पटकावला. त्यांनी प्रत्येकी लाखाचे पारितोषिक जिंकले.

माजी आमदार राम सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त देवा भाऊ केसरी बैलगाडा शर्यतीच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या शर्यतीमध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर या जिल्ह्यातून ४०० बैलगाड्यांनी सहभाग नोंदवला. अतिशय शिस्तबद्ध, नेत्रदीपक, शासकीय



नियमाप्रमाणे या स्पर्धा पार पडली. या बैलगाडा शर्यत स्पर्धेचे उद्घाटन सकाळी १० वाजता यांच्या मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

सकाळी दहा वाजल्यापासून प्रत्येक फेरीत सात बैलगाड्या धावत होत्या. सायंकाळी सहा वाजेपर्यंत उपांत्य फेरी पूर्ण झाली प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या मैदानात श्वास रोखून हा थरार अनुभवला अंतिम फेरीत ७ बैलगाड्या सहभागी झाल्या. इतर विजेते द्वितीय शौर्यजीत श्रीराम पालवे पुरंदावडे ता. माळशिरस नंदाचा व दहिगावचा पाखऱ्या, तृतीय स्वप्नील राजे दीपक शेठ साखरे मुरूम बारामती सुंदर व पेट नाका यांचा राजा, चतुर्थ शौर्यजित श्रीराम पालवे पुरंदावडे



व मोहील शेठ धुमाळ सुसगाव मुळशी बकासूर व नंद्या, पाचवा संजय टेळे माळशिरस, सहावा पिंटू शेठ मोडक वडकी पुणे कॉकटेल सुंदर व मानघरच वादळ, सातवा क्रमांक अजित शेठ जगताप, अमर शेठ जगताप कारुंडे व बाबुशेठ माने घरनिकीचा राजा व चिक्या या स्पर्धेसाठी माजी खासदार रणजीसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, संस्कृती सातपुते, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर माजी आमदार राम सातपुते संस्कृती सातपुते आप्पासाहेब देशमुख, बी वाय राऊत, बाळासाहेब सरगर, शरद मोरे, सुजय माने- पाटील, बाळासाहेब वावरे, बाजीराव काटकर, सोनु पराडे, करण पाटील, विजय देशमुख, श्रतुजा मोरे, संगिता मोटे, शरद मदने, संजय देशमुख उपस्थित होते. स्पर्धेचे समालोचक सुनील मोरे पेडगाव, विकास जगदाळे, प्रताप झांजुर्णे, पैलवान हनुमंत शेंडगे, संपत वाघमोडे झेंडा पंच राजेंद्र बापू धनावड कोरेगाव, पप्पू मंडले वेळापूर यांनी केले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बर्ड फ्लूचा संसर्ग रोखण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

ढोकी गावात आढळलेल्या बर्ड फ्लू (H5N1) संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तातडीची कारवाई हाती घेतली आहे. प्रभावित भागाच्या १० किमी त्रिज्यातील क्षेत्र सतर्क क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

संसर्ग रोखण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने जलद प्रतिसाद दल (RRT) कार्यरत केले असून, परसबागांमधील व कुक्कुटपालन व्यवसायिकांकडील पक्ष्यांचे नियमानुसार कलिंग (नष्ट करणे) सुरू आहे. भोपाळ प्रयोगशाळेच्या अहवालानुसार २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बर्ड फ्लूची पुष्टी झाली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी जलद प्रतिसाद दल, ग्रामपंचायत, वन विभाग व आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने ५ व ६ मार्च रोजी कोम्बिंग ऑपरेशन राबवले. या मोहिमेत २९५ कुक्कुट पक्ष्यांचे कलिंग करून त्यांची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

बर्ड फ्लू हा केवळ पक्ष्यांपुरता मर्यादित नसून तो इतर प्राणी व मानवांमध्येही पसरू शकतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्रभावित क्षेत्रातील पोल्ट्री व्यावसायिक आणि परसबागांतील कुक्कुटपालन करणाऱ्या नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. ज्या नागरिकांचे पक्षी नष्ट करण्यात आले आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### प्रा.डॉ. बाबा इंगळे लिखित पुस्तकाचे प्रकाशन

**धाराशिव, दि.६ मार्च -**

आंबेवाडी येथील प्रा.डॉ. बाबा इंगळे यांनी टेक्स्ट बूक ऑफ फंडामेंटल फिजिक्स हे पुस्तक लिहिले आहे. याचा प्रकाशन सोहोळा, हैदराबादच्या प्राचार्या डॉ. राज लक्ष्मी, शाहू कॉलेज लातूरच्या डॉ. अनुजा जाधव, प्राचार्य डॉ. मासुमदार व अन्य मान्यवर यांच्या हस्ते पार पडला. या पुस्तकाचा उपयोग बी.एस्सी मध्ये शिकणार्या, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या विद्यार्थ्यांना होणार आहे. डॉ.प्रा. बाबा इंगळे हे आझाद महाविद्यालय औसा यथे कार्यरत आहेत.

### छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची मागणी

**नळदुर्ग, दि.६ मार्च -**

ऐतिहासिक नळदुर्ग शहरात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारावे, अशी मागणी भाजपचे बबन चौधरी यांनी धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. या निवेदनात बबन चौधरी यांनी म्हटले आहे की, नळदुर्ग नगरपालिकेने शहरात अनेक राष्ट्र पुरुषांचे स्मारक, पुतळे उभारले आहेत. त्याप्रमाणे ज्यांनी आपल्या प्राणांची बलिदान देऊन देव, देश, धर्म जीवंत ठेवला असे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा नळदुर्ग शहरात उभारावे, अशी सर्व शिवशंभु प्रेमींची इच्छा आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाण म्हणुन हुतात्मा निलया स्वामी उद्यानातील रिकाम्या जागी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारावे, अशी मागणी या निवेदनात चौधरी यांनी केली आहे.



### हॅलोकडून सर्व क्षेत्रातील महिलांचा सत्कार

**जळकोट, दि.६ मार्च -**

मुला-मुलींनी आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करुन प्रगती केली पाहिजे, असे मत माजी सरपंच ज्योतिका चव्हाण यांनी केले. तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथे हॅलो मेडिकल फाउंडेशनच्यावतीने महिला दिनानिमित्त गावातील विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे, दोन मुलींवर कुटुंब नियोजन केलेल्या मातांचे व लग्न होऊन शिक्षण घेत असलेल्या मुलींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका समन्वयक नागिनी सुरवसे यांनी केले. यावेळी गावातील देविदास चव्हाण, हरीचंद्र चव्हाण, छमाबाई चव्हाण, काजल चव्हाण यांच्यासह कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राजश्री चव्हाण, शांताबाई चव्हाण, रिना चव्हाण, शांताबाई राठोड, सविता राठोड, इंदूबाई राठोड, रेवाप्पा राठोड, अरुण चव्हाण पर्यवेक्षक इंदूमती कबाडे, सुरेखा चव्हाण, महिला, विद्यार्थी उपस्थित होते.

### अवैध मद्यविक्री विरोधात पोलिसांची कारवाई

**धाराशिव, दि.६ मार्च -**

जिल्ह्यात अवैध मद्य विक्री विरोधात पोलिसांनी कठोर कारवाई करत दोन ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात गावठी व विदेशी मद्य जप्त केले. नळदुर्ग पोलीसांनी येडोळा तांडा (ता. तुळजापूर) येथे ३ मार्च रोजी रात्री ८:३० वाजता संजय सिंध्दु राठोड याच्या ताब्यातून अंदाजे २,८०० रुपये किंमतीची ३५ लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. संशयित आरोपी हा अवैध दारू विक्रीसाठी दारू जवळ बाळगत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. तर गौर (ता. कळंब) येथे ४ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.५० वाजता दत्ता मोतीराम माळी (वय ५९) याच्या घरासमोरील मोकळ्या जागेतून अंदाजे १,१२० रुपये किंमतीच्या १६ सिलबंद देशी-विदेशी मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.




# सिंदफळ येथे शेतीच्या वादातून शेतकऱ्याचा निर्घृण खून

### २४ तासातच दोन आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ मार्च -**

तालुक्यातील सिंदफळ येथे एका ५७ वर्षीय मुस्लीम शेतकऱ्याचा शेतीवादातून निर्घृण खून करण्यात आला आहे. मोटरसायकलच्या स्टीलच्या रॉडने मारहाण करत हा खून दि.५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास ही घटना घडल्याचे समजते. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात शेतकरी मयत सत्तार यासीम इनामदार (वय ५७) हे त्यांच्या मुलास आढळून आले आहे. सायंकाळी आपल्या शेतातील विहिरीतील मोटर सुरू करण्यासाठी गेले होते. मात्र बराच वेळ होऊनही ते परत न आल्याने त्यांचा मुलगा सोहेल इनामदार हा शेतात गेला असता, त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पाहून धक्काच बसला. त्यांच्या डोक्यात स्टीलच्या रॉडने जबर मारहाण झाल्याचे दिसून आले. तातडीने ही माहिती कुटुंबीयांना कळवण्यात आली आणि गंभीर अवस्थेत त्यांना उपजिल्हा रुग्णालयात येथे दाखल करण्यात आले.

मात्र, अधिक रक्तस्राव झाल्याने पुढील उपचारासाठी सोलापूर येथे पाठवण्यात आले परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनास्थळी पोलिसांना दारूच्या बाटल्या, सिगारेटचे पाकिटे, कुरकुरेचे पॉकेट आणि आंब्याच्या झाडाखाली गळून पडलेल्या कैऱ्या आढळून आल्या.



त्यामुळे या हत्येच्या मागे नेमके कोणते कारण आहे, घात की अपघात याचा तपास सुरू आहे.

सत्तार इनामदार यांच्या खुनाची बातमी गावात पसरतात गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले खुनातील आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे समजते. शेतीच्या वादातून हा खून झाल्याची चर्चा सिंदफळ येथील नागरिक करीत आहेत. या घटनेची माहिती मिळताच तुळजापूरचे उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. निलेश देशमुख, पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

वसीम गफुर इनामदार (वय ३५, रा. सिंदफळ) यांच्या फिर्यादीवरून गणेश घाटशिळे आणि त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध कलम १०३ (१), ३ (५) भारतीय न्यायसंहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, मुख्य आरोपी गणेश घाटशिळे हा यापूर्वीही अनेक गुन्ह्यांमध्ये अडकलेला असून, काही दिवसांपूर्वीच पोलिसांनी त्याच्याकडून गांजा जप्त केला होता. तो सध्या जामिनावर बाहेर होता. आता त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल झाल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणात पुढील तपास पोलीस निरीक्षक आण्णासोब मांजरे करीत असून, खुनाचे नेमके कारण काय हे तपासाअंती स्पष्ट होईल.

## उमरगा वासियांनी घेतला महाआरोग्य शिबिराचा लाभ



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ मार्च -**

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या वतीने शहरातील आदर्श महाविद्यालयाच्या मैदानावर महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भगवंत खुब्बा यांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर, धाराशिव जिल्ह्यातील रुग्णासाठी तपासणी पासून शस्त्रक्रिया, हृदयरोग, मधुमेह, स्त्रीरोग, नेत्र, कान, नाक आदीची मोफत तपासणी व औषधोपचार आणि दिव्यांग व्यक्तीला साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे प्रदीप राठी, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, शिबिराचे मुख्य संयोजक शरण पाटील, श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेखर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार, भाजपचे जिल्हा अध्यक्ष संताजी चालुक्य, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार गोविंद येरमे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एस.एल. हरिदास, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आंनत मुगळे, डॉ. उदयसिंह मोरे, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, आकाश राठी, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड, दिलीप भालेराव, ॲड.व्ही.एस. आळंगे, मल्लिनाथ दंडगे, डॉ. दामोदर पतंगे, डॉ. शरणप्पा मलंग, सतीश साळुंखे आदींची उपस्थिती होती. महाआरोग्य शिबिराचे मुख्य संयोजक शरण पाटील यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश हानेगावे यांनी केले तर प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी आभार मानले. या निमित्ताने शरण पाटील फौंडेशनच्या लोगोचें प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी रफिक तांबोळी, प्रा. शौकत पटेल, डॉ. राम सोलंकर, महेश माशाळकर, अनिल सगर, डॉ. अनुराधा मिरगणे, भीमाशंकर सारणे, योगेश राठोड आदींनी परिश्रम घेतले.

▶▶ धाराशिव जिल्हा पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर...

## संघाच्या अध्यक्षपदी देविदास पाठक, उपाध्यक्षपदी गोविंदसिंग राजपूत यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

धाराशिव जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी देविदास पाठक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. धाराशिव जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्याने नूतन कार्यकारिणी निवडीसंदर्भात चंद्रसेन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी नूतन कार्यकारिणी निवडीसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्हा पत्रकार संघाची बैठक गुरुवारी (दि.६) पार पडली.

यात पत्रकार संघाची पुढील २ वर्षांसाठी नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी देविदास पाठक, उपाध्यक्ष गोविंदसिंग राजपूत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पत्रकार संघाचे मार्गदर्शक म्हणून कमलाकर कुलकर्णी, दिलीप पाठक-नारीकर, सयाजी शेळके, संजय पाटोळे, बाळासाहेब मुंदडा, विशाल सोनटक्के राहतील.



यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**धाराशिव, दि.६ मार्च -**जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर तालुक्यातील चार लघुपाटबंधारे प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

▶▶ अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम...

## २५ अनाथ विद्यार्थ्यांचे अश्लेष मोरेंनी स्विकारले पालकत्व

### जि.प. हायस्कूल विद्यार्थ्यांची पदवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ मार्च -**

अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त उमरगा शहर व तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रम राबवून अतिशय वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील २५ अनाथ विद्यार्थ्यांचे पालकत्व आश्लेष मोरे यांनी गेल्या सहा वर्षांपासून स्वीकारले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याची जबाबदारी घेऊन विद्यार्थ्यांच्या आयुष्यात असेचा किरण निर्माण केला. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी भैया देवदूत म्हणून कार्य करत आहेत.

या आनंदाने आज शाळेतील विद्यार्थ्यांना अश्लेष मोरे मित्र मंडळाचे अध्यक्ष विशाल काणेकर भारत शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. सुभाष वाघमोडे, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, काँग्रेसचे अध्यक्ष अर्जुन बिराजदार, क्रीडा शिक्षक संजय कोथळीकर, सचिन बिद्री, शालेय व्यवस्थापन समितीच्या सुजाता मोरे यांच्या उपस्थितीत शालेय साहित्याचे वाटप करुन वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे, सुत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख सरिता उपासे तर आभार शिल्पा चंदनशिवे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, संजय रुपाजी, सदानंद कुंभार, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील, वनमाला वाले, सुनिता राठोड यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखाना कार्यस्थळावर सुरक्षा सप्ताह साजरा



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.६ मार्च -**

तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रा.लि, या कारखान्यात ५४ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे औचीत्य साधुन गुरुवारी (ता.६) कारखाना कार्यस्थळावर सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी कारखान्याचे टाईम किपर दिपक जाधव यांनी सर्व प्रथम उपस्थित सर्व कर्मचारी, कामगार यांना सुरक्षिततेची शपथ दिली. त्यानंतर सुरक्षा व इंजि. विभागातील कर्मचाऱ्यांनी वापरण्यात येत असलेल्या सुरक्षिततेच्या साधनांचा प्रात्यक्षिक करुन दाखविले.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी उपस्थित कर्मचारी कामगार यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपली सुरक्षा हीच कुटुंबांची सुरक्षा यामुळे सर्व कामगार व अधिकारी यांनी कारखान्यात काम करीत असताना अपघात होवु नये याची दक्षता घेवुन हेल्मेट, सेफ्टी बुट, सेफ्टी बुट यासह सर्व आवश्यक त्या सेफ्टी साधनाचा वापर करावा.

कर्मचाऱ्यांनी सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करुन विना अपघात काम केल्यास कामगारांची, कारखान्याची तसेच राष्ट्राची प्रगती होते. तसेच कामगारांनी दिलेल्या नियमावलीप्रमाणे व सुरक्षा साहीत्याचा वापर केल्यास अपघात रोखण्यासाठी मदत होते असे प्रतिपादन केले.

सुरक्षा सप्ताह कार्यक्रमासाठी सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख व कर्मचारी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना फसवून त्यांचा तळतळाट सरकारने घेऊ नये : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना शून्य रुपये वीजबिल देऊन त्यात तिघांचे फोटो टाकले निवडणुकानंतर त्याच शेतकऱ्यांना एक लाख बारा हजार रुपये वीजबिल देण्यात येतंय. शेतकऱ्यांना फसवून सरकारने त्यांचा तळतळाट घेऊ नये असा हल्ला आमदार कैलास पाटील यांनी विधानसभा सभागृहात चढविला. ते अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यपाल यांच्या अभिभाषणावर बोलत होते.

यावेळी आ. पाटील म्हणाले, महापुरुषांच्या नावाने फक्त राजकारण होणं हे दुर्दैवी आहे. महापुरुषांचा अपमान करण्याची हिंमत कुणी करणार नाही असं शासन कराव. हे करताना फक्त यामध्ये राजकारण करु नये असे मत मांडले. धाराशिव येथील कौडगाव एमआयडीसी मध्ये टेक्निकल टेक्सटाईल सुरु करण्याची घोषणा उद्योगमंत्री यांनी केली पण त्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आलेला नाही.

हा प्रकल्प कधीपर्यंत सुरु होणार याची विचारणा आमदार पाटील यांनी केली. तसेच धाराशिव येथील एमआयडीसीमध्ये भूखंड घ्यायचा असेल तर त्याचा दर प्रति चौरस मीटरला एक हजार ६५० रुपये इतका आहे. तर कुरकुंभ येथे हा दर अवघा साडेचारशे रुपये आहे. मग एवढा फरक असल्यावर कोणता उद्योग जिल्ह्यात येईल असा प्रश्न पाटील यांनी विचारला. हा दर कमी करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. निवडणुकीच्या अगोदर सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना आणली पण नंतर ही योजना बंद झाली. शिवाय दोन महिन्याचे वेतनही त्या युवाना मिळालेलं नाही.

ही योजना पूर्ववत सुरु ठेवून त्यांचे वेतन द्यावे अशी मागणी आ. पाटील यांनी केली. शक्तिपीठ महामार्गला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध झाल्याने निवडणुकी अगोदर या मार्गाला स्थगिती देण्यात आली.

सरकार आल्यानंतर पुन्हा हा मार्ग होणार असल्याच सरकारने सांगितले आहे. ८६ हजार कोटी रुपये एवढा खर्च यासाठी होणार आहे. तोच खर्च मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पसाठी केल्यास या भागाचा आर्थिक विकास होईल, असेही मत आमदार पाटील यांनी मांडले. मागेल त्याला सौरपंप म्हणायचं मात्र त्याला टार्गेट द्यायचं ही कोणती पद्धत? जिल्ह्यात आतापर्यंत एकही पंप कार्यान्वित झालेला नसल्याच पाटील यांनी सांगितलं. जिल्ह्यात ५८ हजार शेतकऱ्यांनी यासाठी अर्ज केला त्यातील फक्त १५ हजार अर्ज मंजूर झाले पण एकही पंप अजून बसलेला नसल्याच सांगून सरकारचे लक्ष्य त्यांनी वेधले.



घरकुल देताना रक्कमेच्या बाबतीत शहरी व ग्रामीण असा भेद केला जातो. शहरी भागासाठी अडीच लाख तर ग्रामीणसाठी अगोदर दिड लाख व आता वाढवून दोन लाख केला आहे.

शहरी व ग्रामीण मध्ये बांधकाम करण्यासाठी लागणार साहित्याचे दरात फरक असतो का? असा प्रश्न विचारून त्यांनी उलट ग्रामीण खर्च जास्त होतो असं म्हटले. ग्रामीणमधून शहरातून हे साहित्य खरेदी करावं लागत त्याची वाहतूक वाढते त्यामुळं ग्रामीणची रक्कम वाढवून ती तीन लाख करावी अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. पिककर्जबाबत सुद्धा शासन नुसत्या घोषणा करत पण प्रत्यक्षात वास्तव वेगळं असल्याच आमदार पाटील यांनी दाखवून दिलं. पिककर्ज देताना सीबील चा अडथळा येणार नसल्याच सरकारने स्पष्ट केल पण जेव्हा राज्यस्तरीय पिक समितीचे इतिवृत पाहिलं तेव्हा त्यात तसा उल्लेख नाही.

त्यामुळं बँकेनी शेतकऱ्यांची नेहमीसारखी अडवणूक केल्याचं दिसून आलं आहे. आतातरी याबाबत सरकारने ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

सोयाबीन खरेदीविषयी बोलताना आ. पाटील यांनी सरकारी धोरण किती कुजकामी आहे हे दाखवून दिलं. ते म्हणाले, जिल्ह्यात ६२ ते ६७ लाख मेट्रिक टन उत्पादन झालं त्यातील फक्त ११ लाख मेट्रिक टन एवढंच सोयाबीन खरेदी झाले आहे. आता या उर्वरीत सोयाबीनचे काय असा प्रश्न त्यांनी विचारला. शिवाय सरकारकडं आम्ही खरेदी केंद्र वाढविण्याची मागणी करूनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचं त्यांनी सांगितलं.

किमान आता भावांतर योजनेतून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळावा लवकर मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी सरकारकडे व्यक्त केली.




बीड : आता रब्बी ज्वारींची काढणी पूर्ण झाल्याने उन्हाळ्यात जनावरांसाठी लागणाऱ्या चाऱ्याची तजवीज शेतकरी करीत आहेत. शेतातील वैरणीचा चारा बैलगाडीतून वाहून आणताना शेतकरी. (छाया-कृष्णा शिंदे)

## बीड एमआयडीसीबाबत आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मंत्री ना.उदय सामंतांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

बीडच्या एमआयडीचा विकास व्हावा याकरिता गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यातच गुरूवारी (दि.६) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधीमंडळात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली.



बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा याकरिता बीड शहरात स्थित असलेल्या औद्योगिक वसाहतीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून त्याठिकाणी मोठमोठे उद्योग येतील आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल तसेच आर्थिक स्थिती सुधारेल. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून बीडच्या एमाआयडीसीच्या विकासासाठी पाठपुरावा करत आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली होती. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक अधिकारी आदी वरिष्ठ अधिकार्यांसमवेतही बैठका घेतल्या होत्या. आता पुन्हा यासंदर्भात, मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली आहे. दरम्यान याविषयी ना.सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच सविस्तर बैठक लावण्याचे सांगितले आहे.

## स्वा.सावरकर महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

विविध विद्या शाखांची पदवी घेतल्यानंतर समाजामध्ये आपण जाणार आहोत, कुणी नोकरी करेल कोणी व्यवसाय करेल परंतु हे करत असताना राष्ट्र सर्वप्रथम हा विचार सर्वांनी आचरणात आणावा असे प्रतिपादन विक्रांत हजारी यांनी केले. स्वा. सावरकर महाविद्यालयात आयोजित पदवी प्रदान कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी हे होते तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ.



उत्तम साळवे, महाविद्यालयाच्या मानव विद्या शाखेचे प्रमुख डॉ. तात्याराम सोंडगे, वाणिज्य विद्या शाखा प्रमुख डॉ. रमेश खंडागळे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ. छत्रपती पांगरकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना विक्रांत हजारी म्हणाले की पदवी मिळाली म्हणजे शिक्षण पूर्ण झाले असे नाही या पुढेही विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर अनेक संधी प्राप्त कराव्यात. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन कंदले यांनी केले तर आभार डॉ. छत्रपती पांगरकर यांनी मानले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी,प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## साईराम अर्बन मल्टीस्टेटअर्बनच्या संचालकांना ५ दिवस पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

श्री. साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रे.सो.लि. बीड चे बीड जिल्हयात १६ शाखा असुन सदर मल्टीस्टेट विरुद्ध बिड जिल्हयात विविद्ध पोलीस स्टेशनला ०६ गुन्हे दाखल झाले असुन फिर्यादी मधील एकुण-१,८८,९४,६९५/रुपयाचा अपहार झालेला बाबत तक्रारीमध्ये नमुद आहे तसेच श्री. साईराम मल्टीस्टेटचे आजपावेतो आर्थिक गुन्हे शाखा बीड येथे एकुण-२४५ ठेवीदार यांचे विश्वाघात व फसवणुक झाले बाबत तक्रारी व त्याबाबतचे पुराने या शाखेत दिलेले आहे त्यावरुन गुन्हयातील तक्रारी मधील व प्राप्त ठेवीदार यांचे अर्ज असे एकुण-१५,२९,७२,३९७/-रुपयांची फसवणुक झाले बाबत माहीती आज पर्यत प्राप्त झालेली आहे त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

श्री. साईराम अर्बन मल्टीस्टेट को- ऑप. क्रे.सो.लि. बीडचे संचालक आरोपी नामे १) विठ्ठल ज्ञानदेव जाधव संचालक, २) शिवाजी निवृत्ती खोड संचालक, यांची गुप्त बातमीदारांकडुन माहीती काढून त्यांचे शोधासाठी एक स्वतंत्र पथक तयार करुन मा. विश्वांबर गोल्डे उविपोअ बीड तथा पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड, मा. संतोष शेजाळ पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि योगेश, सफी/ अभिमान ११५४ पोह/ १६१५ गोरख, पोह/ १६७ विष्णु, पोशि/२२८३ भाऊसाहेब यांचेपथकाने दिनांक- १२/०२/२०२५ रोजी पकडून गुन्हयात अटक करण्यात आलेली असुन त्यांचा मा. न्यायालयाकडुन ०५ दिवस पोलीस कोठडी प्राप्त करुन तपास करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्र, नर्वानत कॉवत पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड मा. विश्वांबर गोल्डे उपविपोअ बीड तथा प्रभारी पोलीस उप अधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली संतोष पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि योगेश पवार, सफी/ अभिमान भालेराव, पोह/१६१५ गोरख पोह/१६७ विष्णु, पोशि/२२८३ भाऊसाहेब यांनी केली आहे.

## जयभिम महोत्सव समितीकडून चेक सुपूर्द

### समितीकडून पैशाचा योग्य विनियोग

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन देईल. असा जयभिम महोत्सव बीडमध्ये साजरा केला जातो. स्वबळावर साजरा होणारा जयभिम महोत्सव म्हणून नावारूपाला आला आहे. त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख असताना शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवण्यात आले होते. त्या रकमेसह मिळालेले व्याज असे एकूण ८ लाख ५० हजार रुपये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

बीड शहरातील रिपाइं मध्यवर्ती कार्यालयात, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या उपस्थितीमध्ये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सदरील रकमेचा चेक सुपूर्द करण्यात आला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समिती तत्कालीन समिती प्रमुख असलेले शितलकुमार सुकाळे यांनी त्यांच्या कार्यकाळात शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून जमा करुन ठेवले होते. सर्वानुमते शिल्लक रकमेचा उपयोग बुद्धसृष्टी सुशोभीकरणासाठी खर्च करण्याचे ठरले. त्या अनुषंगाने शितलकुमार सुकाळे सर यांनी फिक्स डिपॉझिटचे सहा लाख आणि त्यावरील व्याज यासह आठ लाख पन्नास हजार रुपये समितीकडे सुपूर्त केले. शितलकुमार सुकाळे सर यांनी शिल्लक रक्कम व्यवस्थित जतन केल्यामुळे आणि रकमेचा विनियोग करण्याचा निर्णय घेताच तात्काळ ८५००००/- चा चेक समितीकडे सुपूर्त केल्याबद्दल शितलकुमार सुकाळे सर यांचा सहृदय सत्कार करण्यात आला.यावेळी राजुजी जोगदंड, अजय सवाई, गौतम चोपडे, संतोष जाधव, नाना मस्के, अरुणा आठवले, बंडू निसर्गन, विजय चोपडे, बाळासाहेब डोळस, महादेव इनकर सर, संजय हनवते आदी उपस्थित होते.

## बीड पंचायत समितीच्या वतीने लिंबागणेश येथे एक दिवस गावकऱ्यांसोबत ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

बीड पंचायत समितीच्या व ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.(०५) बुधवार रोजी लिंबागणेश येथे 'एक दिवस गावकऱ्यांसोबत ' ग्राम दरबार उपक्रम अंतर्गत घेण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.विजय देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी लिंबागणेश डॉ.रमण देशपांडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल यादव, विस्तार अधिकारी पंचायत समिती बीड येळंबकर, कृषी विस्तार अधिकारी चंद्रकांत नागरगोजे, कृषी सहायक वाघ,पेजगुडे,उमेद अभियानच्या प्रियंका जोगदंड, ज्योत्स्ना वखरे, आरोग्य सेवक वीर यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर , सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ आणि ग्रामपंचायत सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी केले तर डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, समीर शेख, दादा गायकवाड, अँड.गणेश वाणी, सुरेश निर्मळ, सय्यद शाकेर, माणिक कांबळे,जीवन मुळे, सुखदेव वाणी, हरिओम क्षीरसागर आदि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.भारतातील ६२ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले गेले.

## रेशीम कोष खरेदी सुरु करण्यासह गेवराई शहरात भुमिगत गटार योजना राबविण्याची आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

रेशीम शेतीचा प्रचार आणि प्रसार व्हावा, शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात रेशीम कोष खरेदी व विक्री करण्याची शासनाने परवानगी द्यावी, गेवराई शहरातील सांडपाणी व मलनिस्सरण करून दुर्गंधीमुक्त स्वच्छ व सुंदर गेवराई करण्यासाठी गेवराई नगर पालिकेला भुमिगत गटार योजना राबविण्यासाठी निधी मंजुर करावा आणि कुसूम सौरपंप योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मागेल त्याला सौरपंप योजनेत समाविष्ट करून तात्काळ सौरपंप उपलब्ध करून देण्याची मागणी विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली. राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीलाच विधानसभा मतदार संघातील सार्वजनिक महत्वाचे विषय विधिमंडळात मांडले. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत त्यांनी महायुती सरकारचे अभिनंदन करून त्यांना समर्थन दिले. शासनाने जालना येथे रेशीम कोषाची खुली बाजारपेठ उभारल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करून गेवराई येथे सुध्दा रेशीम कोष खरेदी व विक्री करण्यासाठी बाजारपेठ सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली. यावेळी बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यात ४ हजार एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर रेशीमशेती केली जाते. सतराशेहून अधिक नोंदणीकृत शेतकरी या उद्योगात सहभागी आहेत. ऊस, कापूस यांसारख्या नगदी पिकांबरोबरच रेशीमशेती हा नवीन पर्याय शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी चालना देणारा ठरत आहे. केवळ गेवराई तालुक्यात या उद्योगात सुमारे १२० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होत असल्याचे सांगताना



आ.विजयसिंह पंडित यांनी रेशीम शेतीचे अर्थशास्त्र सभागृहासमोर मांडले. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीने रेशीम कोष खरेदी विक्रीसाठी खुली बाजारपेठ सुरु करण्यासाठी दाखल केलेला प्रस्ताव मंजुर करून गेवराईत रेशीम खरेदी केंद्र सुरु करण्याची आग्रही मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली.

शहरी भागात उत्तम पायाभूत सुविधांद्वारे नागरीकांचे जीवनमान सुधारण्यासाठी महायुती सरकार नगरोत्थान अभियान प्रभावीपणे राबवित असल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांनी शासनाचे अभिनंदन केले. या बाबत बोलताना आ.पंडित म्हणाले की, गेवराई ही क-वर्ग दर्जाची नगर परिषद असून येथील नागरीक मात्र पायाभूत सुविधांपासून आजवर वंचित आहेत, शहराचा विकास प्रभावीपणे झालेला नाही त्यामुळे गेवराई शहरातील मलनिस्सारणासह सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून गेवराई शहर दुर्गंधीमुक्त व स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी गेवराई शहरात भुमिगत गटार योजना राबविण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून त्यास मंजुरी देण्याची आ.विजयसिंह पंडित यांनी मागणी केली.

राज्यातील शेतकऱ्यांना भारनियमन मुक्त व मोफत विज पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून मागेल त्याला सौरपंप ही योजना अतिशय उपयुक्त ठरत असल्याचे सांगताना आ.विजयसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांच्या व्यथा सभागृहात मांडल्या. ७४०० शेतकरी कुसूम सौरपंप योजनेत पात्र असताना ही योजना अचानक बंद झाली, महावितरणने या पात्र लाभार्थ्यांचा समावेश मागेल त्याला सौरपंप या योजनेत करून तात्काळ मुदतीत पात्र लाभार्थ्यांना सौरपंप अस्थापित करून द्यावा अशी मागणी केली.राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत मतदार संघातील सार्वजनिक महत्वाचे विषय सभागृहात मांडल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांचे संबंधितांकडून अभिनंदन होत आहे.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## चाकूर येथे देशमुख यांच्या मारेकऱ्यांच्या निषेधार्थ जोडेमारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.६ मार्च -**



चाकूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात युवासेना चाकूर शहरच्या वतीने स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी चाकूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी वाल्मीक कराड यांच्या फोटोला जोडे मारून आंदोलन करण्यात आले. व फरार झालेले आरोपी लवकरात लवकर प्रशासनाने लक्ष घालून त्या आरोपीला पकडून हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे अश्या विविध मागण्यासाठी युवा सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी वैभव धोंडगे, कल्याण भोसले, मंगेश धोंडगे, अमर तेलंग, अशोक मुकुटमोरे, अर्जुन मुंगळे, प्रशांत साळी, शुभम धनेश्वर, गोपाळ जनवाडे, दिनेश बिरणाले, कृष्णा धोंडगे, ओमकार यरवे, अभिषेक राजपूत, शिव जाणकार, दत्ता पवार, आहाद चमकुरे, चिंटू धोंडगे आदी युवासैनिक व शिवसैनिक उपस्थित होते.

▶▶ सरपंच संतोष देशमुख हत्येच्या निषेध...

# शिरूर अनंतपाळ बाजारपेठ कडकडीत बंद





### धनंजय मुंढेंना सहआरोपी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.६ मार्च -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या केल्याचे फोटो समाज माध्यमातून व्हायरल झाल्यानंतर संबंध महाराष्ट्रभर संतापाची लाट पसरली असून या क्रुर व मानवतेला काळामी फासणाऱ्या घटनेच्या निषेधार्थ तसेच आरोपी वाल्मीक कराड व या हत्याकांडतील सर्व आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे. या म ागणीसाठी शिरूर अनंतपाळ शहरातील म हात्मा बसवेश्वर चौक येथे शिरूर अनंतपाळ वासियांच्या वतीने बाजारपेठ कडकडीत बंद करून मन सुन्न करणाऱ्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

या हत्याकांडतील सर्व आरोपींना मदत करणाऱ्यांना सह आरोपी करावे व वाल्म ीक कराड सारख्या नराधमाला राजाश्रय देणारे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना सह आरोपी करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे नेते डॉ. अरविंद भातांब्रे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष अँड. सुतेज माने पाटील, शिवसेना (उ.बा. ठा) तालुकाप्रमुख भागवत वंगे, मराठा आंदोलक बाळासाहेब पाटील, कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, अँड. सुहास मादलापुरे, विनोद धुमाळे, दत्ता भोसले, विशाल गायकवाड, गुरुनाथ अचवले, विश्वनाथ हांद्राळे, व्यंकट कल्ले, अमोल पाटील, पिंटू पाटील, मारोती माने, संभाजी हात्तरगे, गोविंद श्रीमंगल, गनपत चाकुरे, तसेच शहरातील व तालुक्यातील नागरीक, व्यापारी उपस्थित होते.

यावेळी स्व. संतोष देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून नागरिकांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## विविध प्रलंबित मागण्यासाठी एस. टी. कर्मचाऱ्यांचे निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.६ मार्च -**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील बाकली येथील वाहक राजकुम ार सुर्यवंशी यांनी कामगार संघटनेची जबाबदारी स्वीकारताच एस.टी. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी आवाज उठविला आहे.

त्यांनी तात्काळ आपल्या कर्मचारी सहकाऱ्यांना सोबतीला घेऊन आज निलंगा येथील राज्य परिवहन महामंडळाच्या गेटवर निदर्शने करण्यासाठी बैठक घेतली व त्याप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने गेटवर कामगार संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन, निदर्शने करण्यात आली.

यावेळी एस.टी. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यासाठी आंदोलन करुन निदर्शने केली यात प्रामुख्याने आर्थिक प्रलंबित मागण्या, ५३ टक्के महागाई, भत्ता १६ ते २० या कालावधीतील देय होणारी थकबाकी, सन २०१८ पासून महागाई भत्त्याची थकबाकी, आरटीओ कडून होणारा चालकाला दंड, एकतर्फी जाहीर केलेले वेतन वाढ यातील वार्षिक वेतन वाढीचा दर एक टक्क्याने कमी केला होता.

त्याची थकबाकी, कोरोना कालावधीतील सुधारित हजेरी शिस्त आवेदन पद्धत रद्द करणे व सुधारित नवीन शिस्त आवेदन पद्धत लागू करणे या व इतर मागण्यासाठी कामगार संघटनेचे अध्यक्ष राजकुम ार सुर्यवंशी व सचिव अंकुश काळे यांनी आगारातील गेटवर निदर्शने आंदोलन केले.

यावेळी श्याम येरनवाड, खंडू धुमाळ, प्रकाश शाणीमे, राजेंद्र सूर्यवंशी, अंकुश काळे, सुधाकर वडमीले, दयानंद मलशेट्टी, गोविंद कन्हेरे, संतोष गायकवाड, अनिल बिराजदार, रामराजे कांबळे, गफार बागवान, सुरेश पवार, सुभाष शेंद्रे, दत्ता शिंदे, दयानंद बडगे, भगवान राजे, दिलीप येडले, राम मारापल्ले, रणजित माने, कोळळे अप्पा, इरनाथ माने, राम शिरूरे यांच्यासह आदि कर्मचारी, पदाधिकारी म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र हत्तीबेट येथे श्री संत जगद्गुरू तुकाराम महाराज; मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.६ मार्च -**

उदगीर शहरापासून १६ किमी पश्चिमेस मौजे हट्टी बेट नावाच्या टेकडीला प्राचीन काळापासून म हत्त्व प्राप्त आहे. प्राचीन मंदिरे, गुहा, कोरीव शिल्पे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दिसतात. हत्ती बेट धर्मापूरी देवर्जन येथे प्रादेशिक पर्यटनाचा दर्जा मिळाला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामात स्वातंत्र्यसैनिकांनी रझाकारांविरुद्ध लढा दिला आणि शेवटपर्यंत रझाकारांना हत्ती बेट जिंकू दिले नाही, असा इतिहास येथे सांगितला जातो. हत्ती बेटावर दत्ताचे मंदिर तसेच गंगाराम महाराजांची समाधी आहे.

लोकांच्या श्रद्धेचा भाग असलेल्या या ठिकाणी पंचक्रोशीतील आणि शेजारच्या राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक येतात. पौर्णिमेला येथे भजन, कीर्तन आणि प्रवचनांचे आयोजन केले जाते. ही परंपरा गत ८० वर्षापासून सूरू असून ती आजतागायत सुरू आहे.यातच एक भर टाकत स्व. रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या संकल्पनेतून श्री संत जगद्गुरु तुकाराम यांचे भव्य असे मंदिर येथे उभे टाकले आहे.

देवणी व उदगीर तालुक्यातील पर्यटन श्रीक्षेत्र हत्तीबेट येथे श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज म ुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रम दि. ७ ते ९ मार्च रोजी आयोजित करण्यात आला असून हत्तीबेट पंचक्रोशीतील व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रमासाठी सर्व हत्तीवेट पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजनेचा लाभ घ्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

गावोगावी जलसंधारणाच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलण्यात आले असून, शासनाने तलावांचे पुनरुज्जीवन आणि नाला खोलीकरण - रुंदीकरणासाठी विशेष योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ आणि ‘नाला खोलीकरण व रुंदीकरण’ या योजनांच्या माध्यमातून तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## वलांडी-हैदराबाद बस सेवा चालू; ग्रामस्थांच्यावतीने बसची पुजा

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.६ मार्च -**





सीमावर्ती भाग व महाराष्ट्र, कर्नाटक राज्यातील प्रवाशांची सोय व्हावी म्हणून भालकी आगाराच्यावतीने वलांडी-अळवाई-मेहकर-भालकी-बीदर-जहिराबाद मार्गे हैदराबाद अशी आणखी एक वाढीव बससेवा चालू करण्यात आली आहे. दररोज हैद्राबाद जाणाऱ्या बस सेवेचा प्रारंभ आज गुरुवार ता.६ रोजी झाला.

सदर बस दररोज दुपारी दीड वाजता वलांडी येथून निघेल व हैदराबादला रात्री आठ वाजेच्या दरम्यान पोहचेल आणि परत त्याच मार्गे पहाटे पाच वाजता वलांडीकडे निघेल आणि दुपारी दीड वाजता वलांडी येथे पोहचेल. सदरील कर्नाटक शासनाच्या वतीने भालकी आगाराने सुरू केल्याने बसचे वलांडी येथील बस स्थानक परिसरात ग्रामस्थांच्यावतीने जोरदार स्वागत करण्यात आले. तसेच चालक संभाजी तळीखेडे आणि वाहक नागनाथ पाटील यांचा शाल, श्रीफळ फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

यावेळी उमाकांत नागलगावे, बालाजी सोनकवडे, हसन मोम ीन, मुस्ताक कादरी, आसलम ताबोळी, रवी स्वामी, गणेश चवाळे, रामलिंग बावगे, महम्मद शिकूर बौडीवाले यांच्यासह प्रवासी नागरिक यांची उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात डोडला डेअरी कंपनीच्या कॅम्पस इंटरव्यूला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ मार्च -**

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाच्या दुग्धशास्त्र विभागाच्या वतीने डोडला डेअरी लिमिटेड, हैद्राबाद यांच्या सहकार्याने कॅम्पस इंटरव्यू मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत महाविद्यालयाच्या परिसरात हा इंटरव्यू संपन्न झाला.

या मुलाखतींसाठी केवळ उदगीरच नव्हे, तर इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सुद्धा या संधीचा लाभ घेतला. यामध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी मुलाखतींसाठी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक क्षमता सिद्ध केली. डोडला डेअरी लिमिटेडमधून हैदराबाद येथून इंटरव्यू घेण्याकरिता आलेले नागेंद्र कुमार, वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन), किरण कुमार, प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र, ब्रम्हय्या, उपव्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण), तृषाल, सहायक व्यवस्थापक (दुग्ध खरेदी), रवी चंदन, भरती कार्यकारी यांनी विद्यार्थ्यांना दुग्ध उद्योगातील संधी, गुणवत्ता नियंत्रण आणि दुग्ध व्यवसायातील आधुनिक प्रक्रिया तसेच शेतीविषयक अत्याधुनिक प्रक्रिया या विषयी माहिती दिली.

तर कार्यक्रमाचे अध्यक्ष व म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे यांनी डोडला व्यवस्थापनाचे आभार व्यक्त करताना या संधीचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आव्हान केले. व्यासपीठावर आय.क्यू.ए.सी. समन्वयक तथा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. विष्णू पवार उपस्थित होते.


महाविद्यालयाचा व्यवस्थापन समितीने या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाशी जोडणाऱ्या प्रयत्नांची प्रशंसा करत भविष्यात अशा अधिक संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

त्याचबरोबर डोडला डेअरी व्यवस्थापनाने महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या तांत्रिक कौशल्ये आणि आत्मविश्वासाचा गौरव करत भविष्यातही अशाच कॅम्पस इंटरव्यू बाबतची संधी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला. या कार्यक्रमाचे संयोजक दुग्धशास्त्र विभाग प्रमुख प्रा. आर.बी. येडतकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर आभार प्रदर्शन डॉ. अनंत टेकाळे यांनी केले.

या कार्यकर्मासाठी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एच.ए. तीरपुडे सहयोगी प्राध्यापक डॉ. अनंत टेकाळे, डॉडी.बी. मुळे, हिंदी विभागाचे प्रा.बी.पी. सूर्यवंशी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.व्ही.डी. गायकवाड, यशवंत महाविद्यालयाचे प्रा. बाळासाहेब लांडगे इत्यादी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शिक्षकेतर कर्मचारी रमेश दरवेशवार, राजू बसगोंडा यांनी अथक परिश्रम घेतले.

## निटूरच्या सरपंच प्रतिभा सोमवंशी उत्कृष्ठ कामाबद्दल पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ मार्च -**

नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अनुषंगाने दि.४ व ५ मार्च रोजी दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतम ध्ये उत्कृष्ठ काम करणाऱ्या सहा गावाच्या महिला सरपंचाचा केंद्रीय मंत्र्याच्या हस्ते पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. त्यात निलंगा तालुक्यातील निटूर च्या सरपंच प्रतिभा सोमवंशी यांना ही पुरस्कार देवून गौरवण्यात आले. त्यामुळे निटूर व पंचक्रोशीमधून त्यांचे अभिनंदन होत आहे .

केंद्रीय पंचायत राज विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील उत्कृष्ट काम करनाऱ्या ग्रामपंचायतीना पुरस्कार देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये निटूर ग्रामपंचायत विकास कामात राज्यात पहिली आली असल्यामुळे सरपंच सोमवंशी यांना पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. तसेच या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील इतर ही गावच्या सरपंचांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यात सुनीता नारायणपुरे (गणेशवाडी ता.शि. अनंतपाळ), कोमल गुणाले (नागतिर्थवाडी ता. देवणी), रंजना म्हेत्रे (बोळेगाव), प्रिती बुलबुले (सामनगाव ता. लातूर) व रेणापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सुमित जाधव यांची निवड करण्यात आली होती. त्यातुन निटूर गावच्या लोकनियुक्त सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी यांना महाराष्ट्र राज्यातून राष्ट्रीय महिला सरपंच उकृष्ट कामगिरी हा पुरस्कार दिल्ली विज्ञान भवन येथे केंद्रीय पंचायत राज्य मंत्री भारत सरकार ललन सिंह, पशुपालन व दुग्धविकास केंद्रीय राज्यमंत्री एसपी सिंह बघेल, केंद्रीय महिला व बाल कल्याण विकास मंत्री अन्नपूर्णा देवी, केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे, केंद्रीय पंचायत राज सचिव विवेक भारतवाज व इतर मान्यवर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### संतोष देशमुख हत्याकांडप्रकरणी तेर बंद

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.६ मार्च -**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील आरोपींना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे या मागणीसाठी दि.६ मार्च रोजी तेरकरांनी तेर (ता. धाराशिव) बंद ठेवून निषेध करण्यात आला.

देशमुख यांच्या हत्येचे व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्यानंतर ज्या पद्धतीने हत्या करून राक्षसीवृत्ती समोर आली संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. म ाणुसकीला काळिंबा फासणारी घटना घडली असून संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे तसेच धनंजय मुंडे यांना सह.आरोपी करून कारवाई करा म्हणून तेर गाव बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला. व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवून केलेल्या आवाहनाला उत्सफुर्त प्रतिसाद दिला.

## तालुका अध्यक्षपदी प्रा.डॉ.बी.आर. गायकवाड यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ मार्च -**



भारतीय बौद्ध महासभा निलंगा तालुका शाखेची नवीन कार्यकारिणीची बैठक दि.१ मार्च रोजी निलंगा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील बौद्ध विहारात तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीला तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून, त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी जिल्हा कार्यकारिणीच्या उपस्थितीत तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

तालुकाध्यक्षपदी प्रा.डॉ.बी. आर. गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच तालुका कार्यकारिणी मध्ये सरचिटणीस भागेश भगवानराव कांबळे, कोषाध्यक्ष अनिल अंकुश गाडे, उपाध्यक्ष (संस्कार विभाग) इंद्रजीत लिंबाजी कांबळे, सचिव (संस्कार विभाग),सूर्यवंशी संदीप ज्ञानेश्वर, अंकुश पंढरी गायकवाड, उपाध्यक्ष (प्रचार-पर्यटन विभाग) दयानंद कोंडीबा टाकळीकर, सचिव (प्रचार-पर्यटन विभाग) प्रेम नाथ सदाशिव कांबळे, दयानंद युवराज काळे, उपाध्यक्ष (संरक्षण विभाग) ॲड. विशाल वामनराव गायकवाड, सचिव (संरक्षण विभाग) दत्ता महादू सोनकांबळे, सुभाष दत्तू कांबळे, कार्यालयीन सचिव पांडुरंग लक्ष्मणराव ढवळे, हिशोब तपासणीस शिवाजी भिकाजी बनसोडे, तालुका संघटक विलास रंगराव कांबळे, नवनाथ नरसिंग गायकवाड, कमलाकर जगन्नाथ भाले, आनंद रामचंद्र साबळे, बाबुराव धोंडीबा कांबळे, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदेविषयक सल्लागार मंडळ तालुकाप्रमुख ॲड. धनराज धैर्य आदी पदाधिकाऱ्यांचा निलंगा तालुका कार्यकारिणीत नियुक्ती करण्यात आली आहे.

## जगण्यासाठीचा आदर्श पाठ म्हणजे इंटिमेट डेथ : अर्चना मुळे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ मार्च -**

जन्म आणि मृत्यू हे आयुष्याचे दोन टोक आहेत. पुनर्जन्म किंवा अस्तित्व हे मृत्यूने लावलेला शोध आहे. जगणं समृद्ध असेल तर मृत्यू चांगला येतो. वर्तमानाच्या आशा, वेदनांचे मर्म, जीवनातील सुख-दुःख आणि मृत्यू यांच्यातला संवाद पुनर्स्थापित केले तर आयुष्यावरच प्रेम माणसाला जगण्याची प्रेरणा देत.

खरे आयुष्य जगण्यासाठीचा आदर्श पाठ घालून देणारी साहित्य कृती म्हणजे इंटिमेट डेथ हि होय, असे मत अर्चना मुळे यांनी व्यक्त केले.

श्रुतिका पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गतच्या महिला दिन विशेष ३३२ व्या वाचक संवादामध्ये सांगली येथील सुप्रसिद्ध समुपदेशक अर्चना मुळे यांनी डॉ. मारी डी हेनेझेल लिखित इंटिमेट डेथ या साहित्यकृतीवर सुंदर असा संवाद साधताना त्या म्हणाल्या की, मृत्यू हे एक फार मोठे रहस्य आहे. मृत्यूम ुळेच आयुष्याला मोल येत. मृत्यूला नाकारण्यापेक्षा त्याला जीवनाचा एक भाग बनवला पाहिजे. कारण मरणासन्न व्यक्ती आपल्या वेदना, निराशा सहवासातील व्यक्तीकडे व्यक्त करतो.

या पुस्तकात लेखकाने वर्तम ान पुन्हा सादर करून आमच्या जाणिवेतून निसटलेल्या विषयांच्या आणि काळाच्या दूरवरच्या कक्षा, वेदना आणि त्यांचे मर्म, दुसऱ्यांचे



दुःख, जीवन आणि मृत्यू यांच्यातला निरंतर संवाद यासाठी वर्तमान पुन्हा सांगण्याचा प्रयत्न केलाय. याबरोबरच मरणासन्न रुग्णांशी टिकवून ठेवलेला संवाद या पुस्तकातून सादर केलेला आहे.

यानंतर संपन्न झालेल्या चर्चेत, वर्षा वैद्य, उषा तोंडचिरकर, प्राचार्य विजयकुमार पाटील, सुरेश विश्वब्रह्मा, प्रतिभा मुळे, प्रा.डॉ. म.ई. तंगावार, डॉ. कांत जाधव यांचे सह अनेकांनी सहभाग नोंदवला.

यावेळी जि.प.प्रा. शाळा, डिगोळ येथे सहाव्या वर्गात शिकणारी बाल वाचक मानवी बिरादार हिने वाचलेल्या छत्रपती शिवाजी महाराज या कृष्णा केळुसकर लिखित पुस्तकाबद्दल म ाहती सांगितली. सूत्रसंचालन डॉ. चंद्रभागा शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय अर्चना नळगीरकर यांनी करून दिला तर आभार सुचिता अनंतराव कदम यांनी मानले.

या कार्यक्रमास परिसरातील अनेक डॉक्टर, वकील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, व्यापारी-वाचक रसिकांसह बालगोपाळ, स्त्री-पुरूष उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## डाक विभागातर्फे विशेष आर्थिक सक्षमीकरण मोहीम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून, धाराशिव डाक विभागाच्या वतीने महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विशेष अभियान राबविले जात आहे. हे अभियान धाराशिव मुख्य डाकघर व त्याअंतर्गत येणारे २८ उप डाकघर आणि २५४ शाखा डाकघर तसेच लातूर मुख्य डाकघर व त्याअंतर्गत येणारे ३० उप डाकघर आणि २६१ शाखा डाकघर येथे ८ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या विशेष अभियानाचा उद्देश महिलांना सुरक्षित आणि सरकारमान्य लहान बचत योजनांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करणे आहे. महिलांना आर्थिक स्थैर्य मिळावे, त्यांच्या बचतीला योग्य दिशा मिळावी आणि मुख्यमंत्री माझी त्यांना आर्थिक स्वावलंबन मिळावे या उद्देशाने डाक विभाग विविध योजनांद्वारे सहकार्य करत आहे.

या उपक्रमांतर्गत महिलांसाठी महिला सन्मान बचत प्रमाणपत्र, सुकन्या समृद्धी योजना, तसेच महाराष्ट्र शासनाच्या लेक लाडकी योजना आणि लाडकी बहीण योजनाचा लाभ घेण्यासाठी बचत खात्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनांच्या माध्यमातून महिलांना आकर्षक व्याजदरासह सुरक्षित बचतीचा लाभ मिळू शकेल. या विशेष अभियानात खालील विविध लहान बचत योजना आणि सेवा उपलब्ध असतील.

आवर्ती ठेव योजना (आरडी): निश्चित मुदतीसाठी दरमहा ठराविक रक्कम जमा करण्याची योजना. सुकन्या समृद्धी योजना : मुलींसाठी विशेष बचत योजना, जिचा लाभ भविष्यातील शिक्षण व विवाहासाठी होतो. महिला सन्मान बचत प्रमाणपत्र : महिलांसाठी अल्पकालीन आणि सुरक्षित गुंतवणूक योजना. मासिक उत्पन्न योजना : नियमित मासिक उत्पन्न मिळवण्यासाठी सुरक्षित गुंतवणूक आदिंसाठी उपयोग होतो.



### संक्षिप्त वृत्त...

## ई-रिक्षासाठी सवलतीच्या दरात मिळणार अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत जिल्हा उद्योग केंद्र आणि राजयोग बजाज यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सर्व बजाज शोरुममध्ये ई-रिक्षाचे वितरण योजनेतंर्गत राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्ज स्वरुपात देण्यात येत आहे. जिल्हा उद्योग केंद्र आणि जिल्ह्यातील सर्व बजाज शोरुमध्ये याबाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात येत आहे.

जिल्ह्यातंर्गत सुशिक्षित बेरोजगारांसाठी पुरुष, महिला, महिला बचत गटासाठी बजाज कंपनीतर्फे सवलतीच्या माध्यमातून अर्थसहाय्य करुन देण्यात येत आहे. याबाबत लातूर जिल्हा उद्योग केंद्र येथील मोबाईल क्रमांक ९३७०१६३३६० वर संपर्क साधावा अथवा प्रत्यक्ष भेट देवून नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांनी केले आहे.

## ५०० हेक्टरखालील लिलाव बोलीमध्ये मत्स्यव्यवसाय संस्थांनी सहभागी व्हावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील जलक्षेत्रे असलेल्या देवणी तालुक्यातील दवन हिप्परगा आणि अहमदपूर तालुक्यातील हागद गुदगळ हे पाटबंधारे तलाव लातूर जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेअंतर्गत (बोली) जाहीर लिलाव पध्दतीने ठेक्याने देण्यात येणार आहेत. यासाठी १२ मार्च, २०२५ रोजी दुपारी ३ वाजता सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, लातूर यांच्या दालनात जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेमध्ये लातूर जिल्ह्यातील पाटबंधारे तलाव ठेक्याने देण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे. लिलावातील तलावाची न्युनतम ठेका रक्कम, तलाव ठेका सुरक्षा अनामत व वार्षिक इष्टतंम मत्स्यबोटूकली संचयन किंमत १० टक्के रक्कम तसेच अटी शर्ती व सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, लातूर यांच्या कार्यालयात (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळतील. तरी पात्र संस्थेने बोली लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावा, असे आवाहन जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, लातूर यांनी केले आहे.

## वाहन चालकांनी बेवारस वाहन नेण्याचे पोलीसांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
गांधी चौक पोलीस ठाणे येथे बेवारस, दोन चाकी वाहने बऱ्याच दिवसापासून पोलीस ठाणे आवारात पाडून आहेत. वाहने वातावरणाचा पारिणाम होवून सडून जात आहेत.

या वाहनाचा प्रकार, रजि. नं., चेसीस नं., यांची खात्री करुन ज्या कोणाचे वाहन असेल, त्यांनी या पोलीस स्टेशला आपला मालकी हक्क सादर करुन ताब्यात घेवून जावेत. मालकी हक्काची सर्व कागदपत्रे दाखवून घेवून जाण्याची मुदत फक्त १५ दिवस राहणार आहे, अन्यथा सर्व वाहने स्क्रॅप, भंगार करुन लिलावाद्वारे विक्री करुन ती रक्कम शासनास जमा करण्यात येणार आहेत, याची सर्व सुजान नागरिकांनी नोंद घ्यावी. दिलेल्या १५ दिवसांच्या मुदतीनंतर कोणी आक्षेप घेतल्यास अथवा दावा केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन पोलीस स्टेशन गांधी चौकचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांनी केले आहे.

## दिवसा घरफोडी ; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
येथे भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत दागिन्यांची चोरी केल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. याप्रकरणी अज्ञातांविरोधात देवणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी डॉ. किर्ती संजय घोरपडे यांनी मंगळवारी सायंकाळी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, चोरट्यांनी घराचे कुलूप कडीकोंडा तोडून कपाटात ठेवलेले चार तोळ्याचे पोहे हार व अन्य दागिने असे एकूण १ लाख ६१ हजारांचे दागिने चोरट्यांनी चोरुन नेले आहे. याबाबत देवणी पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## वर्षानुवर्षे श्री सिध्देश्वर यात्रेच्या लौकिकात भर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान हे लाखो भक्तांचे श्रध्दास्थान आहे. महाशिवरात्री यात्रेनिमित्त हे भक्त दर्शनासाठी येत असतात. देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने मागील अनेक वर्षांपासून यात्रेचे उत्कृष्ट पध्दतीने नियोजन केले जात असून वर्षानुवर्षे श्री सिध्देश्वर यात्रेच्या लौकिकात भर पडत आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी केले.

बुधवारी सकाळी खासदार डॉ. काळगे यांनी श्री सिध्देश्वरांचे सपत्नीक दर्शन घेऊन महाआरती केली. मंदिर परिसराची त्यांनी पाहणीही केली. यावेळी देवस्थानतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी खासदार डॉ. काळगे म्हणाले, लातूर जिल्ह्यासह मराठवाडा आणि सीमावर्ती भागात ही यात्रा प्रसिध्द आहे. त्यामुळे महाशिवरात्री यात्रेस लाखो भक्त येथे येतात. हे भक्त दर्शन घेण्यास सोबतच यात्रेचाही आनंद लुटतात. भक्तांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी विश्वस्त मंडळातर्फे प्रयत्न केले जातात. अनेक वर्षांपासून ही यात्रा सुरू असून दरवर्षी यात्रेच्या लौकिकात भर पडत असल्याचे डॉ. काळगे यांनी सांगितले.

यावेळी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे यांच्यासह अनेक मान्यवर व सिद्धेश्वर देवस्थान समितीचे माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## कारकुनाच्या निलंबनासाठी शिवसेनेचे धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
लातूर येथील उपविभागीय कार्यालयातील अव्वल कारकून मुजावर यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे तसेच त्यांच्या पुर्ण प्रॉपर्टीचीही सखोल चौकशी करण्यात यावी, असे अनेकवेळा निवेदने देऊनही कार्यवाही होत नाही.

अवैध गौण खनिज वाहतूक प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधियमानुसार दंडात्मक कार्यवाहीचे आदेश उपजिल्हाधिकारी यांना असताना ते कोणतीच कार्यवाही करत नाही, त्यामुळे शिवसेना उद्धव ठाकरे लातूर तालुका प्रमुख रमेश पाटील यांच्या नेतृत्वात ५ मार्च रोजी लातूर उपविभागीय कार्यालयासमोर हालगी नाद वं धरणे आंदोलन करण्यात आले.

लातूरच्या उपविभागीय कार्यालयात सदरचा अव्वल कारकून मुजावर हा किती दिवसापासून उपविभागीय कार्यालयात रुजु आहे यांची सखोल चौकशी करण्यात यावी व त्याचा सी.डी.आर तपासण्यात यावा. त्यांच्या कार्यकाळात गुंठेवारीत ही लाखो रुपये घेतल्याशिवाय हे गुंठेवारी फाईल मंजूर करीत नाहीत, सदर महसूल मधील अनाधिकृत गौणखनिज मध्ये प्रचंड भ्रष्टाचार चालू आहे व वाहतूक करीत असणारे टिप्पर व हायवा पकडल्यानंतर हे जे टिप्पर मालक पैसे देतात त्यांना एक लाख रुपये दंड करतात व पैसे देण्यास नकार दिल्यास रिकाम्या गाडयावर मनमानी दंडात्मक कार्यवाही करतात. शासन निर्णयाची ते पायमल्ली करतात. अशा अव्वल कारकूनास तात्काळ निलंबित करावे.

यासाठी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे लातूर तालुका प्रमुख रमेश पाटील यांच्या नेतृत्वात उपविभागीय कार्यालयासमोर हालगी नाद वं धरणे आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनात विनोद गुडे कव्हेकर, चंद्रकांत पाटील, किशोर जाधव, रणजित मस्के, ओम भालेराव, मुक्तेश्वर जाधव, करण कांबळे, भैरव सूर्यवंशी, महेश सूर्यवंशी, ऋषिकेश शिंदे, प्रणव शिंदे, जनार्दन शिंदे, भीष्मचार्य कांबळे, तुकाराम शिंदे, मुकेश जाधव, खंडू शिंदे, विष्णू मोरे यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांची माती व्यवस्था करते :डॉ. जयद्रथ जाधव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
आजच्या समाज व्यवस्थेतील भरडला जाणारा व बेदखल असा शेतकरी आहे.शेती भरघोस उत्पादन होते,पण त्या शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही.भारत शेतीप्रधान देश आहे. शेतीमालावर देशाचे सांस्कृतिक वैभव उभारले आहे,शेती उद्योग, व्यवसायाला चालना देते. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा मोठा आहे. पण या देशाची व्यवस्था कधीच शेतकऱ्यांच्या हिताची नाही.म्हणून शेती शेतकऱ्यांची माती करीत नसून ही व्यवस्था शेतकऱ्यांची माती करते असे शेती मातीच करणार का? परिसंवादात



बोलताना शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील डॉ.जयद्रथ जाधव यांनी केले.

माय मराठी चॅनेल, अरूणा प्रकाशन व निसर्ग मंडळ तादलापूर यांच्या संयुक्तपणे गावगाडा राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन तादलापूर येथे काल संपन्न झाले.या संमेलनाच्या दुसऱ्या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी श्री गोविंदराव भोपणीकर होते.तर डॉ. ज्ञानदेव राऊत, माधवराव मल्लिशे व डॉ.सचिन खडके सहभागी होते.

यावेळी डॉ. जयद्रथ जाधव यांनी सांगितले की, 'शेती बीज नेता थोडे मोटे आणिताती गाडे' असे संत नामदेवांनी म्हटले होते.शेती भरघोस उत्पादन देते.शेती उत्पादनांवर सरकार लोक कल्याणकारी योजना राबविते. परंतु शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला रास्त भाव देत नाही.चार वर्षांपासून सोयाबीनचे बाजारभाव चार हजारांच्या पुढे जात नाहीत.पण शेतीलागवडी खर्च चार पट वाढला आहे.याचा विचार सरकार करणार आहे की नाही? ही व्यवस्था उलट शेतकऱ्यांना पुस्तकी मार्गदर्शन करते.

परंतु शेती निसर्गावर अवलंबून असल्याने ती पुस्तकी मार्गदर्शनाने करता येत नाही असे यावेळी ते म्हणाले. परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ कांत जाधव यांनी केले तर आभार डॉ.दीपक चिद्दरवार यांनी मानले.

## ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास गंगाजल अभिषेक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रेस नुकताच प्रारंभ झाला असून याही वर्षी वीरशैव तेली समाजातर्फे श्री सिध्देश्वरास गंगाजल अभिषेक करण्यात आला. तसेच, वाजतगाजत मानाच्या काठीचे पूजनही यावेळी करण्यात आले.

२१ दिवस चालणाऱ्या या यात्रेत मराठवाड्यासह सीमावर्ती भागातील असंख्य भाविक सहभागी होतात. गेली ५० वर्षे वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिध्देश्वरास गंगाजल अभिषेक केला जातो व मानाची काठी परंपरा जपली जाते. याहीवर्षी श्री सिध्देश्वरास गंगाजल अभिषेक व समाजाचे अध्यक्ष किशोर भुजबळ यांच्या हस्ते मानाच्या काठीचे पूजन करण्यात आले. श्री सिध्देश्वरास रामलिंग काळे, संजय कलशेट्टी, आकाश निर्मळे, भागवत गंगणे, रामेश्वर देशमाने यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. तसेच गुरुकृपा महिला भजनी मंडळाच्यावतीने मिरवणूक काढून मानाची काठी मंदिरात लावण्यात आली.

यावेळी मंदिर समितीचे विश्वस्त सुरेश गोजमगुंडे यांनी मानाच्या काठीची पूजा करून स्वागत केले. यावेळी युवराज लोखंडे, इंद्रजित राऊत, उमाकांत क्षीरसागर, शिवराज लोखंडे, अजय कलशेट्टी, बाळासाहेब चोपडे, यांच्यासह वीरशैव तेली समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाबोधी बुध्द विहारासाठी राष्ट्रपतींना निवेदन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ पु. भिक्खु संघाच्या प्रमुख उपस्थितीत व पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या नेतृत्वात तीन दिवसीय धरणे आंदोलनाचा समारोप जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन देऊन करण्यात आला.

या प्रसंगी महाबोधी १९४९ हा जाचक कायदा रद्द करून नवीन सुधारित कायदा बनवून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या हाती द्यावे या प्रमुख मागणीचे निवेदन या वेळी पु. भिक्खु संघाच्या उपस्थितीत निवासी जिल्हाधिकारी साहेबांना देण्यात आले.

तीन दिवसीय धरणे आंदोलनाला व्ही. एस. पॅन्थर, भिम आर्मी, भीमराज संघटना, लोकप्रहार संघटना, शाक्य संघ, माता भीमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी संघटना युवा संघटन, भारतीय बौध्द महासभा, त्रिरत्न बौद्ध महासंघ, लातूर शहर पूर्व भाग नागरी हक्क कृती समिती, प्रतिज्ञा मागासवर्गीय महिला मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर डव्होकेट फोरम, बहुजन समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी आदी संघटनेने पाठींबा दिला आहे.

यावेळी पु. भिक्खु प्रा. डॉ. यशकास्यपायन महाथेरो, पु. भिक्खु महाविरो थेरो, पु. भिक्खु पय्यानंद थेरो, पु. भिक्खु विनय थेरो,पु. भिक्खु धम्मसार थेरो, भंते बुद्धशील, भिक्खुनी धम्मकरुणा ई. भिक्खु संघ उपस्थित होते.

निवेदनावर सर्व बौद्ध बांधव भगिनींच्या स्वाक्षऱ्या आहेत, यात प्रामुख्याने केशव कांबळे, ॲड. आण्णाराव पाटील, चंद्रकांत चिकटे, मोहन माने, अनंत लांडगे, बसवंतप्पा उबाळे, प्रा. यु. डी. गायकवाड, प्रा. रामराव गवळी, भीमराव चौदंते, अशोक कांबळे, विश्वाभर भोसले, डी. एस नरसिंगे, विश्वनाथ आल्टे, कुमार सोनकांबळे, यांच्या सह शेकडो बांधव भगिनींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ग्रामीण भागातील कामगारांना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध कराव्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
लातूर शहरातील छत्रप ती शिवाजी महाराज चौक तसेच गंजगोलाई या ठिकाणी बांधकाम कामगार काम मिळावे या प्रतिक्षेत उघड्यावर थांबतात. लातूर जिल्ह्यातील इतर लहान शहरात या कामगारांना आवश्यक त्या सुविधांसह हक्काची जागा उपलब्ध करून द्यावी, मोठ्या शहराप्रमाणे लातूर व इतर लहान शहरे आणि ग्रामीण भागातील कामगारांनाही मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करून केली.

यावर कामगार कल्याण मंत्री आकाश फुंडकर यांनी लातुरातील बांधकाम कामगारांना रोजगारासाठी उभारण्यास हक्काची जागा उपलब्ध करून दिली जाईल तसेच शहर आणि जिल्हा रुग्णालय, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे बांधकाम कामगारांना उपचार सेवा देण्यात येतील, असे सांगितले.



अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या विधिमंडळ सभागृहात बुधवारी प्रश्नोत्तर कालावधीत माजी मंत्री आमदार देशमुख यांनी लातूर शहरातील बांधकाम कामगारांना रोजगारासाठी थांबण्यास हक्काची जागा नाही. सध्या हे कामगार छत्रपती शिवाजी महाराज चौक, गंजगोलाई यासारख्या ठिकाणी थांबतात. या कामगारांना मोफत आरोग्य सेवा मिळणे आवश्यक आहे. मोठ्या शहरात आरोग्य सेवा मिळतात. परंतु, छोट्या शहरात आणि ग्रामीण भागात तशी व्यवस्था नाही, असा प्रश्न उपस्थित करून हक्काच्या जागेसोबत लातूर शहरातील बांधकाम कामगारांना मोठ्या मोफत आरोग्य सेवा हव्या आहेत. त्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली.

यावर उत्तर देताना कामगार कल्याण मंत्री फुंडकर यांनी जागेची चाचपणी करून, लातूर शहरातील कामगारांनाही योग्य प्रकारची, आवश्यक त्या सुविधांसह जागा उपलब्ध करून दिली जाईल, लातूर शहराच्या सर्व ठिकाणी आणि ग्रामीण भागातील कामगारांना रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्रांच्या ठिकाणी योग्य मोफत उपचार मिळावेत यासाठी संबंधित विभागाबरोबर चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे सांगितले.

## शारदा सेमी स्कूलमध्ये विज्ञानदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञानदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सर सीव्ही रमन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मेंडेलिव्ह यांची आवर्त सारणी सादर केली. यानिमित्त विज्ञान रांगोळी स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या विज्ञान रांगोळींची पाहणी पाहुण्यांनी केली. रांगोळी, प्रकल्प प्रदर्शनातील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. सूत्रसंचालन मीनाक्षी सूर्यवंशी यांनी केले. प्रास्ताविक मानसी पाटील यांनी केले.

## 'दयानंद' च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल यशस्वी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ मार्च -**
दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागामार्फत या दरम्यान बंगलोर आणि मैसूर येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आलेली होती.या सहलीमध्ये ४७ विद्यार्थ्यांनी आणि ५ शिक्षकांनी सहभाग घेतला.ज्यामुळे सहलीचा अनुभव अधिक समृद्ध आणि प्रेरणादायी बनला.

सहलीदरम्यान मैसूर येथील ऐतिहासिक मैसूर पॅलेस,श्रीचामराजेंद्र प्राणीसंग्रहालय आणि बंगलोरमधील विविध शैक्षणिक स्थळांना भेट देण्यात आली.पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी मैसूर पॅलेसची भव्यता अनुभवली.अंबा विलास पॅलेस म्हणून प्रसिद्ध असलेले हे पॅलेस वाडियार राजघराण्याचे अधिकृत निवासस्थान होते. त्यानंतर,श्री चामराजेंद्र प्राणीसंग्रहालयाला भेट दिली,जे कर्नाटकमधील सर्वात जुने आणि प्रसिद्ध प्राणीसंग्रहालय आहे.१८९२ मध्ये स्थापन झालेल्या या प्राणीसंग्रहालयामध्ये २५ हून अधिक देशांमधून १,४५० प्रजातींचे प्राणी आणि १६८ प्रजातींचे पक्षी पाहता येतात.

सहलीच्या दुसऱ्या दिवशी बंगलोरमधील भारतीय उद्यानविद्या संस्थान (आयआय एचआर) ला भेट देण्यात आली.येथे विद्यार्थ्यांना बागायती संशोधनाच्या विविध पैलूंवर सखोल माहिती मिळाली. आयआयएचआर भारतीय कृषी संशोधन परिषदेतंर्गत कार्य करणारी एक प्रमुख संस्था आहे,जी भारतात बागायती तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रसार करते.

तिसऱ्या दिवशी,इस्कॉन डॉ.बी. आर.आंबेडकर विधान सौधा (सभा) आणि लालबाग बोटॅनिकल गार्डन पाहण्यात आले. विधान सौधातील ओपन डे कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व साहित्यिक संमेलने पाहण्याचा अनोखा अनुभव मिळाला.


**IN THE COURT OF THE MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL**
AT: OMERGA, DIST, OSMANABAD (M.S.)

NOTICE FOR SETTLEMENT OF ISSUES
MACP No. 18/2020 Mahadev/Shivling Exh. No. 25

To,
1. Shivling S/o. Gangadhar Kusnure, Age- Major, Occu-Driver, R/o. Ram Nagar, Larur, Tq. And Dist. Latur.

Whereas hear above named Shri./Smt. Mahadev S/o. Manohar Survase, Age- 37 Yrs, Occu. Labour, R/o. Narangwadi, Tq. Omerga, Dist. Dharashiv. has made an application to this tribunal for getting Rs.05,00,000/- under Section 166 of M. V. Act and Rs./-under Section 140 of M.V. Act regarding the compensation of Motor Accident.

You are hereby summoned to appear before this tribunal in person of by pleader duly instructed on 30/04/2025 at 10.30 a. m. To answer the claim and filed written statement and produce document, failing which the claim will be heard and determined Ex-parte.

And also to take notice that in default of your filing address memo for service on or before the above date, you are liable to have defence struck of.

Date: 05/03/2025

**Superintendent**
Additional District Court, Omerga,
Dist. Osmanabad (M.S.)